

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
ग्रं. क्र.
१८५८
REFBK-0009815

# राजा शिव छत्रपति

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे



REFBK-0009815

## भाग दुसरा : स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा

चित्रकार श्री. दलाल
मुद्रण आनंद
प्रकाशन राजहंस

मूल्य रु. तीन फक्त सर्वाधिकार स्वाधीन

प्रकाशक : ब. मो. पुरंदरे, राजहंस प्रकाशन, १५०० सदाशिव, पुणें २.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८५७८ वि: ...
क्रमांक ८६५ नों: दि: १२-२-५९

विजयादशमी
२१ ऑक्टोबर १९५८

प्रिय वाचक,

'राजा शिवछत्रपति' या माझ्या सत्यकथनरूप शिवचरित्राचा हा दुसरा भाग. यांत शिवाजीमहाराजांची बाल-पणची जडणघडण, दादाजी कोंडदेव यांनी केलेली स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा, विजापूरकर आदिलशाहाचा रोष, महाराज शहाजीराजे यांची कैद, विजापूरकरांशीं पहिला संग्राम व त्यांत मिळविलेला विजय इ. कथाभाग आलेला आहे.

हा कालखंड इ. स. १६३६ ते १६४९ म्हणजे सुमारे १३ वर्षांचा आहे.


या माझ्या शिवचरित्राच्या एकूण स्वरूपाविषयी माझी भूमिका काय आहे ती मीं सविस्तरपणें पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत सांगितलीच आहे. अधिक कांही सांगण्यासारखें नाही.

बहूत काय लिहिणें? आमचें अगत्य असो द्यावें.

ब. मो. पुरंदरे

## अनुक्रमणिका


- ० लाल महाल ५
- ० सोन्याचा नांगर १८
- ० बंगळूर २७
- ० मावळच्या दऱ्याखोऱ्यांत! ४१
- ० सह्याद्रि ५८
- ० सह्याद्रीचे जिवलग ६७
- ० तोरणा ७७
- ० पंत दादाजी कोंडदेव ८६
- ० किल्ले कोंढाणा ९५
- ० घात १०३
- ० किल्ले सुभान मंगळ ११२
- ० किल्ले पुरंदर १२७
- ० वटपौर्णिमा १३९



ओंनमोजि गणनायका । सर्वसिद्धीफळदायका

जिजाबाईने ज्याचें मंदिर बांधलें तोच
हा पुण्याचा कसबा गणपति ......

# किल्ले तोरणा




कोकण दरवाजा

झुंझार माची





तटबंदी



८८९५

## १ : लाल महाल

पुणें !

एवढेंसेंसें खेडेगाव. पण दिल्लीच्या बादशाहापासून तंजावरच्या पाळेगारापर्यंत पुण्याचें कौतुक पोहोचलें होतें. पुणें म्हणजे मावळ मुलखाचें हृदय. बारा मावळच्या बारा वाटा पुण्याच्या वेशीला येऊन मिळत. पुणें कुणीं वसवलें कोण जाणे ! पण ज्याने वसवलें ना, त्याला नक्की ब्रह्मदेवानेच खुणावलें असलें पाहिजे, इथे गावकूस घाल म्हणून. गाव वसवायला जागा कशी अगदी नेमकी निवडली. आरशांत न पाहतांहि सवाष्ण कुंकूं रेखते तशी. तितकी अचूक. तितकी सुंदर. तितकीच मंगल.

फार पूर्वी एक राजा होऊन गेला. तो मराठी मुलखावर राज्य करीत होता. त्याचें नांव राजा कृष्ण राष्ट्रकूट. त्याने दिलेल्या दानाच्या एका ताम्रपटांत पुण्याला म्हटलें आहे, ' पुण्य विषय '[1] ( इ. ७५८ ). म्हणजे पुणें इतकें जुनें गाव आहे. त्याहि पूर्वीचें आहे. पुढे पुण्याला म्हणूं लागले ' पुनक विषय '[2] ( इ. ७६८ ). नंतर म्हणूं लागले, ' पुणक विषय '[3] ( इ. ९९३ ). नंतर झाली पुनवडी. तिचें झालें ' पुणें ! ' गर्द झाडींत पुणें वसलें होतें. हिरव्या मखमलीवर टपकन् टाकलेला मोती जसा रुतून बसावा अन् खुलावा तसें पुणें खुलत होतें.

पुण्याच्या नैर्ऋत्येकडील दाट झाडींतून नागिणीसारखी सळसळत मुठा नदी येत होती. पश्चिमेकडून तशीच अवखळ मुळा नदी येई. या दोघींच्या

संगमाजवळ मुठेच्या नाजुक कमरेवर पुणें वसलें होतें. कसबा पुणें. चौअंगांला भक्कम तट होता. कुंभारवेस, मावळवेस अन् केदारवेस अशा तीन भव्य अन् डौलदार वेशी होत्या. गावांत चार-पांचशे उंबरठा होता. शितोळे देशमुखांचा, होनप देशपांड्यांचा आणि झांबरे पाटलांचा असे मोठे मोठे वाडे होते. पाटलांची चावडी होती. बाजार होता. बारा बलुतेदार होते. वैदिक शास्त्रीपंडितांचीं आठ घरें होतीं. नदीला घाट होते. घाटांवरती देवळें होतीं. देवळांत देव होता.

पण सगळ्याची माती माती झाली! सुलतानांनी आळीपाळीने पुण्याचें मातेरें केलें. नदीला बांधलेले घाट व काठावरची दोन्ही शिव-मंदिरें यादवांच्या वेळचीं होतीं.[४] हेमाडपंती. फार देखणीं. पाहात राहावीं अशीं. पण फुटलीं! आंतल्या नारायणेश्वराच्या अन् पुणेश्वराच्या, घणाच्या घावांखाली ठिकऱ्या उडाल्या.[८] दोन्ही देवळांच्या मशिदी बनल्या. हेमाडपंती देवळाऐवजी हेमाडपंती मशिदी आता उभ्या होत्या! कसब्यांतच केदारेश्वराचें आणखी एक शिवालय होतें. देव उडाला होता. शिल्लक राहिलें होतें फक्त ओसाड पडकें देऊळ. जेव्हा देव भंगला तेव्हाच त्याचा पुजारीहि भंगला. तो घनपाठी वेदशास्त्रसम्पन्न शुचिर्भूत ब्राह्मण होता. त्याचें नांव शामभट राजर्षि. त्याचें जानवें तुटलें! शिखा गेली! वेद गेले! सर्व गेलें आणि नारायणेश्वराच्या देवळांतच दर्गा होऊन बसलेल्या शेख सल्ला-उद्दीन अवलियाचा तो पीरजादा मुजावर बनला![४] दशग्रंथी वेदमूर्ति राजर्षीचा मुजावर झाला!

आता त्याचे वंशज पुण्याचे काजी बनले होते.

पुण्याची कळा पार गेली. नुकतेच विजापूरच्या आदिलशाही फौजेने उरलेलें पुणें पार बरबाद करून टाकलें[६] (इ. १६३०). गावाची तटबंदी आणि वेशी सुरुंग लावून उडविल्या. घरेंदारें जाळून टाकलीं. माणसांची कत्तल केली. धनदौलतीची लूट केली. शहाजीराजांचे टोलेजंग

वाडे पुण्यांत होते. ते तर पहिल्याप्रथम पेटले.[११] कारण सारा राग त्यांच्यावरच होता. दाराखिडक्यांतून आगीचे लोळ आणि धुराच्या लाटा उसळत होत्या. प्रचंड तुळवटें कडाड कडकड आवाज करीत मोडून पडत होतीं. राख झाली तेव्हा आग विझली. बादशाही फौजेने पुण्यावरून अक्षरशः गाढवें जुंपलेला नांगर फिरविला.[५] पुण्याच्या जमिनींत एक पहार ठोकून ठेवली.[५] पुणें बेचिराग झालें. ताख्तताराज झालें. उजाड, भकास झालें! मसण! आता पडकीं काळवंडलेलीं भिताडें, झुडपें माजलेलीं खिंडारें आणि सर्वत्र निवडुंग उरला होता. उगाचि अधूनमधून एखाद दुसऱ्या खोपटांत, एखाद दुसऱ्या घरांत भीत भीत दिवे जळत होते. संसार जगत होते.

पण एक दिवशीं मोठेंच नवल घडलें. पुण्याच्या शिवारांत घंटाघुंगरांचा रुणझुण आवाज ऐकूं येऊं लागला. घोड्यांच्या टापा उमटूं लागल्या. लोकांचीं काळिजें धडधडूं लागलीं. भीतीने कान टवकारले गेले. घोड्यांच्या टापा? कुणाच्या? कोठून?

घोडेस्वारांचा आणि उंटांचा एक काफिला पुण्याच्या रोखाने येत होता. त्यांच्या गळ्यांतलीं घंटाघुंगरें वाजत होतीं. उंटांच्या पाठीवर सामान लादलेलें होतें. त्यांच्या लांबट सावल्या माना हालवीत धुळींतून झपाझप पुढे धावत होत्या. मागोमाग टापा वाजवीत चाललेल्या घोडेस्वारांच्या अंगाखांद्यांवर तलवारी अन् भाले व पाठींवर ढाली लटकावलेल्या होत्या. स्वारांच्या मागे बंद मेणा भोयांच्या खांद्यांवरून एका विशिष्ट तालावर पावलें टाकीत व झुलत चालला होता. मेण्याच्या झालरीचे गोंडे हेलकावत होते. मेण्यामागोमाग कांही ब्राह्मण कारकून व अत्यंत करड्या मुद्रेचा, जरख, पण तरीहि ताठ छातीचा एक भरदार म्हातारा घोड्यावरून चालला होता. त्याचें पागोटें, अंगरखा, उपरणें अन् सगळाच थाट ब्राह्मणी होता.

काफिला पडक्या मोडक्या वेशींतून पुण्यांत प्रवेशला. वेशीवरचे पारवे आणि पुण्यांत जीव सांभाळून राहिलेलीं माणसें भयाने, कुतूहलाने अन् आशाळभूत चोरट्या नजरेने टकमका पाहूं लागलीं. कोण ? कुणाची स्वारी ? कुणाचा मेणा ?

मेणा एका जागीं थांबला. पडदा बाजूला सरकवून भोई अदबीने दूर झाले. तो करड्या मुद्रेचा म्हातारा घोड्यावरून उतरून जवळ आला. आणि एक अत्यंत तेजस्वी प्रौढ स्त्री, तशाच एका तेजस्वी लहान मुलासह मेण्यांतून बाहेर पडली. बरोबरच्या लोकांनी आणि त्या करड्या तिखट नजरेच्या म्हाताऱ्यानेहि लवून त्या दोघांना मुजरे केले. उध्वस्त, भकास पुण्यांत जणूं मूर्तिमंत लक्ष्मीच उभी राहून आसमंत न्याहाळीत आहे असा भास झाला.

भास ? खरेंच होतें तें ! मूर्तिमंत लक्ष्मीचींच सोन्याचीं पावलें पुण्याला लागत होतीं. महाराज शहाजीराजांची, भोसले राजांच्या खानदानीची ती लक्ष्मी होती. सकलसौभाग्यसंपन्न जिजाबाईसाहेब भोसले. 'राजश्री' आईसाहेब.[२४] बोटाशीं होते सहा वर्षांचे शिवाजीराजे. अन् मुजरा करीत होते, करड्या मुद्रेचे करारी कारभारी पंत दादाजी कोंडदेव.

हें वर्ष होतें शके १५५७ (इ. १६३६).

पुण्यांतल्या बायाबापड्यांचीं, गोरगरिबांचीं तोंडें एकदम उमललीं.

शहाजीराजांनी शिवबाची व जिजाबाईसाहेबांची दादाजीपंतांबरोबर पुण्यांत पाठवणी केली. निजामशाही बुडाल्यावर राजांनी विजापूरच्या आदिलशाहाची सरदारी पत्करली. मुहंमदशाह बादशाहाने त्यांना बारा हजार स्वारांची सरदारी दिली.[७] पुणें व सुपें परगण्यांची जहागीर त्यांच्याचकडे चालू ठेवली आणि त्यांना रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकांत मोहिमेवर रवाना केलें.[७] शहाजीराजांनी तिकडे जाण्यापूर्वी शिवबाला आईसाहेबांसह पुणें प्रांतांत पाठविण्याचा विचार मुक्कर केला. शिवबाला

पुण्याच्या डोंगरांत अन् दऱ्याखोऱ्यांत वाघासारखा वाढवायचा बेत त्यांनी आखला. ओस व उध्वस्त पडलेल्या पुण्याची व कर्यात मावळाची आबादानी करण्याची आणि शिवबाला दौलतीच्या कारभारांत जाणता-नेणता करण्याची दुहेरी कामगिरी राजांनी दादाजीपंतांच्या शिरावर टाकली.[१२] त्यांना मनांतला मनसुबा सगळा सांगितला.

पंतांना हें अवघड काम फार आवडलें. पुण्याला जाण्याचा बेत मुक्रर झाला. आईसाहेबांस तर मनापासून मंजूर झाला. पुणें, पुण्या-भवतीचीं घनदाट अरण्यें, भयंकर विकट दरीखोरीं, असंख्य किल्ले, काटक अन् गरीब मावळे आणि सर्वांत विशेष म्हणजे विजापुरापासून दूर, दूर, दूर! बस्स ठरलें! तयारी झाली. स्वारशिबंदी, उंट, हत्यारें, मेणे, पालख्या, कापडचोपड, जें जें राजघराण्यांत हवें तें तें सर्व साहित्य व कारकूनमंडळी बरोबर देऊन राजांनी दादाजीपंतांना शिवबा व आई-साहेबांसह पुण्याकडे रवाना केलें.

पुण्यांत व पुण्याच्या दक्षिणेस सात कोसांवर असलेल्या खेडेबाऱ्यांत मिळून राहाण्याचें ठरलें होतें. दोन्हीहि ठिकाणीं घर बांधण्यापासूनच तयारी करावी लागणार होती. पुण्यांतले होते ते वाडे जळून आता कोळसे उरले होते फक्त. पुण्यांत वाडा बांधायचा व तो तयार होईपर्यंत खेडेबाऱ्यांत राहायचें असें ठरलें.[१]

पुण्यांत उतरल्यावर प्रथम चौकशी आईसाहेबांनी केली देवदर्शना-करिता देवाची. येथें देऊळ कुठे आहे? कोणता देव आहे?

नाही! कोणताच नाही! सर्व फुटले!

देव नाही आणि देऊळहि नाही हें पाहून त्यांना फार वाईट वाटलें. घराला देवघराशिवाय शोभा नाही. मांगल्य नाही. गावालाहि देवळा-शिवाय आशीर्वाद नाही. आपण तर स्वप्न विणतों आहोंत येथे स्वर्ग बनविण्याचें, आणि मग स्वर्गात देवच नसावा? आईसाहेबांनी चौकशी

करविली. आणि त्यांना पत्ता लागला अगदी नेमक्या हव्या त्या देवाचाच! श्रीगजानन मंगलमूर्तीचा![८] पुणें कसब्यांत राहाणाऱ्या विनायकभट ठकार नांवाच्या ब्राह्मणाच्या घराजवळ भेंड्याच्या विटांच्या आवारांत एक गणपति अंग चोरून बसलेला होता. देऊळ देव्हारा त्याला कांहीहि नव्हतें.[८] विनायकभट त्याची गुपचूप पूजा करीत. हें गणपतीचें आवार शितोळे देशमुखांच्या व होनप देशपांड्यांच्या वाड्यांच्या दरम्यान होतें.

आईसाहेबांना आनंद झाला. हा मोठा शुभयोग वाटला. पुण्यांत प्रथम प्रवेश गजाननाच्या सेवेनेच व्हावा हा केवढा मंगलयोग! आई-साहेबांनी शिवबासह तेथे जाऊन भगदाडांतील गणपतीचें भक्तिभावाने दर्शन घेतलें. आणि पंतांना त्या गणपतीचें देवालय बांधण्यास सांगितलें. पंतांचीहि मान आनंदाने डोलली.

श्रीमन्महागणाधिपतये नमः। बांधकामास आरंभ झाला. विनायकभट ठकारांसच गणपतीच्या पूजाअर्चादि व्यवस्थेचें काम आईसाहेबांनी सांगितलें. त्यासाठी खर्चाची व्यवस्था लावून दिली.[१०] हाच तो पुण्यांतील प्रख्यात कसब्याचा गणपति.

वाडे बांधून होईपर्यंत सर्वांची राहाण्याची व्यवस्था तात्पुरती अन्यत्र करण्यांत आली. पुण्यांत आणि खेडेबाऱ्यांतहि वाडे बांधावयास पंतांनी जागा निवडल्या. खेड्यालगतच पंतांनी पांढर पाहिली. ही जागा त्यांना फारच आवडली. जवळच डोंगरांची उंच रांग, मावळतीला कोंढाणा किल्ला आाणि शिवारांतील जमीन तर गुळासारखी रवाळ. पंतांनी ठरविलें, इथे नवीन गावच वसवायचें![१२] पहिला वाडा 'राजवाडा' बांधायचा. आणि गावाला नांव द्यायचें शिवाजीराजांचेंच. पंतांनी पाया घातला. खेडच्या कोंडे देशमुखांकडून त्यांनी जमीन घेतली[१] आणि आपल्या छोट्या धन्याकरिता एक बाग तयार करण्यास आरंभ केला. विविध तऱ्हेचीं फळझाडें आणि कलमी आंबा नामवंत लावला. बागेला त्यांनी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम २५४७८ वि: ११ तारीख
क्रमांक ४८८९ नों: दि: १२-२-८८



नांव शहाजीराजांचें ठेवलें 'शहाबाग.'

पुण्यांतहि वाड्यासाठी पंतांनी जागा निवडली. कसब्याच्या पश्चिम-अंगाची; जागा विस्तृत, जवळच नदी, पाणी विपुल, पागेची वर्दळहि गावास होणार नाही अशी. शिवाय गणपतीच्या सन्निध. पंतांनी वाड्यासाठी तिथे रेघ मारली. मुहूर्त पाहून, भुईपूजन करून पंतांनी कुदळ घातली. ही जागा झांबरे पाटलांकडून पंतांनी घेतली.[१४]

पुण्याजवळ चार कोसांवर पाषाण नांवाच्या गावीं एक शिवालय होतें. पंतांनी आपण स्वतः जाऊन तेथे गावाला पेठ वसविली आणि पाषाणाचें नांव बदलून आईसाहेबांचें नांव त्याला दिलें, 'जिजापूर.' पेठ जिजापूर.

श्रीमन्महागणाधिपतये नमः



पंतांचें शहाजीराजांवर, आईसाहेबांवर, शिवबावर, भोसले कुटुंबावर असें प्रेम होतें. स्वामी आणि सेवक हें नातें नव्हतेंच उरलेलें. पंत म्हणजे भोसल्यांच्या कुटुंबांतलेच. आजपर्यंतची त्यांची सारी हयात राजांच्या पदरीं गेलेली होती. ते वयाने जवळ जवळ सत्तरीच्या दारांत उभे होते. शहाजीराजेहि त्यांना फार मान देत. राजांच्या घरांतले ते मानाचे, धाकाचे, दराऱ्याचे, मायेचे आणि ममतेचे वडीलधारे पुरुष होते. ते सर्वांवर हक्काने रागावत अन् सर्वांवर हक्काने प्रेम करीत.

कांही नाही तरी सतत दोन पिढ्या पंत राजकारणांत वावरत असावेत. त्यांनी अवघड सवघड प्रसंग शेकड्यांनी अनुभवले होते. राजांचा आणि त्यांचा स्वभाव राजकारणांत सारखाच होता. आपलें स्वतंत्र राज्य असावें, देवाधर्माच्या आणि गाईवासरांच्या वैऱ्याची सेवा करूं नये, असें त्यांनाहि मनापासून वाटे. पण स्वतंत्र दौलत स्थापण्याचे राजांचे दोन डाव सुलतानांनी पार चिरडून टाकलेले पाहून पंतांचें मन जरा चरकलेंच होतें. हें काम कठीण. अवतारी पुरुषाशिवाय होणार नाही असें त्यांना अनेकांप्रमाणेंच वाटलें असेल तर नवल नव्हतें. अनुभवच होते तसे. तरी पण त्यांची ती मूळची रग थोडीच जाते?

आईसाहेबांना ते फार मानीत. फार माया करीत. ही बाई अशी तशी नाही, हिची जडणघडण कांही वेगळीच आहे, हें त्यांनी ओळखलेलें होतें. शिवबावर तर खुद्द शहाजीराजांचाहि नसेल एवढा जीव पंतांचा होता.

पंतांची राहाणी अगदी साधी. लक्ष सदोदित कामकाजांत. तीच त्यांची स्नानसंध्या. ते अधूनमधून कधी कधी स्वतःच्या संसारांतहि लक्ष घालीत! पंतांचा वतनी गाव पुण्यापासून पूर्वेला पंचवीस कोसांवर होता. मलठण. पंत देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गोत्र— गोत्र? शांडिल्य. पण खरें म्हणजे त्यांचें, आईसाहेबांचें आणि शिवबाचें गोत्र एकच

होतें— प्रचंड अवघड सह्याद्रि ! पंत भारदस्त होते. जबरदस्त होते. सह्याद्रीसारखेच !

पंतांचा स्वभाव अत्यंत निष्ठावंत. तितकाच करारी. शिस्तीचे ते अति कडक. शिस्तींत जरा इकडचें तिकडे झालेलें त्यांना खपत नसे. पण प्रेमळहि त्यांच्यासारखे तेच. पंतांच्या शिरावर आणखी एक मोठी जबाबदारी होती. शहाजीराजांच्या पुणें परगण्याच्या जहागिरीला लागूनच पुण्यापासून नैर्ऋत्येला सात कोसांवर कोंढाणा किल्ला होता. या कोंढाण्यासह कोंढाण्याच्या भवती जो सुभा होता त्याला ‘सुभे कोंढाणा’ म्हणत. हा सुभा कोणाच्याहि जहागिरींत नव्हता. बादशाही अंमलांतच होता. विजापूरच्या आदिलशाहाने खास सरकारी रीत्या दादाजी कोंडदेवांची या सुभे कोंढाण्यावर ‘नामजाद सुभेदार’ म्हणून याचवेळीं नेमणूक केलेली होती. म्हणजे दादाजीपंत भोसल्यांच्या पुणें जहागिरीचे कारभारीहि होते व लगतच्या सुभे कोंढाण्याचे नामजाद सुभेदारहि होते. या सुभेदारीचा अचूक आणि पुरेपूर फायदा कसा कसा करून घेतां येईल याचा हिशेब पंत मनांत मांडूं लागले होते.

पुण्याचा कारभार शिवबाच्या नांवाने सुरू झाला. कर्यात मावळांत शिवाजीराजांच्या व पंतांच्या कारभाराची द्वाही फिरली. पंतांचा शिस्तीचा कारभार सुरू झाला. वाड्याचें बांधकामहि झपाट्याने चालीस लागलें होतें. नव्या ईर्षेने आणि नव्या आशेने आईसाहेबांचा व शिवबाचा दिनक्रम पूर्ववत् शिवनेरीप्रमाणे चालू झाला. मावळच्या डोंगरांतून वाहात येणारे वारे आईसाहेबांच्या कानांत कांहीतरी कुजबुजूं लागले ! देवघरांतल्या नंदादीपाजवळ शिवबास घेऊन त्यांचें ‘शुभं करोति’ सुरू झालें. गणपतीचें देऊळहि बांधून पुरें होत आलें.

पुण्यांतील वाडा बांधून पूर्ण झाला.[१४] आईसाहेबांस व शिवबास वाडा आवडला. पागा, गोशाळा, शिलेखाना, कचेरी, दप्तरखाना, सदर,

कोठी, राहण्याचे महाल, देवघर वगैरे जागा बांधून झाल्या. मुहूर्त पाहून आईसाहेब व शिवबा यांना वाड्यांत राहावयास पंतांनी आणलें. पंतांनी वाडा तर अगदी सायसंगीन, दणकट, पण झोकदार बांधला.[१५] वाड्याला पंतांनी नांव दिले 'लाल महाल.' त्यांनीं वाड्याचें जोतें पूर्व पश्चिम १७॥ गज लांब व दक्षिण उत्तर २७॥ गज रुंद (५२॥ × ८३। फूट) धरलें होतें. वाड्याची उंची १०। गज (३०॥। फूट) होती. आंत चौकांत कारंजीं तयार केलीं होतीं. कारंजांचे पश्चिमेस भव्य प्रशस्त सदर होती. सदर म्हणजे छोटासा दरबारी महालच. वाड्यांत पाण्याचा मुबलक पुरवठा केला होता. तीन विहिरी बांधल्या होत्या. पंतांनी असा थाट एकूण केला होता.[१६] शिवाय लाल महालांत तळघरें बरींच बांधलीं होतीं. तळघरांची खोली ४॥ गज (१३॥ फूट) होती.[१५]

पंतांनी पुण्याचीहि सुधारणा चालू केली होती. हडकीची जागा त्यांनी बदलून दुसरी जागा हडकीला दिली. कारण पाटांत जनावरांचीं कातडीं धुतल्याने प्रवाहाची खराबी होई. पंतांनी महार मंडळींना हडकीसाठी पुण्याच्या पूर्वेस जागा दिली.[१७] पुण्याजवळून वाहणाऱ्या प्रसिद्ध आंबील ओढ्याला पंतांनी धरण बांधलें.[१८] छोट्या पाटबंधाऱ्यांचा उपयोग त्यांनी जाणला होता. पुण्याला आता बाळसें आलें.

आईसाहेब व शिवबा खेडेबाऱ्यांतहि राहात. तेथील वाड्याचेंहि बांधकाम पुरें होत आलें होतें. वाडा होईपर्यंत शिवबासह त्या बापूजी मुद्‌गल नऱ्हेकर देशपांडे यांच्या वाड्यांत राहात होत्या. हे बापूजी देशपांडे मोठे निष्ठावंत होते. पंतांनी बापूजींना पुणें परगण्याचे हवालदार नेमलें होतें.[१९]

या वाड्याभवती नवें शिवापूर गाव वसविण्याचा पंतांनी मुहूर्त केला, तेव्हा पाटील, कुलकर्णी, देशपांडे वगैरे वृत्तिवंतांस पंतांनी मानाचीं वस्त्रें दिलीं.[१३] गाव वसला. पंतांनी स्वतःकरिताहि एक घर बांधलें. शिवापूर

आता फार सुंदर दिसूं लागलें. गोऱ्या गालावरच्या तिळासारखें !

पंतांचें लक्ष दाही दिशांस असायचें. जहागिरीचा कारभार, कोंढाणा सुभ्याचा कारभार, आईसाहेबांच्या खाजगी खर्चाची व्यवस्था, पागेची व्यवस्था अन् हजारो कामें ! पण पंतांचें सर्वांत बारकाईने लक्ष असें तें शिवबाच्या शिक्षणावर. लिहिणें वाचणें शिकवण्यासाठी नेमलेल्या गुरुजींपाशी शिवबा बसे.[२०] त्याची बुद्धि इतकी कुशाग्र होती की, एखादी गोष्ट एकदा सांगूनच त्याच्या पक्की लक्षांत राहात असे. अत्यंत झपाट्याने तो लिहिण्यावाचण्यास शिकला.[२०] शिवाय त्याच्या बालवयानुरूप इतरहि घरगुती संस्कार घडतच होते.

पुण्याच्या भवताली देवदैवतें खूप होतीं. ईश्वरभक्ति हा आईसाहेबांचा स्वभावच होता. त्या अधूनमधून देवदर्शनाकरिता बाहेर पडत. बरोबर बोटाशीं शिवबा असेच. स्वारशिबंदीसह त्या दर्शनास जात. चिंचवडच्या मोरयादेवांना,आळंदीच्या ज्ञानेश्वरांना, थेऊरच्या गजाननाला, जेजुरीच्या खंडोबाला, भुलेश्वराला, कोंढणपूरच्या भवानीला त्यांच्या आर्त भक्तीचीं दंडवतें पडत होतीं. कधी मेण्यांतून तर कधी घोड्यावरून जात. शिवबाच्या मनावर फार खोलवर या देवदेवतांच्या दर्शनाचे संस्कार होत होते. आईसाहेबांनी आळंदीला देवाच्या पूजेअर्चेसाठी नंदादीप व नैवेद्यासाठी उत्पन्नें दिली.[२१] चिंचवडच्या अन्नछत्रासाठीहि नेमणूक लावून दिली.[२२] असाच खर्च त्या इतर ठिकाणींहि करीत होत्या. त्यांची विशेष भक्ति कुलदेवता तुळजाभवानीवर होती. नितांत भक्ति. ती अष्टभुजा जगदंबा आपले मनोरथ पूर्ण करील अशी त्यांची नितांत खात्री होती. नेमकी हीच भक्ति, हीच शक्ति अन् हीच निश्चिति शिवबांत उतरत होती. त्याच्या मुखीं एकच नाम नांदत होतें. जय भवानी !

शिवबाची बालबुद्धि फार चौकस बनत चालली होती. पंत प्रत्येक गोष्ट करीत असतांना शिवबाला जवळ घेऊन त्याच्या देखत करीत.

कोणावर गैरशिस्तीबद्दल रागावणें, कोणाला गुन्ह्याबद्दल न्यायनिवाडा करून शिक्षा देणें, कुणाचें चांगल्या कामाबद्दल मनापासून कौतुक करणें, नवीन एखादा बेत आखणें, शस्त्रें-दारूगोळा तपासणें, खरेदी करणें, गुणीजनांचा मानसन्मान करणें, थोरामोठ्यांच्या आदराने भेटी घेणें,.... प्रत्येक वेळीं शिवबाला सन्निध घेऊनच पंत या गोष्टी करीत. तोहि मधून मधून पंतांना प्रश्न विचारी.

आणि तो आईसाहेबांना प्रश्न विचारी. हें देऊळ कां पडलें? हीं घरें कुणीं जाळलीं? हे लोक असे भिकाऱ्यासारखे कां दिसताहेत? या मशिदी आपल्या देवळासारख्या कां दिसतात? शिवबाला उत्तरें मिळत अन् तींहि आईसाहेबांच्या तोंडून! आईसाहेबांचा त्वेष, उद्वेग, राग, दुःख, सुस्कारे, गाहिवर शिवबाला दिसे. ऐकूं येई. तो न कळत गंभीर बने. त्याचें बालमन हजार वाटांनी धावूं लागे.

आपला मुलुख, आपले लोक, आपलीं घरें, आपलीं देवळें, हीं अशीं दीनवाणी कां हें शिवबाला समजूं लागलें. हे भिकारी बनलेले लोक आपले आहेत, माझे आहेत. पण त्यांची दाणादाण करणारे हे बादशाह आपले कोणीहि नव्हत. शिवबाला सारें समजूं लागलें. त्याला सर्वांत जास्त चांगलें समजूं लागलें आपल्या आईचें मन. आईसाहेबांचे डोळच जणूं कांही न बोलतां त्याला विचारीत, शिवबा! सांग! तुला हें सारें बघून बरें वाटतें का? अजूनहि आपण याच सुलतानांचे गुलाम आहोंत!

शिवबा बेचैन होई.

तीं मायलेकरें देवदर्शन घेतांना अगदीं एकाग्र होऊन जात.

आईसाहेबांना पुराण-प्रवचन-कीर्तनांची अतिशय आवड होती. तीच आवड शिवबाला लागली. महाभारत, रामायण, भागवत वगैरे ग्रंथांतील नवीन नवीन गोष्टी तो ऐके.[२३] त्याला चटकच लागली. ध्यानीं मनीं तीं पराक्रमी माणसें व देव त्याला दिसूं लागले. राम, हनुमान, कृष्ण,


अभिमन्यु, भीम अन् त्यांच्या गदा, धनुष्यें, बाण, तलवारी अन् चक्रें! पुण्यांत कोणी साधुसत्पुरुष किंवा विद्वान् शास्त्री पंडित आला की लाल महालांत त्याचा सदरेवर सन्मान व्हावा. आईसाहेबांनी पडद्यांत बसावें, पंतांनी शिवबाकडून त्यांचा सत्कार करवावा. अन् मग शिवबाला सत्पुरुषांच्या भेटीगाठीचा छंदच जडावा. अशा संस्कारांनी शिवबाची मूर्ति घडत होती.

शिवबावर सर्वजण प्रेम करीत. आईसाहेबांच्या प्रेमाला तर तुळणाच नव्हती. आईचें प्रेम तुळण्यासाठी तागडी अन् वजनें अजून निर्माण व्हायचीं आहेत. शिवबा सर्वांस आवडावा असाच होता. त्याचें बोलणें गोड. हसणें प्रसन्न. वाड्यांत सदरेवर पंतांभवती वावरतांना तो अगदी रामासारखा वागे. पण मारुतीचे अन् नारदाचे गुणहि बाळांत भरपूर होते. बरेचसे उद्योग आणि उपद्व्याप त्याच्या मागे लागलेले असत. हळूहळू वानरसेनाहि त्याच्याभवती जमा होऊं लागली होती.

* * *

---

**आधारः**—(१) मंडळ त्रै. वर्ष ८ अं. ३ पृ. १६६. (२) पुणें न. सं. खं. ३।१२४. (३) पुणें न. सं. खं. ३।१२४. (४) पुणें न. सं. खं. २।८३. (५) शिचप्र. पृ ७०. (६) राजखंड १८।२२; सपत्रें पृ. १०८. (७) जेधे करीणा. (८) पुरंदरे द. ३ पृ. १५०. (९) पेशवे द. ३१ ले १२६. (१०) शिचसा ८ ले ५२ ते ५४. (११) आघइ पृ. १५५ व ५६. (१२) सभासद पृ. २; शिभा १०।१८; परमानंद काव्य. (१३) पुरंदरे द. ३।१५१. (१४) पेशवे द. २२।२९२ व ९३. (१५) पेशवे द. २२।३११; ३४५; पुणें न. सं. खं. १।८ व ५०. (१६) पुणें न. सं खं. १ पृ. १०; मंडळ त्रै. व. १ पृ. ३२. (१७) पेशवे द. ३१।६५. (१८) नसंत्र. खं. १ पृ. ३५. (१९) राजखंड १८ ले ९ (२०) शिभा ९।७० ते ७३. (२१) सपत्रें पृ. १६८. (२२) सपत्रें पृ. १६२ (२३) शिभा १०।३४ ते ४०. (२४) मंत्रै व. १ अं. २ व ३ ले ४.



## २ : सोन्याचा नांगर

सतत एकतीस वर्षे चाललेल्या सुलतानी लढायांमुळे ( इ. १६०५ ते १६३६ ) सगळ्या महाराष्ट्राचीच खराबी झाली होती. विशेषतः पुणें प्रांताचा तर बादशाही फौजांनी उकीरडा करून टाकला होता.[2] निजामशाही बुडाल्यावर सध्या तरी निदान लढाया थांबल्या होत्या. पुणें प्रांत शहाजी राजीयांस अर्जानी मोकासा जहाला. अन् पंत दादाजी कोंडदेव, शिवबा व आईसाहेब पुण्यांत जातीने आले. भोसलेजहागिरीचा लाल महाल पुण्यांत उभा राहिला. हौस धरून पंतांनी पुणें प्रांताची सजवणूक आरंभिली. पंतांच्या मनाने हट्ट घेतला की, पुणें प्रांताची काया पालटून टाकायची. हें ओसाडपण अन् हा उदासपणा मी घालवीन, माझ्या राजाला हाताशीं धरून हें दळिद्र मी घालवीन, बादशाही सरदारांनी पुणें प्रांतावर गाढवांचा नांगर फिरविला,[1] पण मी सोन्याचा नांगर फिरवीन,[1] सोन्याच्या नांगराने भुई नांगरून हिरे मोतीं पिकवीन, असा म्हाताऱ्याने ध्यासच घेतला.

पुणें प्रांतात स्वाऱ्यांमुळे चांगल्या सुपीक जमिनीहि ओस पडल्या होत्या. खेडीं मोडलीं होतीं. कित्येक गावें तर उठून गेलीं होतीं.[2] भर शेतांत किर्र झाडी माजली होती. वाघ, चित्ते, रानडुकरें, तरसें, लांडगे, कोल्हे यांचेंच राज्य थाटांत चाललें होतें. प्रवासाला धड वाटा राहिल्या

नव्हत्या.[२] लोक भिकारी बनले होते. पंत गावोगाव हिंडले. ही दैना त्यांना पाहावेना. त्यांनी लाल महालांत बसून विचार केला. भवती कारकून कारभारी घेऊन पंतांनी येक विचारें मुलूख सजवायचा आराखडा आखला. शिवबाच्या नांवाने पक्का मनसुबा अंमलबजावणीस निघाला.

उठून गेलेल्या गावांचे पाटील, कुलकर्णी, चौगुले, चौधरी वगैरे गावकामगार पंतांनी बोलावून आणले.[३] विशेषतः मावळांतले मुठे खोरें फार वैराण पडलें होतें.[४] तेथील मंडळीहि बोलाविली. लाल महालांतल्या सदरेवर मंडळी शिवबाला मुजरे करून बसली. शिवबा गादीवर, पंत उजव्या हाताशीं खाली बसले. पंतांनी मंडळींचें म्हणणें ऐकून घेतलें. मंडळी दुसरें तिसरें काय सांगणार? आसरा तुटला. बादशाही फौजेने घरेंदारें लुटून जाळलीं. बाया पळवल्या. राहावें कुणाच्या भरवशावर गावांत? एकदा झालें, दोनदा झालें, सारखेंच होयास लागलें. मग उठून गेलों.

खरें होतें त्यांचें. मग पंतांनी त्यांना मायेने समजविलें.[३] आता महाराज शहाजीराजियांस पुणें मोकासा अर्जानी जहाला आहे. कोणा पुंड पाळेगाराचें भय आता धरूं नका. बाबांनो, गाव वसवा, कूस घाला, देव मांडा. तुमची फिर्याद ऐकावयास धाकटे महाराजसाहेब जातीने येथे आहेत. महाराजसाहेबांचा लाल महाल तुमच्या फिर्यादी ऐकावयास दिवसभर उघडा आहे. तुम्ही सुखी नांदा.

पाटील, कुलकर्णी आणि इतर गावकामगार यांचीं मनें आनंदाने फुललीं. हसऱ्या तोंडाने मंडळी परत फिरली. पंतांनी मुलखाला कौल दिला. मरगळलेल्या मनांवर जादूची फुंकर पडली. उठून गेलेलीं गावें आणि मुठे खोऱ्यांतील गावेंहि नव्याने संसार सजवूं लागलीं. नव्या उमेदीने. नव्या आनंदाने. तेल्याचा घाणा सुरू झाला. गुरवाची घागर

देवावर सांडूं लागली. भटाने पंचांग मांडलें. वाण्याने गुळाची ढेप फोडली. कोंबडा आरवूं लागला. गावें भरलीं. मुठे खोरें वसलें.[४] भूमीस वाचा फुटली. शिवारें फुललीं. वासुदेव पावरी वाजवीत नाचूं गाऊं लागला. देवाच्या नांवाला धर्म पावला । भोसले राजाला दादाजीपंताला....॥

पंतांची बुद्धि म्हणजे सोन्याची मूस! आणखी एक सोन्याची कल्पना त्यांच्या डोक्यांतून निघाली. जमीन लागवडीला आणून खंडी-खंडीने धान्य पिकवायला लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी पंतांनी गम्मत केली. त्यांनी लाकडाच्या नांगराला सोन्याची फाळी लावली! अक्षरशः वावनकशी सोन्याची फाळी! आणि पुण्याच्या शिवारांत पंतांनी तो सोन्याचा नांगर फिरविला! सोन्याच्या नांगराने भुई नांगरली.[१] लोकांत मोठें कौतुक झालें. मावळ प्रांताला पंतांचा लौकिक गेला. पंत वामण देवमाणूस. नशिबाने असा माणूस मावळाला लाभला. केवढें कौतीक! भुई सोन्याच्या फाळाने नांगरली! आता पिकेलहि सोनेंच.

आणि काय सांगावी किमया! उत्साही मावळी शेतकऱ्यांनीही घामाचा पाऊस शिंपला. हिरे पिकले! मोतीं पिकलें! भरघोस कणसांनी शिवारें डोलूं लागलीं. पिकें अगदी कशी हंबरून आलीं. उपाशीतापाशी आज वारा वर्षे[२] मरणारा पुणें तालुका धान्याने भरलेल्या कणगीशीं टेकून पोटभर भाकरतुकडा खाऊं लागला. मातींत मन मिसळलें की मोतीं मिळतात. दुसरें खतच नको!

वाघांनी आणि कोल्ह्यांनी अगदी वैताग आणला होता. शेळ्या, मेंढ्या, गाई, वासरें आजचीं उद्याला गोठ्यांत टिकत नव्हतीं. पंतांच्या हें ध्यानांत आलें. त्यांनी यासाठी जाहीर वक्षिसें लावलीं! जो कोणी रानटीं जनावरें मारून आणून सरकारांत दखल देईल त्याला लाल महालांतून शेपटामागे बक्षीस! आणि मावळ्यांच्या भाल्या-बर्च्यांखाली

रानटी जनावरें पटापटा मरूं लागलीं. मावळ्यांच्या अंगीं वाघांशीं झुंजायचें आणि लबाड कोल्ह्यांशीं डाव करायचें बळ आलें.

मुलखांत चोऱ्या, वाटमाऱ्या, दरवडे पूर्वी फार पडत. आता तसें होऊं नये म्हणून व बादशाही झोंड अंमलदारांनीहि, धिंगाणा घालून गुरें पळवून नेणें,[१३] बायका नेणें इत्यादि लाडीक चाळे करूं नयेत म्हणून, पंतांनी स्वारांची हत्यारबंद तुकडी सदैव तयार ठेवली. गावोगावच्या रामोशांनाहि जागते राहाण्याची ताकीद घातली.

जमिनीची पंतांनी मोजणी करून प्रतवारी लावली. लोकांना तगाई देऊन उत्पन्नें वाढविलीं. पूर्वी न्याय नव्हताच. काजी देईल तो न्याय! पंतांनी काजींना कायमची रजा दिली. न्यायाची कचेरी लाल महालांत मांडली. लोकांचीं गाऱ्हाणीं व फिर्यादी ऐकून, पंत स्वतः न्याय करूं लागले. शिववा जसा जसा मोठा होत गेला तसे तसे पंत त्याला या अवघड कामांत हळूहळू गुंफूं लागले. ते त्याला सदरेवर बसवून त्याच्या देखत न्यायमनसुबी करूं लागले. त्यालाहि हळूहळू समजूं लागलें.

आसवली गावची गोष्ट.[५] दमाजी ढमाळ म्हणून तेथे पाटील होता. त्याची पाटीलकी मिळविण्यासाठी दत्ताजी ढमाळ नांवाच्या त्याच्या भाऊबंदाने दमाजीचा खून पाडला! तो काळ अवघा बेबंदशाहीचा होता. दाद नाही, फिर्याद नाही. दमाजीची बायको रूपाऊ ही आपल्या जानोजी व सूर्याजी या लहानग्या मुलांना उराशीं लपवून पळून गेली. भाऊबंद तिचा व तिच्या मुलांचा केव्हा खून पाडतील याचा नेम नव्हताच. दत्ताजीने पाटीलकी बळकाविली. लोकांत त्याची दहशत रानडुकरासारखी होती. विधवा रूपाऊचा जीव अन्यायाने तळमळूं लागला. त्यांतच ती म्हातारी झाली. तिचा थोरला मुलगा जानोजी व धाकटा मुलगा सूर्याजी जाणते झाले. जानोजीने तर भाऊबंदांची दहशतच खाल्ली. धाकटा सूर्याजी आपल्या थोरल्या भावाला म्हणे की,

'अरे, अन्याव झाला. आपण आपली पाटीलकी परत मिळवून आईला गावांत मानाने नेऊं.' पण जानोजी म्हणे, 'म्यां नाही ! पाटीलकीचें नग बोलूंस. भाऊबंद आपल्याला जिवें मारतील.'

सूर्याजीला हा भ्याडपणा मानवला नाही. तो म्हणाला, पाटीलकी निम्मी हक्काची आपली. परत नाही मिळविली तर जन्माचें सार्थक काय ? गडी तसाच उठला. भाऊबंदांशीं दांडगाई करण्याचें बळ त्याच्यापाशी नव्हतें. तो न सांगतां न पुसतां थेट बंगळूरास शहाजी-राजांपाशी गेला. कारण आसवली गाव आता राजांच्या जहागिरींत आला होता. सूर्याजीने राजांपुढे फिर्याद मांडली. राजांनी ताबडतोब दादाजीपंतांकरिता एक पत्र देऊन त्याला माघारी रवाना केलें. कारण पुण्याच्या कारभारावर त्यांनी पंतांची नुकतीच नेमणूक केलेली होती.

सूर्याजी माघारा आला आणि आपल्या म्हाताऱ्या आईला हातीं धरून पंतांपुढे जाऊन उभा राहिला. त्याने राजांचा कागद पंतांपुढे ठेवला. राजांनी लिहिलें होतें, 'यांचा मारा झाला. यांची चौकशी करा !'

पंतांनी कागद वाचला. त्यांनी टाकोटाक हुकूम करून आसवलीला हशम रवाना केले. हशमांनी दत्ताजी ढमाळ व त्याचा पोरगा संभाजी यांना हुजूरदाखल केलें. त्यांच्या पायांत पंतांनी बेडी ठोकली. फिर्याद उभी झाली. गोतपंचायतीसमोर पंतांनी चौकशी केली आणि निवाडा केला. रूपाऊच्या हक्काची पाटीलकी तिच्या पदरांत पंतांनी घातली. इतक्या वर्षांनी तिला न्याव मिळाला.[५] पाटलीण म्हणून ती मोठ्या मानाने गावीं गेली.

पंतांनी कितीतरी भांडणांचे न्यायाने निवाडे केले. निवाडे करतांना गावांतील तेथील प्रमुख जबाबदार गावकऱ्यांची गोतसभा भरवून, त्या गोतसभेंत तंट्याची सर्व बाजूंनी चौकशी करून, मग गोतसभेच्या

विचारानेच पंत निर्णय देत. निर्णयाचा महजर म्हणजे निवाडपत्र तयार करीत. त्यावर निवाडा करायला बसलेल्या लोकांच्या सह्या व निशाण्या घेत. असे अनेक महजर त्यांनी केले.[६] कितीतरी लोकांना न्याय देऊन सुखी केलें. गोजावा नांवाच्या अगदी एकट्या पडलेल्या एका स्त्रीस त्यांनीच आधार देऊन तिच्या उत्पन्नाचा वांटा न्यायाने तिच्या पदरांत टाकला. परिंच्याच्या आडदांड रतनोजी जाधवाने संभा कोळ्यासारख्या एका गरिबाचीं हत्यारेंच जबरदस्तीने दडपलीं. ढाल, खंजीर, फिरंग, सुऱ्या वगैरे हत्यारें होतीं हीं. संभाजी कोळी हात जोडून पंतांपुढे जाऊन फिर्यादी झाला. पंतांनी अशीच गोतसभा भरवून सर्वांच्या बुद्धीने निवाडा केला. रतनोजीला या गुंडगिरीबद्दल पंतांनी कडक दंड केला व ती रक्कम संभाजीला द्यावयास लावली. रतनोजीजवळ पैसे नव्हते. पंतांनी त्याला त्याचें वतन गहाण टाकायला लावून दंड वसूल केला ![६] असे होते पंत !

स्वतः आईसाहेबहि कित्येकदा निवाडे करावयास सदरेवर जातीने बसत. तंटा ऐकून घेत आणि अचूक न्याय करीत.[७] जेजुरीच्या गुरवांच्या भांडणाचा निवाडा त्यांनीच केला. आणि असे कितीतरी. पंतांनी शिरवळकर देशपांड्यांच्या वतनाचा तंटा स्वतः निकालांत काढला. परंतु रामाजी विठ्ठल देशपांड्याचें समाधान झालें नाही. त्याने आईसाहेबांपुढे जाऊन मागणी केली की, माझा तंटा गोतसभेपुढे चालवून गोतमुखानेच मला न्याय मिळावा. आईसाहेबांनी त्याचें म्हणणें मंजूर केलें आणि पंतांना हुकूम केला की, यांचा तंटा गोतमुखानेच निकालांत काढा.[७] पंतांनीहि मुजरा करीत आईसाहेबांचा हुकूम झेलला.

पंतांच्या व आईसाहेबांच्या या कारभाराचा शिवबावर विलक्षण परिणाम होत होता. शिवबाच्या नसानसांत 'न्याय' उतरत होता. अन्याय म्हणजे काय हें त्याला समजूं लागलें होतें. अन्याय त्याला

सहन होईनासा झाला होता. अन् सर्वांत मोठा अन्याय त्याला दिसत होता, बादशाहाची सत्ता हाच !!

जहागिरीचें रंगरूप झपाट्याने पालटूं लागलें. वसूल नियमित आणि वाढता येऊं लागला. खजिन्यांत शिल्लक पडूं लागली. लोकांचीं घरें आणि लाल महाल समृद्ध बनूं लागला. धान्य, वैरण, गुरेंवासरें, घोडीं-पाडीं टंच झालीं. आईसाहेबांना पंतांच्या कारभाराबद्दल धन्यता वाटूं लागली. एवढीशी नखभर जहागीर, पण एखाद्या स्वतंत्र राज्यासारखी शोभूं लागली. सबंध पुणें जहागिरींत फक्त छत्तीस गावें होतीं! चिंचोक्या-एवढी जहागीर !

शेतीच्या वाढीसाठी पंत झटत. तगाया देत. सरकारी जमिनी लागवडी-खाली आणीत. पंतांना हौसच मोठी. शिवापूरच्याजवळ रहाटवडें म्हणून एक गाव आहे. तेथे चोरघे या नांवाचें घराणें नांदत होतें. शेतीवाडी तें मन लावून करी. पंतांनी चोरघ्यांच्या शेतांत विहीर बांधून दिली.[८] चोरघ्यांच्या शेतीची बागायती झाली. धो धो पाणी झालें. पंतांनी विहीर तर अशी घाटदार, डौलदार बांधली की बस्स् !

पंतांनी आईसाहेबांच्या खाजगी खर्चाची व्यवस्था उत्तम ठेवली होती. शिवापुराजवळचीं केळवडें व रांझें हीं दोन गावें आईसाहेबांच्या खर्चा-साठी लावून दिलेलीं होतीं. त्या गावांचें उत्पन्न आईसाहेबांच्या स्वाधीन. त्यांनी मर्जीप्रमाणे खर्च करावा. आईसाहेबांच्या या सर्व खर्चाची व कारभाराची व्यवस्था चोख ठेवण्यासाठी एक स्वतंत्र कारभारी नेमलेला होता. त्याचें नांव होतें नारो त्र्यंबक पिंगळे.[९]

कसबा पुणें तर आता 'शहर' बनलें. जवळजवळ तीन हजार वस्ती झाली! केदारेश्वर पुन्हा स्थापन झाला. कसब्याचा गणपति शेंदूर, दूर्वा, मांदार, शमी, मुकुट, पितांबर, शेला आणि षोडशोपचार पूजेने नंदादीपांत शोभूं लागला. पुण्याच्या कसब्यापासून थोड्या दूरवर

काळ्या वावरांत एका झाडाखाली एक देवी उभी होती. तिचीहि पूजा झाली. हीच ती पुण्याची तांबडी जोगेश्वरी. बेंद्रे यांच्याकडे तिची व्यवस्था सोपविली.

पुण्यांतल्या दर्ग्यांची व मशिदींचीहि व्यवस्था पूर्ववत् उत्तम चालू ठेवण्यांत आली.[१०] मुजावर, पीरजादे, काजी वगैरे मंडळींचीहि लहान मोठीं उत्पन्नें रक्षिण्यांत आलीं. पुण्यांत एक मता नायकीण म्हणून कलावंतीण होती. जातीने मुसलमान. मोठी गुणी कलावंतीण होती. शहाजीराजांनी तिला अर्धा वावर जमीन इनाम दिली होती. तिचाहि गुणीजनांत परामर्ष होत होता.[११]

*शैशवेऽभ्यस्त विद्यानाम्......*




शिवबा मोठा होत होता. त्याचे गुण विकसत होते. तो त्याचा भारदस्तपणा, आपल्या लोकांबद्दलची कळकळ, स्वाभिमान, भवानीच्या पायींची ज्वलंत निष्ठा, अन् पुंडपणाहि वाढतच होता! तालमींतल्या तांबड्या मातींत, खेळांच्या मैदानावर, डोंगरावर, नदींत, ओढ्यांत, जंगलांत शिवबाला पाहावें! एरवी लाल महालांत वावरतांना शांत सज्जन 'गोविंदराव' वाटणारा शिवबा इतका दांडगोबा असेल असा डोळ्यांना विश्वासच न पटावा! लाल महालांत तो श्रुति, स्मृति, पुराणें, महाभारत, रामायण, राजनीति, शास्त्रें, सुभाषितें, यांत रमून जाई.[१२] तर इथे कुस्ती, घोडदौड, तलवारींचे हात, भाल्याची फेक, पट्ट्याचे हात, निशाणबाजी, जोरांत धावणें, दौडणें, लांब लांब उड्या मारणें, अवघड दुर्गम डोंगरदऱ्यांतून लपंडाव खेळणें आणि मनसोक्त धुडगूस घालणें यांतच तो गुंग होई.[१२] या बाबतींतहि त्याचे गुरु त्याच्यावर अगदी खूष असत![१२] तो हत्तीवरहि कधी कधी अंकुश घेऊन बसे.[१२] हत्ती चालवणें हीहि एक विद्या आहे.

शिवबा आता दहा वर्षांचा झाला होता. पुण्याचे हवालदार बापूजी मुद्गल देशपांडे यांचीं मुलें नारायण, चिमणाजी व बाळाजी हे शिवबाचे दोस्त बनले होते. पण मुख्य मुख्य अंगद, हनुमंत, सुग्रीव, नळ, नीळ, जांबुवंत अद्याप मावळांतल्या झाडांवरच फांद्याफांद्यांतून उड्या मारीत होते! त्यांची यांची गाठभेट अजून पडली नव्हती!

* * *

---

**आधारः**—(१) शिचप्र पृ. ७१. (२) मंडळ अ. १८३५ पृ. ३७५. (३) शिचसा २ ले. ९५, ९६ व १०४. (४) पेशवे द. ३१।१०. (५) ऐसंसा ४ ले. ३२. (६) राजखंड १८।९, १७।७, १८।१६ व ६३; मंडळ त्रै. पृ. ३९; शिचसा ७ ले. ३१ व ३२. (७) शिचसा २।१३९; शिचसा १।८२. (८) शिचसा ३।६३३ व ३५. (९) गाडे करिणा. (१०) पेशवे द. ३१।१८. (११) सपत्रें १४५. (१२) शिभा १०।३४ ते ४०. (१३) शिचत्रूसं १ पृ. ३, राजखंड १६।१५ व १६.



## ३ : बंगळूर

शिवबा दहा वर्षांचा झाला. मुलगा एवढा ' मोठा ' झाला, आता लग्न नको करायला ? लग्नाचें वय ना हें ! आईसाहेब व पंत कुजबुजूं लागले. ठरलें ! फलटणच्या नाईक निंबाळकरांची लेक आईसाहेबांच्या नजरेंत भरली. पंतांनी शिवबाकरिता मुलीला मागणी घातली. सईबाई तिचें नांव. मुलगी अजून परकर नेसत होती. आईसाहेबांना आवडली होती. कांही म्हणा, ' सासू ' होण्यांतला आनंद कांही वेगळाच असतो ! पुरुषाच्या जातीला नाही समजायचें तें !

पंतांनी शहाजीराजांना लग्नासाठी पत्रें पाठविलीं. परंतु राजे कर्नाटक प्रांतीं दूर पडले. त्यांचें येणें घडेना. पण त्यांचा आशीर्वाद मात्र आल्यावाचून कसा राहील ?

पंतांची व आईसाहेबांची लगीनघाई उडून गेली. लाल महालाला तोरण लागलें. शिवबाला हळदी लागल्या. मुलगा कसा दिरिष्ट लागण्यासारखा दिसत होता.[११] शिवबाला मुंडावळ्या लागल्या. ताशा–चौघड्यांच्या कडकडाटांत सईबाईने शिवबाला माळ घातली[८] ( दि. १६ मे १६४० ). हें लग्न पुण्यांत पंतांनी हौसेने केलें.[७] शिवबाने सईबाईसह लाल महालांत प्रवेश केला. टप्पोऱ्या मोगऱ्याशेजारी नाजुक कुंदाची कळी ठेवावी तशी सईबाई शिवबाशेजारी दिसत होती.

शहाजीराजे या लग्नाला येऊं शकले नाहीत. मुलाचें अन् सुनेचें कौतुक त्यांना दृष्टीआडून करावें लागलें. राजे बंगळुरास होते.

बादशाह आदिलशाह याने शहाजीराजांची दक्षिणेवर रणदुल्लाखाना-बरोबर रवानगी केली. खानाच्या हाताखाली काम करण्याची राजांवर पाळी आली. पण रणदुल्लाखान फार मोठ्या मनाचा व दिलदार होता. त्याचें पूर्वीपासूनच राजांवर फार प्रेम होतें.[१] त्याच्या हाताखालीं अंकुशखान, मसाऊदखान, याकुतखान, हुसेन अंबरखान वगैरे बरेच सरदार होते. तसेच गाढे, घोरपडे, पवार, इंगळे वगैरे मराठे सरदारहि होते.[२] पण रणदुल्लाखान शहाजीराजांना विशेषच मानाने व प्रेमाने वागवी.[१४] तो राजांची योग्यता जाणून होता.

कर्नाटकांतील पेनुकोंडा, बसवापट्टण, होस्पेट, बेदनूर, श्रीरंगपट्टण, कावेरीपट्टण वगैरे राज्यांच्या विरुद्ध ही मोहीम होती. राजांच्या दक्षिणेंतील स्वाऱ्या सुरू झाल्या. पराक्रम होता. विजय मिळत होते. पण राजांनी मात्र हीं राज्यें साफ बुडविण्याचें धोरण ठेवलें नाही. शक्यतोंवर तीं टिकविण्याकडेच त्यांचा कल होता. खंडण्या, तह, करार, मांडलिक्या घडवून आणून ते हीं राज्यें राखण्याची धडपड करूं लागले. त्यामुळे या सर्व राज्यांच्या राजेलोकांना शहाजीराजांबद्दल आपुलकी व आदरच वाटूं लागला. ते राजांना फार मान देऊं[१३] लागले.

रणदुल्लाखान तर राजांवर खूष होता. त्याने बंगळूर ( बेंगलोर ) शहर शहाजीराजांना प्रेमपूर्वक भेट म्हणून दिलें.[३]

शहाजीराजे बंगळुरास राहूं लागले. सौंदर्य, संरक्षण आणि आरोग्य या तीनहि दृष्टींनी शहर अप्रतिम होतें. राजांना तें फार आवडलें. राजांनी आपला वाडा राजवाड्यासारखा सजविला. बागा, कारंजीं, पुष्करिणी, महाल, पागा वगैरे थाट सार्वभौमासारखा केला. सर्व तऱ्हेच्या वस्तु, शस्त्रें, गुणवान् कलावंत, हुषार पंडित, शास्त्री, गवयी, नर्तक-नर्तकी, कवि वगैरे सर्वांचा संग्रह राजांनी केला. शिवाय तोफा, हत्ती, घोडे,

शूर लोक, मुत्सद्दी यांचीहि फार उत्तम संचणी केली. उच्च अभिरुचि, उच्च संस्कृति आणि हौस यांचा बंगळुरांत संगम झाला.[४]

नारोपंत, बाळकृष्णपंत, रघुनाथपंत, जनार्दनपंत वगैरे मुत्सद्दी कारभारी राजांचा कारभार पाहात. सकाळीं राजे उठत तेव्हा त्यांच्या शयनगृहाजवळ शाहीर व गायक भूपाळ्या व भक्तिगीतें मधुर सुरांत गात. राजे उठतांच विश्वनाथभट ढोकेकर हे उच्च स्वरांत प्रातःस्मरण म्हणत. हें प्रातःस्मरण संस्कृत भाषेंतील असे. इतर कित्येक ब्राह्मण पुण्याहवाचन करीत. म्हणजे राजाला तो दिवस सुखाचा जावो अशी मंत्रयुक्त ईशप्रार्थना करीत. वेदपठणहि चालू असे.[६]

राजे उठून अंगणांत येत. आकाशदर्शन व दिशादर्शन घेत. त्याच वेळीं गुरव शिंगें वाजवीत व जंगम शंख फुंकीत असत. चौघडाहि वाजूं लागे. मग राजांना कांही शुभशकुन मुद्दाम घडविले जात.[६]

तदनंतर राजे वाड्याच्या दिल्लीदरवाजासमोर सैन्याची पाहाणी करीत. इतक्यांत एखादा दरवेशी सिंहाचा बच्चा घेऊन नाचत बागडत येई. राजांचें तो मनोरंजन करी. मग राजे दरवाजावरील तोरणाकडे पाहात पाहात वाड्याचे मागील परसांतील अश्वत्थ, औदुंबर आणि इतर शुभवृक्षांखालून व पारिजातकादि पुष्पवृक्षांखालून जात. नंतर शंखांतील पाणी डोळ्यांस लावून उंच फडकत असलेल्या जरीपटक्याचें ते दर्शन घेत.[६]

तदनंतर राजवैद्य पुढे येऊन राजांची नाडी तपाशी. लगेच एक ब्राह्मण एका हातांत चांदीची व एका हातांत सोन्याची परात घेऊन येई. चांदीच्या परातींत तेल असे. सोन्याच्या परातींत पातळ तूप असे. राजे आपलें मुख त्या तेला-तुपांत पाहात. नंतर राजे स्नान करीत. नंतर शंकराची यथासांग पूजा करीत.[६]

स्नानानंतर राजे सदरेवर येत. तेथे पदरचे शूर मराठे सरदार, कवि, शास्त्री, मुत्सद्दी त्यांची वाट पाहात असत. ते राजांना आदराने वंदन व मुजरे करीत. बैठकींत राजकीय कामें चालत. नंतर भोजन, वामकुक्षी, प्रजेची न्यायमनसुबी, मनोरंजन वगैरे व्यवहार करीत. रात्रीं खलबतखान्यांत गुप्त मसलती चालत.[६]

असा एखाद्या स्वतंत्र वैभवशाली राजासारखा शहाजीराजांचा दिनक्रम असे. त्यांच्या पदरीं पोवाडे गाणारे शाहीर, नर्तक, गायक बरेच होते. राजांचा कोयाजी नांवाचा दासीपुत्र नर्तन, गायनादि कलांचा उत्तम ज्ञाता होता. अनेक भाषाकोविद, पंडित व कवि त्यांच्यापाशी होते. अनंतशेष पंडित, रघुनाथ व्यास, रघुनंदन, अल्लीखान, विश्वंभर भाट वगैरे कवि त्यांत प्रमुख होते.[६]

चार वर्षे झालीं होतीं. शिवबा आणि आईसाहेब पुण्यांत होते. राजांचें राहणें जरी बंगळुरांत होतें, तरी त्यांचें लक्ष सदैव पुण्याकडे असें. वारंवार पत्रें, वस्त्रें व आवडीच्या वस्तु ते आपल्या लाडक्या शिवबाकरिता पुण्यास रवाना करीत.[५] पंत दादाजी कोंडदेवहि पुण्याहून वारंवार सर्व समाचार राजांना लिहून कळवीत. पुणें जहागिरीची प्रगति ऐकून राजांना धन्यता वाटे. त्यांना आता फार इच्छा झाली की, आपल्या थोरल्या राणीसाहेबांस व शिवबास भेटावें. त्यांनी पत्र पाठवून पंतांना कळविलें की, चिरंजीव सकलसौभाग्यवती राणीसाहेब व चिरंजीव सिउबास घेऊन कर्णाटकप्रांतीं बंगळूर शहरास जातीने येणें.

बंगळूरचा सांडणीस्वार पुण्यांत लाल महालांत आला. बंगळूरची थैली आली. पंतांनी थैली वाचली.त्यांनी घाई घाई आईसाहेबांस वाचून दाखविली. आनंद झाला. शिवबा आनंदला. वडिलांचें दर्शन होणार ! तावडतोब कर्नाटकांत जावयाच्या तयारीस सुरुवात झाली. मेणे, घोडे, उंट, खजिना, स्वार, नोकर, तंबू वगैरे प्रवासांत जरूर तें तें सर्व साहित्य सिद्ध होऊं

लागलें. पंतांनी आजपर्यंतचे जहागिरीचे हिशेब व शिल्लक साठलेला खजिना बरोबर नेण्यासाठी बाहेर काढला.

मुहूर्त ठरला आणि भोयांनी मेणा उचलला. बंगळूरच्या मार्गास स्वारी लागली. शिवबास आता नवीनच मुलुख, नवीनच माणसें, नवीन चालीरीती, एकूण नवीन जग दिसणार होतें. हेंहि एक महत्त्वाचें शिक्षण घडणार होतें. दहा गावें हिंडल्याशिवाय नजर मोठी होत नाही.

स्वारी मजल दरमजल मुक्काम करीत निघाली. सौभाग्यवती जिजाऊ-साहेब व चिरंजीव धाकटे राजे येत असल्याची थैली आधीच पुढे गेली होती. राजे उत्सुकतेने वाट पाहात होते. शिवबाचे सख्खे थोरले बंधु संभाजीराजे हेहि तेथेच होते. ते प्रथमपासून वडिलांपाशीच असत. तसेच सावत्र बंधु व इतर सर्वांची भेट आता एकत्र होणार होती.

पंत लवाजम्यानिशी शिवबासह बंगरूळच्या वेशींतून प्रवेशले. शिवबा नवीं घरें, नवे रस्ते, उंच तट, भव्य वेशी, घाटदार बुरूज, सुंदर इमारती, चौक, कारंजीं, तलाव, किल्ला, टक लावून न्याहाळूं लागला हें बंगळूरचें सौंदर्य होतें.[४]

वाड्यांत गजबज गडबड उडाली होती, थोरल्या राणीसाहेब येणार म्हणून. आल्याच ! वाड्यांत मेणे, परिवार अन् शिवबासह पंत प्रवेशले. आणि भेटींची, दंडवतांची, आशीर्वादांची, आलिंगनांची, आनंदोत्सवाची एकच दाटी उडाली. पितापुत्रांची भेट झाली. केवढा तो आनंद ! दरुणीमहालांतहि आनंद उसळला.

शहाजीराजांच्या धाकट्या राणीसाहेब तुकाबाईसाहेब व तुकाबाई-साहेबांच्या पोटीं जन्मास आलेले पुत्र एकोजीराजे यांच्या भेटी जिजाऊसाहेबांशीं व शिवबाशीं झाल्या. सख्खे थोरले बंधु संभाजीराजेहि भेटले. न जेवतां पोटें भरलीं.

शहाजीराजांच्या संसारांत दिवाळी उजाडली. राजांच्या संसारांतले अत्युच्च कौटुंबिक आनंदाचे हेच दिवस. सर्व मंडळी राजांच्या भवती गोळा झाली होती. असा कौटुंबिक आनंद पुन्हा कधीहि उगवला नाही. राजांना अपरूक कौतुक वाटलें. शिवबाला त्यांनी हृदयीं धरलें. शिवबा म्हणजे राजांच्या हृदयीं विराजणारा जणू स्यमंतकच वाटत होता.

एकेक दिवस एकत्र सहवासाच्या आनंदांत जाऊं लागला.

शिवबाच्या लग्नांत राजे स्वतः हजर नव्हते, म्हणून त्यांनी शिवबाचें आणखी एक लग्न करायचें ठरविलें ! मोहित्यांची मुलगी सोयराबाई हिच्याशीं[१२] मोठ्या थाटामाटांत शिवबाचा विवाह झाला. मोठ्या हौसेने राजांनी शिवबाचें हें आणखी एक लग्न केलें ! वडील असावेत तर ते असे असावेत !

पंतांनी पुणें जहागिरीचा हिशेब आणि सर्व हकीकतनामा राजांच्या पुढे वयाजवार मांडला. राजे निहायत खूष झाले. अगदी निहायत खूष झाले. इतक्या सुधारणा, इतकी वाढ, इतकें उत्पन्न, इतकी आबादी पाहून राजांना परमानंद झाला. त्यांनी पंतांचा मनसोक्त गौरव केला. धन्य धन्य म्हटलें. आपल्या श्रमाचें, घामाचें हें चीज पाहून पंतांनाहि धन्य धन्य वाटलें. धनी असा असावा.

बंगळूरचा हा प्रदेश म्हणजे पूर्वीचा विजयनगरच्या स्वतंत्र राज्याचाच मुलुख. कर्नाटकचें हें वैभवशाली स्वराज्य बरोबर पंचाहत्तर वर्षांपूर्वी विजापूरच्या, अहमदनगरच्या, गोवळकोंड्याच्या व बीदरच्या बादशहांनी एक होऊन मातीला मिळविलें. त्या वैभवशाली स्वराज्याचा हा प्रदेश. ती वैभवसम्पन्न विजयानगरी आणि ती अनेगोंदी नगरी जवळच होती. पार बेचिराग होऊन गेलें होतें तें स्वराज्य. त्याच्या उधळून गेलेल्या सिंहासनाच्या भग्न चौथऱ्यावर आता गवत माजलें होतें. कावळ्या–कुत्र्यांचें विश्रांतिस्थान बनलें होतें तें !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम २४४७८ वि: चरित्र
क्रमांक ८६५ नों: दि: २३ १२-२-५९

भाग दुसरा

या मुलखांत आल्यानंतर विजयनगरच्या वैभवाच्या अन् नाशाच्या हकीकती शिवबाच्या कानीं पडल्याशिवाय राहिल्या असतील काय? कदाचित् तो देवदर्शनप्रेमी बाळ विजयनगरच्या विरूपाक्ष शंकराचें दर्शन घ्यावयास आईसह गेला असेल. ते उध्वस्त, छिन्नविच्छिन्न अवशेष पाहून त्याला काय वाटलें असेल? कोणते कढ त्याच्या हृदयांत उठले असतील? या इंद्रनगरीचा नाश करून टाकणाऱ्या बादशाहांबद्दल त्याच्या मनांत कोणते विचार आले असतील? शिवबाने विजयानगरीचा नाश प्रत्यक्ष पाहिला असेल वा नसेलहि. पण विजयनगरच्या स्मृतींनी त्याचें हृदय गदगदून हलविलें असेल खास! कारण तो त्या मुलखांतच गेला होता. बंगळुरांत—विजयनगरच्या एका मांडलिक नगरींत—त्याच्या जागृत मनांत या क्षोभक इतिहासाच्या ठिणग्या नक्कीच तडतडून गेल्या असल्या पाहिजेत.[१]

बरेच दिवस मंडळींना राहवून घेऊन राजांनी शिवबाला विजापुरास न्यायचें ठरविलें! सुलतान मुहंमद आदिलशाहाच्या विजापुरास! विजापूर दाखविण्यासाठी!

आणि शिवबा वडिलांबरोबर विजापुरांत आला! आईसाहेब व पंत बरोबर होतेच. शिवबा विजापुरांत त्या प्रचंड वेशींतून प्रवेशला.

विजापूर! दारूलजफर बीजापूर! सुलतान मुहंमदशाह आदिलशाहाची ही अलीशानदार उस् सल्तनत. केवढी दिमाखदार राजधानी! ऊन आणि पाऊस खाऊन काळीठिक्कर पडलेली पांच पांच पुरुष उंचीची ही चिरेबंद तटबंदी. एका आंत दुसरी, तिच्या आंत ती तिसरी, तिच्या आंत ती चौथी, पांचवी, सहावी,.......अन् तो खास शाही किल्ला. केवढे एक एक प्रचंड बुरूज हे! हा उपली बुरूज, तो गर्बी बुरूज, तो सर्जा बुरूज अन् तो, तो.......किती मोजावेत, किती सांगावेत! अगणित अगणित! काळ्याभोर पाण्याने भरलेला हा भयंकर

खंदक. भाले, तलवारी आणि बंदुका खांद्यावर धरून पहारा करणारे पहा ते तटावरचे धिप्पाड हशम! हुकमाशिवाय वाराहि किल्ल्यांत शिरूं शकत नाही! खंदकांत ती पाहा त्या धिप्पाड हशमांचीं प्रतिबिंबें.

हा मक्का दरवाजा. कितीं बळकट! किती प्रचंड! त्यावर किती अणकुचीदार खिळे हे! सात मस्तकांचा ऐरावतहि या दरवाजावर धडक द्यावयास बिचकेल. असा हा एकच दरवाजा नाही. असे अनेक आहेत. अंबारीसह हत्ती सहज जातो या दरवाजांतून. इतकेंच नव्हे तर आदिलशाहाचा हत्तीवर धरलेला उंच हिरवा झेंडाहि न वाकतां जातो या दरवाजांतून!

गगनाशीं गोष्टी करणारे ते पाहा दिमाखदार मिनार आणि घुमट. उंच उंच चढत गेलेले असे हे मिनार आणि पांढरे शुभ्र प्रचंड घुमट अनेक आहेत. चंदनाच्या सुवासाने कोंदून गेलेले दर्गे इथे अनेक आहेत. ती पाहा जुम्मामशीद. केवढी केवढी प्रचंड! आणि ते पहा एक एक टोलेजंग शाही महाल. तो मेहतर महाल. तो गगन महाल. तो आसर महाल. तो आयने महाल.

हा घुमणारा आवाज कसला? पारव्यांचा! प्रचंड विहिरींत घुमताहेत ते. ती आहे चंदा बावडी अन् ती आहे ताज बावडी. एवढ्या प्रचंड विहिरी उभ्या दख्खनच्या मुलखांत दुसऱ्या कुठेहि नाहीत. इथे बारा बारा मोटा पाणी उपसतात तेव्हा घुमतो तो आवाज तर भयंकरच!

आणि घुमत घुमत आदिलशाहीचा दरारा गाजवणाऱ्या त्या पाहा तोफा! जबडे पसरून तटांवर अन् बुरुजांवर कशा बसल्या आहेत! तटांवरून गस्त घालीत फिरणाऱ्या त्या हबशांसारख्या हजार हशमांचें बळ, त्या पाहा, त्या एकाच तोफेंत साठवलें आहे. तिचें नांव आहे 'लांडा कसाब!' आणि भयभीत करणारा तो .......तो अक्राळविक्राळ जबडा कोणत्या राक्षशिणीचा? होय, राक्षशीणच आहे ती! तिची

भूक भयंकर आहे ! राक्षसतागडीच्या रणांगणावर हीच राक्षशीण गगनाएवढा घास घेत होती. विजयनगरचें साम्राज्य एका घासांत गिळावयास गेलेली हीच ती डाकीण ! 'मुलुखमैदान' ! सर्जे बुरुजावर 'आ' करून बसली आहे. मुलुखमैदान ! हिचें वजन आहे खंडोगणती !—आणि तें बघ प्रचंड घोडदळ. हजारो हजारो घोडे ! हजारो हजारो धिप्पाड स्वार ! हजारो हत्ती ! अन् ह्या अगणित शूत्तरनाळा, फिलनाळा, गर्नाळा, जेजला ! पाहिल्या होत्यास का कधी इतक्या ?

शिवबा ! समजलें आदिलशाहीचें सामर्थ्य ?

आणि आता ही श्रीमंती पाहा ! लुटून आणलेलें विजयनगर आणि कर्नाटक विजापुरांत तुडुंब भरलें आहे. मराठ्यांच्या गाईंचें पिळून पिळून काढलेलें दूध विजापुरांत वाहात आहे.

हा बाजार ! इथे सर्व कांही मिळतें. चांदी, सोनें, हिरे, कापड, पितळ, लोखंड, मद्य, मांस, माणसें ........ बायकासुद्धा ! मिळत नाही फक्त स्वातंत्र्य ! जें विकत मिळत नाही. भीक मागून मिळत नाही. रडून मिळत नाही. लढूनच मिळवावें लागतें तें !

आणि .... तीं तांबडीं दुकानें कसलीं ? शिवबा, नको नको जाऊंस तूं त्या बाजूला ! तुला तें सहन होणार नाही ! तें सहन करायला मन फार विशाऽऽल करावें लागतें ! तुला तें नाहीच जमणार ! तीं दुकानें आहेत गोमां ........

हीं बघ, हीं बघ बागेंत कारंजीं कशीं थुई थुई नाचताहेत ! इराणच्या चमनबंद बगीच्यांतहि फुलत नसेल असा हा पाहा जाफरमानी गुलाब ! सब्जा आणि गुलाब यांच्या खुशबूचा हा बघ सुंदर मिलाफ. त्या महालांच्या जाळीदार पडद्यांआडून ऐकूं येणारे ते ऐक कवाल्यांचे आणि गझलांचे मादक आलाप. किती सुंदर महाल आहेत हे. नक्षीदार कमानी, जाळीदार झरोके, पेलेदार सज्जे, झुळझुळते पडदे, किणकिणतीं

झुंबरें, हिलमिलते टांगदिवे आणि झरोक्यांतून डोकावणाऱ्या नक्षीदार मीन्याच्या सुरया आणि पेले ! हे महाल आहेत सरदारांचे, नवाबांचे, वजिरांचे, जहागिरदारांचे. मनापासून बादशाहाची सेवा केली की अशा महालांत राहायला मिळतें !

तीं बघ तुझ्याच वयाचीं मुलें. घोड्यावरून किती रुबाबांत, किती झोकांत चाललीं आहेत. कुठे ? माहीत नाही तुला ? दरबारांत ! शहेनशाह जिल्ले सुबहानी परवरदिगार अलीजाह हजरत मुहम्मद आदिलशाह बादशाहांना कदमबोसी मुजरा करावयासाठी ! आला हजरत बादशाह मग त्यांचें कौतुक करतील ! त्यांना किमतवान सुंदर पोषाखहि देतील. पदव्या देतील. हे सर्वजण उद्याचे शाही तख्तांचे आधारस्तंभ आहेत ! अर्कानें दौलत ! मदारूल महाम ! तुला नाही जायचें ? जा ना ! सन्मान होईल तुझा ! कदाचित् दयावंत प्रेमळ मायबाप बादशाह तुला जवळ घेतील ! प्रेमाने कुरवाळतील सुद्धा ! जा ! कां ? तुझे वडील नाही का जात ? तुझे सर्व नातलगहि जातात. तूंहि जा ! जा !

तूं पुण्यांत राहातोस ती पुण्याची जहागीर तुझ्या वडिलांना कुणीं दिली ? बादशाहांनीच दिली ना ? तूं अन्न कुणाचें खातोस ? कुणाच्या मेहेरबानीने जगतोस ? हे उपकार ज्या बादशाहांचे आहेत, त्या दीनदयाळ बादशाहांना साधा मुजरा करायचा, तर त्यासाठी इतका विचार ? इतके आढेवेढे ? ते बघ, तुझे वडीलहि निघाले दरबारला ! जा !

काय ? विचार केलास का शिवबा ? काय बोलतो आहेस तूं ? जावेंसेंच वाटत नाही दरबारांत ? शिसारी येते ? बादशाहांबद्दल तिटकारा वाटतो ? चीड येते ? संताप येतो ? शिवबा ! शिवबा ! कुणीं शिकविले तुला हे नादान चाळे ? अन्नदात्याशीं ही अशी कृतघ्नता ? याचा परिणाम काय होईल याची तुला कल्पना आहे का ? ‘ सु-ल-ता-न ’ या चार अक्षरांत केवढा भयंकर दारूगोळा भरलेला आहे याची तुला थोडीतरी

दखल आहे का ? भडका उडाला तर काय होईल ? अंदाज आहे तुला ? आठव !........

मुरार जगदेवरावासारख्या अत्यंत शूर आणि मातब्बर नेकजात सरदाराचीहि धिंड निघाली होती, याच विजापूरच्या याच रस्त्यांवरून ! तुझी पोराची काय कथा ! शहाजीराजांच्या घरांत बंडखोरीचे मनसुबे चालतात अशी नुसती अफवा जरी बादशाहाच्या कानीं गेली तर.... तर ? छेः ! कल्पनाच करवत नाही ! तुझा तो पुण्यांतला वाडा पुन्हा एकदा धडाधडा पेटेल ! ही तुझ्या बापाने मिळविलेली आणि म्हातार-पणीं तुझ्या त्या पंत म्हाताऱ्याने राबराबून उभी केलेली दौलत, हत्तींच्या पायाखालीं अन् घोड्यांच्या टापाखालीं तुडविली जाईल ! ज्यांच्याकरिता हा संसार मांडला त्या तुझ्या भावंडांची, तुझी आणि तुझ्या आईची फरफट निघेल भर रस्त्यावरून ! आणि मग हातापायांत बेड्या पडलेले शहाजीराजे, चोर–दरवडेखोरांप्रमाणे विजापूरच्या या रस्त्यांतून एखाद्या अफझलखान वा एखाद्या मुस्तफाखानाकडून फिरविले जातील ! तोफेच्या तोंडीं दिले जातील ! तेव्हा मग तोफेच्या तोंडीं जातां जातां शहाजीराजे टाहो फोडून तुझ्या पंत म्हाताऱ्याला विचार-तील की, पंत, पोराला तुम्हीं काय शिकविलेंत ? भोसल्यांचें घरदार तुमच्यामुळे मातीला मिळालें !....

शिवबा ! विचार कर, तुझ्या दादाजीपंतांचा, तुझ्या आई–वडिलांचा आणि तुझा स्वतःचाहि वेड्या ! असा घात करून घेऊं नकोस. तुझें लग्न झालें आहे. संसार कर. बादशाहाची नोकरी कर. सुखी हो ! जा ! बादशाहाला नम्रपणें बिनतक्रार मुजरा कर ! जा !

तरीहि नाहीच ? शिवबा ! कुणीं घातले हे स्वामीद्रोही चाळे तुझ्या डोक्यांत ? कुणीं शिकविली ही भयंकर बंडखोरी तुला ?

कुणीं ? सुलतानांच्या घणांखाली फुटलेल्या मूर्तींनी शिकविलें ?

उध्वस्त झालेल्या देवळांतून आवाज उमटला बंड कर म्हणून ? सुलतानांच्या हातून कत्तल झालेल्या व हालांत सडून सडून मेलेल्या मराठ्यांच्या तळतळणाऱ्या आत्म्यांनी तुला जागें केलें ? आईविना उपाशी मरणाऱ्या वासरांच्या हंबरड्यांनी तूं इतका बेचैन झालास ? तुडवून आणि मुरगाळून निघालेल्या महाराष्ट्राच्या भूमीने तुला हा भयंकर मंत्र दिला ? काय ? तुला त्या आडदांड सह्याद्रीने फूस दिली ? सूड शिकविते आई तुझी ?

होय ! नक्की ! त्यांनीच, त्यांनीच तुझ्या डोक्यांत हें बंड पेटवलें ! ते पाहा, भग्न मंदिरांतून, सह्याद्रीच्या दऱ्यांतून, स्मशानांतून, खाटीक-खान्यांत मारल्या गेलेल्या गाईंच्या हाडांतून, महाराष्ट्राच्या तप्त जमिनींतून आणि तुझ्या आईच्या उष्ण श्वासोच्छ्वासांतून उठणारे ते भयंकर तळतळाटाचे आक्रोश इतिहासाला स्पष्ट ऐकूं येत आहेत.

‘ शिवबा ! शपथ आहे आमच्या आत्म्यांची तुला ! जाऊं नकोस तूं त्या सुलतानांच्या दरबारांत ! तुझ्या आई–वडिलांशिवाय, संत–सज्जनांशिवाय, शंभू–भवानीशिवाय कोणापुढे मान वाकविलीस तर शपथ आहे तुला ! तुझा स्वामी कोण ? शिखर–शिंगणापूरचा राजा तो शंभू महादेव तुझा स्वामी ! ती सिंहारूढ जगन्माता तुळजाभवानी तुझी स्वामिनी. तुझ्याच भूमीची तुलाच वीतभर भीक घालणारे हे सुलतान कोण ? वैरी, वैरी तुझे ! त्यांना मुजरा करशील तर तुझ्यासारखा स्वामिद्रोही तूंच ! कारण तूं स्वतंत्र राजा व्हावेंस म्हणूनच पार्वती–परमेश्वराने तुला जन्म दिला आहे. शिवबा, तूं स्वतंत्र राजा हो. नव्हे तूं नुसता आरंभ कर. अरे, हा ज्वालामुखींतून जन्माला आलेला अजस्त्र सह्याद्रि तुला पहिला मुजरा घालून तुझ्या पाठीशीं उभा राहील ! आपल्या पोटांत हिमालयालाहि एका चिमटीने सहज पचवूं शकेल अशा प्रलयंकारी सामर्थ्याचा हा पश्चिम समुद्र गर्जत गर्जत हजारो

तुफान लाटांनी तुला मुजरे करील. तुझ्या बंडाचा जयजयकार करील !

शिवबा, अरे हे सुलतान कोण ? ज्ञानेश्वरांच्या समाधीवर चिरा बसवल्यापासून आजपर्यंत, गेलीं साडेतीनशें वर्षे या सुलतानांनी काय सैतानी थैमान घातलेंय तें आठव ! महाराष्ट्राच्या या साडेतीनशें वर्षांच्या किंकाळ्या एकत्र केल्या तर विश्वांतल्या ग्रहगोलांचा भ्रमण-ध्वनीहि त्यापुढे फिका ठरेल ! मराठ्यांच्या मायबहिणींचे या साडेतीनशें वर्षांतले सूडाचे उकळते अश्रु एकत्र केले तर ज्वालामुखींतून उसळणारा लाव्हा रसहि त्यांपुढे शीतल ठरेल ! शिवबा, हे दुष्ट सुलतान केवळ दानव ! संतसज्जनांचे, गरिबांचे, सद्धर्माचे, संस्कृतीचे काळ ! यांच्या माथीं युगायुगांचीं पृथ्वीचीं पापें ! तूं मुजरा करणार त्यांना ?

तूं प्रभु रामचंद्राच्या कुळीं जन्मला आहेस. रामाने रावणाला ठार मारून धर्म तारला. तो खरा क्षत्रियकुलावतंस होता. तूं आहेस त्याच्या बीजाचा अंकुर ! तूं सुलतानांची, दैत्यांची सेवा करणार ? आठव, असेच मुजरे करणाऱ्या तुझ्या आजोबांना आणि तुझ्या मामांना देव-गिरीवर कोणीं आणि कां ठार मारलें ? तुझ्या प्रत्यक्ष वडिलांना आलेले अनुभव विचार तुझ्या पंतांना आणि आईसाहेबांना !

शिवबा, तुझ्या वडिलांना बादशाहाची नौकरी करावी लागते आहे म्हणून वडिलांविषयी विकल्प धरूं नकोस ! निरुपाय झाला आहे त्यांचा. स्वतंत्र सिंहासन स्थापण्यासाठी त्यांनी फार फार धडपड केली. सहा वर्षे तर जिवाचें रान केलें. पण नाही त्यांना यश आलें. त्यांचें मन तूं ओळख. आई–वडिलांचें मन ओळखत नाही तो पुत्र कसला ? आई–वडील देवाच्या ठिकाणीं असतात. शहाजीराजांना पुरतें ओळख ! तूं बादशाहीचा मुजरेबाज हुजऱ्या झालेला तुझ्या आईला तर आवडणार नाहीसच. पण तुझ्या वडिलांनाहि आवडणार नाहीस ! तूं सुलतानापुढे लवलास तर तुझे वडील एकांतांत कपाळाला हातच लावतील.

ओळख त्यांना ! त्यांचीहि इच्छा अशीच आहे की तूं मराठ्यांचा स्वतंत्र राजा व्हावेंस ! महाराजाधिराज ! सिंहासनाधीश्वर ! नृपति ! भूपति ! छत्रपति ! तुला त्यांचे, संत–सत्पुरुषांचे, गोरगरिबांचे, तीर्थोदकांचे, चंद्र–सूर्यांचे आशीर्वाद आहेत ! चल, शिवबा ! चल ! लौकर चल, पुण्याला चल. सह्याद्रि तुझी किती आतुरतेने वाट पाहातो आहे. मावळचीं दरी-खोरीं, गुहा, अरण्यें, भुयारें, देवळें, चोरवाटा, कडेकपारी, खिंडी आणि तेथील अंधार अन् तेथील मध्यरात्री तुझ्यासाठी खोळंबून बसल्या आहेत ! तुझे ते ज्ञात आणि अज्ञात छोटे छोटे लंगोटीवाले सौंगडी, दोन्ही हातांच्या मुठींमध्ये हनुवटी ठेवून, डोंगरदऱ्यांत तुझी वाट पाहात टपून बसले आहेत केव्हांचे ! लौकर चल ! शिवबा, लौकर चल !

* * *

---

**आधारः**—(१) शिभा ९।३२ व ३३; जेधेकरिणा. (२) शिभा ९।३४ व ३५. (३) शिभा ९।४४. (४) शिभा ९।४५ ते ५९. (५) सभासद पृ. ६७. (६) रामाचंपू. (७) शिवदिग्विजय. (८) शिभा १०।१३. (९) विनसा गौरव ग्रंथ, प्रा. शेजवलकरांचा लेख (१०) चिटणीस ब. (११) शिभा १०।४१. (१२) परमानंद काव्य, सभासद. (१३) ऐफासा ४।१; शिभा ११।३ ते १०. (१४) शिभा ११।८.

यांशिवाय पुढील भाग अवश्य पाहावेत. शिभा १०।१३ ते १८, सभासद ब. पृ. ६, चिटणीस ब. पृ. २७-२८, शिभा १९।२८ ते ३०, शिभा १७।२१, मंडळ अह. १८३४ पृ. ८८, सभासद ब. पृ. ४९, ऐ. पोवाडे भा. १ पृ १८, हे सर्व पुरावे शिवबाची स्वाभिमानी व बादशाहाला मुजरा न करण्याबाबतची वृत्ति समजण्यास उपयोगी पडतील.



## ४ : मावळच्या दऱ्याखोऱ्यांत !

हें तेज अंधारांत कोंडतां येणार नाहीं, हें शहाजीराजांनी स्पष्ट ओळखलें. त्यांना त्यांत आनंदच वाटला. शिवबाचा जन्मच वेगळ्या काजासाठी असावा. मराठ्यांचीं देवालयें, संसार, तीर्थक्षेत्रें, धर्म आणि गोब्राह्मण यांचें संरक्षण करण्यासाठीं शिवबाला हृदयस्थ नारायणाचीच प्रेरणा असावी खास ! शिवबा स्वयंप्रकाशी आहे. कदाचित् मराठी मुलखाचें विधिलिखित भव्य असेल ! जें आपल्याला साधलें नाही, तें कदाचित् शिवबा साधील. श्रीकुलदेव भवानीशंकराचीहि इच्छा तशीच दिसते. शिवबा महाराष्ट्राच्या धर्माकरिता तोफेच्या तोंडीं जाईल; पण सबंध दख्खनची दौलत जहागीर म्हणून दिली तरीहि तो बादशाहाचा गुलाम होणार नाही. हें उघड सत्य त्याच्या रोजच्या वागणुकींत दिसत आहे. शिवबाला पुण्याच्या डोंगरदऱ्यांतच सोडावा हें चांगलें. असा विचार शहाजीराजांनी केला.[1]

शिवबालाहि असें झालें होतें की, केव्हा एकदा हें विजापूर सोडतों. ते लाचार स्वकीय सरदार, धर्मभाषासंस्कृति आणि स्वजन यांची ती कुतरओढ त्याला साहवेना. राजांनी शिवबाच्या पाठवणीची तयारी केली. त्यांनी शिवबाबरोबर आणखी कांही हुषार कर्तबगार मंडळी द्यावयाचें ठरविलें. ही मंडळी देतांनाहि राजांची दृष्टि व भावना स्पष्ट व विशाल होती. निघण्याची तयारी झाली. राजांनी शामराज नीलकंठ रांझेकर

यांना ' पेशवे ' करून शिवबाबरोबर दिलें. बाळकृष्णपंत हणमंते यांना ' मुजुमदार ' करून दिलें. सोनो विश्वनाथ यांस ' डबीर ' करून दिलें. रघुनाथ बल्लाळ अत्रे यास ' सबनीस ' करून दिलें.[२] म्हणजे पेशवा, मुजुमदार, डबीर इत्यादि हुद्दे देऊन ही अनुभवी व निष्ठावंत मंडळी शिवबाबरोबर देण्यांत राजांनी शिवबाला राज्याचें जणू मंत्रिमंडळच बनवून दिलें ! शहाजीराजांच्या पदरीं अनेक प्रकारचे हुद्दे धारण करणारे कारभारी होते, अधिकारी होते. परंतु त्यांत कोणालाहि ' पेशवा' हा हुद्दा नाही. शिवबाबरोबर मात्र राजांनी ' पेशवा ' दिला. पेशवा म्हणजे मुख्यप्रधान—पंतप्रधान.

अशा प्रकारें विश्वासु अमात्य,[३] कांही हत्ती, घोडे, खजिना व हुशार व अद्वितीय कर्तृत्वाचे सेवक राजांनी शिवबाबरोबर दिलें.[२] बाळाजी हरि 'मजालसी' व नरहर बल्लाळ 'बक्षी' यांसहि बरोबर दिलें.[६] शिवाय राजांनी शिवबास ध्वज दिला.[४] पंत तर बरोबर होतेच. राजांनी पंतांच्या कामगिरीवर खूष होऊन त्यांचें वर्षासन वाढवून दिलें.अन् शुभ मुहूर्त पाहून पंत दादाजी कोंडदेव, जिजाबाईसाहेब व शिवबा यांची पुण्यास रवानगी केली.[२]

शिवबा येत होता तो पूर्वीपेक्षाहि प्रज्वलित होऊन. त्याच्या लहानशा डोक्यांत केवढे प्रचंड किल्ले बांधले जात होते. घोडदळें दौडत होतीं. तोफा धडाडत होत्या. झेंडे फडकत होते. तलवारींना धारा लागत होत्या. चक्रें फिरत होतीं. ठिणग्या उडत होत्या. मुजरे झडत होते. हुकूम सुटत होते. नौबती कडाडत होत्या. शिंगें ललकारत होतीं. आणि शिवबा पुण्याकडे दौडत होता. त्याच्या कमरेचा शेला आणि अंगरख्याची झालर वाऱ्यावर उडत होती. मस्तकावरचा मोत्याचा तुरा बेपर्वा हिन्काळत होता. शामराजपंत पेशवे, बाळकृष्णपंत मुजुमदार, रघुनाथपंत अत्रे, आणि पंतहि टाचा मारीत होते. आईसाहेबांचा मेणा कर्रकर्र वाजत धावत होता. पुणें ! पुणें ! एकच वेध. पुणें ! पुणें !

स्वारी पुण्यांत दाखल झाली. लाल महाल पुन्हा गजबजला.

पंतांचा कारभार पुन्हा सुरू झाला. सत्तर वर्षांचे पंत कात टाकून उठले ! त्यांच्या मनांत बारा मावळें घोळूं लागलीं. म्हातारा बिघडला ! पंत वास्तविक थकले होते. त्यांच्या निम्याहून अधिक गोवऱ्या स्मशानांत गेल्या होत्या. पण त्या गोवऱ्याहि माघारी फिरल्या ! आता पंतांना मरायला इतक्यांत सवडच नव्हती !

नव्या दौलतीचा थाट मांडण्याच्या ईर्षेने पंत कामाला लागले. शिवबाला बरोबर घेऊन मावळांत पंत फिरूं लागले. महाराष्ट्राचें बळ सह्याद्रीच्या डोंगरांत आहे. मावळच्या दऱ्याखोऱ्यांतले मराठी देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी आपल्याशीं निष्ठेने बांधले गेले तर मावळपट्टी बादशाहालाच काय, यमालाहि अजिंक्य आहे. बस्स ! हे सारे देशमुख आपल्या शिवराजाच्या पायाशीं आणून बसवणें हेंच आपलें काम, असें ठरवून पंत उद्योगाला लागले. ते स्वतः शहाजीराजांच्या पुणें अर्जानी मोकाश्याचे कारभारी होतेच. शिवाय सुभे किल्ले कोंढाण्याचे नामजाद सरकारी सुभेदार असल्यामुळे त्यांचा दरारा, वजन, धाक सारें कांही जबर होतें.[५]

मावळांत एकेका खोऱ्यांत एकेक देशमुख जबरदस्त बनून राहिला होता. विशेषतः लढायांच्या बेबंद काळांत ( इ. १६०५ ते १६३६ ) या देशमुखांनी मावळांत फारच धाक बसविला होता. एका देशमुखाचें वतन दुसऱ्या देशमुखाच्या वतनाला लागून होतें. स्वाभाविकच आहे. बारा मावळें एकमेकांना लागूनच आहेत. हे देशमुख वतनांच्या, भिकार मानापानाच्या आणि स्पर्धेच्या इतके कमालीचे आहारीं गेलेले होते की, त्या हेव्यादाव्यांतून जे भयंकर व भीषण प्रकार घडत ते ऐकूनच अंगावर काटा उभा राहावा ! या देशमुखांच्या कागदपत्रांपैकी निम्मीं कागदपत्रें या भांडणांचीं, खूनमारामाऱ्यांचीं, जाळपोळींचीं आणि

बादशाही सुभेदारांपुढे लोटांगणें घालीत केलेल्या अर्जांचीं सापडतात.[१२] एकाहि देशमुखाचें असें, बिनभांडणाचें बिनरक्तपाताचें, बिनखुनाकत्तलीचें घराणें नाहीं. प्रत्येकाचे हात आपआपसांतल्या रक्तपाताने लाल झालेले ! हे सह्याद्रींतले बलवान् वाघ, एकमेकांचीं नरडीं फोडीत होते. आणि सेवा करीत होते एकनिष्ठेने बादशाहाची !

उत्रवळीचे खोपडे देशमुख व कारीचे जेधे देशमुख एकमेकांवर जीव खाऊन तुटून पडत. कान्होजी जेध्यांच्या जन्माआधीची कथाहि अशीच. कान्होजींच्या चुलत्यांनी व घरच्या इतर मंडळींनी एकदा खोपड्यांचा अगदी अचूक दावा साधला ! खोपडयांच्या घरीं एक लग्नकार्य निघालें. करनवडे मुक्कामीं लग्नाची तीथ ठरली. खोपड्यांची सोयरीक निचळांशीं ठरली होती. वऱ्हाडें जमलीं. लग्नाची गर्दी उडली. आणि जेध्यांनी अकस्मात् जाऊन लग्नावरच घाला घातला ! साफ लग्नच कापून काढलें खोपडयांचें ! साठ माणसें ठार केलीं ! त्यांतून बायकाहि सुटल्या नाहीत.[११] पूर्वी खोपडयांनी आप्पाजी जेध्याला गाडेखिंडींत गाठून कापून काढलें होतें, त्याचा हा सूड !

चोरघे आणि शिळमकर देशमुखांचेंहि असेंच वैर. बायकामुलांच्या कत्तली करणें, घरें खणून काढणें, वतनाचे कागद पळविणें, उभीं शेतें व घरें जाळून भस्म करणें, वगैरे रम्य प्रकार चालू होते ![१३] असे प्रकार कुणाकुणाचें अन् किती किती सांगावे ?

याशिवाय प्रत्येक घराण्यांत खास भाऊबंदकी चाले ती तर भयानकच होती ! सर्व प्रकार त्यांत चालत. मुख्य महत्त्वाचा मुद्दा, कांहीहि करून भाऊबंदाला उखडून वतन उपटणें हाच असे ! मग त्यांत रक्ताच्या धाराच वाहात.[१८] शिरवळचे निगडे देशमुख मल्हारराव आप्पा असेच कापले गेले.[१४] पण असे कित्येक ! कानदखोऱ्यांत बळवंतराव देशमुखाने छापा घालून 'वैऱ्याचीं' माणसें जखमी केलीं. बायकांना

कधींच सुटका मिळत नसे ! त्या मरतच. बळवंतरावान दावेदारांचीं घरें पेटविलीं. त्यांत दहा बैलगाडया, दहा म्हशी व म्हशींचीं आठ पारडीं जळून गेलीं.[१५]

मरळ देशमुखांनी लग्नांतल्या गोंधळास बोलावून आपले दावेदार ठार मारले. धानेब नांवाच्या गावांत हें घडलें. एक गरोदर स्त्री व लहान पोरेंहि कापून काढण्यांत आलीं !

एकेकाने दहा बारा खून पाडणें म्हणजे कांहीच विशेष नसे ![१७] पण या आपसांत गळे कापणाऱ्या देशमुखांना कां नांवें ठेवायचीं ? मोठे मोठे नामवंत सरदार झुंजत नव्हते का आपापसांत ? कुणी मानाच्या सुपारीसाठी तर कुणी अपमानाच्या हत्तीसाठी ! जाधवराव आणि भोसले........ ! आठवतें ना ?

कां महाराष्ट्र गुलामगिरींत राहूं नये ?

पंतांनी हें जाणलें. शहाजीराजांनाहि या देशमुखांची दांडगाई ठाऊक होती.[१९] मावळच्या देशमुखांत दोन देशमुख मात्र खरोखरच चांगले होते. एक म्हणजे बाजी पासलकर आणि दुसरे कान्होजी जेधे. कान्होजी जेधे तर राजांपाशी कर्नाटकांत पदरींच होते. बाजी पासलकर पौडजवळच्या तव गावांत राहात. मोसें गावांतहि त्यांचा वाडा होता. बाजींच्यासारखा शूर, दिलदार व सज्जन माणूस मोसेंखोऱ्यांत दुसरा नव्हता. बाजींचें फार वजन होतें त्या भागांत. त्यांना लोक फार मानीत.[२०] अनेकांच्या भांडण–तंट्यांचे निवाडे बाजींनी केले होते. एखाद्याच्या घरचा कर्ता पुरुष भाऊबंदकीच्या तंट्यांत ठार झाला अन् जर त्याच्या बायकापोरांना कुठे आधार राहिला नाही, तर बाजी आपल्या घरीं त्या बायकापोरांना आधार देत. बाजींना ‘यशवंतराव’ असा पिढीजात किताब होता. ते कोणा गरजवंताला कर्ज मिळवून

देत. कुणाला संकटांत मदत करीत. कुणाचें लग्न करून देत. बाजी म्हणजे मोठें थोरलें वडाचें झाडच. त्याची सावली सर्वांना.

बाजींचें शरीर फारच दांडगें होतें. मोठ्यामोठया मिशांमुळे त्यांचा थाट अधिकच भरदार दिसे.[३४] त्यांना तालमीचा मोठा छंद. अनंता खुर्चुले म्हणून एक शिंप्याचा पोरगा त्यांनी सांभाळला होता. हा अनंता तालीमबाज होता मोठा. बाजी त्याची खाण्याची व दुधाची मोठया हौसेने काळजी घेत. शिवाय त्यांनी चौदा शूर रजपूत व शंभर नोकरचाकर पदरीं ठेवले होते. बाजींचा वाडा गजबजलेला असे. येल्या मांग म्हणून एक अत्यंत शूर मांग व खंड्या महार नांवाचा तितकाच शूर महार त्यांच्या पदरीं होता. हे दोघे फार निष्ठेचे होते. बाजींच्या जवळ एक घोडी होती. ती अत्यंत अप्रतिम होती. तिचें नांव यशवंती. ही यशवंती बाजींच्या घरून पळवून नेऊन विजापूरच्या बादशहाला अर्पण करण्याचा बेत सोनू दळवी व मरकतराव या दोघांनी एकदा ठरविला. हा मरकतराव प्रत्यक्ष बाजींचा जावईच होता. सोन्या दळव्याने व जावयाने बाजी जेवण्यांत गुंतले आहेत असें पाहून वाड्यावर पांचशे लोकांनिशी छापा घातला. थोर झटापट झाली. आणि येल्या मांगाने दळव्याला ठार केलें. खुद्द बाजींनी प्रत्यक्ष जावयाला धरणीवर पाडलें. बाकीचे हल्लेकरी लोक आपले म्होरके पडलेले पाहून पळून गेले.[३४] अन् मग यमाजी नांवाच्या शाहिरानें बाजींचा पोवाडा गाइला. हा पोवाडा यमा शाहिराने स्वतःच रचला होता.

बाजींना दोन बायका होत्या. एक अंबाई. दुसरी बिंबाई. संसारहि तसाच भारदस्त होता.[१६]

पंतांनी अशा बाजी पासलकरांना आपल्या मायेंत घेतलें. आणि बाजी चटकन् मायेंत आले. शिवबावर बाजींचें प्रेम जडलें. इतकें की बाजी लौकरच शिवबाचे जिवलग सौंगडी बनले. शिवबाने बाजींना

ळा लावला. बाजींचा शूर खासनीस कावजी मल्हार हाहि बाजींच्या बरोबर होताच.

बाजींच्या भारदस्त मदतीचा परिणाम हळू हळू होऊं लागला. हलके हलके पंतांनी एक एक मावळें खोरें पोखरीत आणले. सारे देशमुख पंतांना मानूं लागले. देशमुखांतल्या भांडणांचे निवाडे मोठ्या दूरदर्शीपणें व निस्पृहपणें पंत करूं लागले. मोठे निवाडे गोतसभा भरवून गोतमुखाने ते करूं लागले. शिवबाच्या गादीपुढे निकाल होऊं लागले. भांडणें तुटत चाललीं. रोहीडखोऱ्यांतलीं भांडणें अशींच संपलीं. गुंजण मावळांतलींहि भांडणें मिटलीं.

पण कांही नाठाळ प्राणी होतेच. खेडेबाऱ्यांतला रामाजी चोरघे हा असाच नाठाळ निघाला. दांडगाईची सवय झालेली. तो पंतांना जुमानीना. लवाड्या करूं लागला. पंतांनी बघितलें बघितलें आणि एक दिवशीं त्यांनी रामाजी चोरघ्याला ठार केलें ![२१]

पंतांच्या या फटक्याने मावळें चपापलीं ! रामाजी चोरघ्याचा भाऊ चिटोजी चोरघे तर पंतांच्या दहशतीने फरारीच झाला. हें पाहून मात्र पंतांनी त्याला अभय दिलें व पुन्हा सुखरूप त्याच्या घरीं पावतें केलें.[२२]

फुलजी नाईक शिळमकर हा एक असाच नाठाळ भेटला. केलेला न्याय ऐकेना. पंतांनी कित्येक मध्यस्थांच्या मार्फत त्याला समजावून पाहिलें. तरीहि ऐकेना. मग पंतांनी एक दिवशी त्याला बांबूने सरळ झोडपलें.[२३] न्याय, अंमल, शिस्त आणि प्रतिष्ठा प्रस्थापित करतांना आरंभीच्याच काळांत जर अशी घातकी गुंडागिरी कडकपणें मोडली नाही, तर अंमल कधींच धड बसणार नाही. अंमल म्हणजे पोरखेळ नव्हे, हें दाखविण्यासाठी पंतांना हे कडक उपाय योजणें भाग होतें.

आणखी एक नाठाळ देशमुख पंतांना भेटला. त्याचें नांव कृष्णाजी नाईक बांदल. बांदलाने तर भोर परगण्यांत दांडगाईच मांडली होती.

तो जबरदस्तीने स्वतःच कर वसूल करूं लागला होता ! त्याच्या गुंडगिरीला वाढतें भरतें आलें. त्याच्याविरुद्ध तक्रारी सुरू झाल्या. पंतांनी त्याला असें न करण्याबद्दल फार सांगितलें. पण तो असा रगेल होता की, त्याने कोणाच्या न कळत पंतांच्या घोड्याच्या शेपट्याच साफ छाटून टाकल्या ! परंतु तरीहि त्यांनी कृष्णाजी बांदलाला धरणें पाठवून कोंढाणा किल्ल्यावर आणलें. पुन्हा त्याला खूप समजावून सांगितलें. तरीहि तो ऐकेना. मग पंत तडकले ! पंतांनी त्याचे हात आणि पाय खाडकन् कलम केले ! [२४]

पंत असे होते ! त्यांच्यासारखे भयंकर तेच. त्यांच्यासारखे मायाळूहि तेच.

कानद खोऱ्यांतले झुंजारराव मरळ देशमुख, गुंजण मावळांतले हैबतराव शिळमकर देशमुख, मोसे खोऱ्यांतले बाजी पासलकर देशमुख, खेडेबाऱ्याच्या शिवगंगा खोऱ्यांतले कोंडे देशमुख, मुठे खोऱ्यांतले पायगुडे देशमुख, कर्यात मावळचे विठोजी शितोळे देशमुख, रोहीड खोऱ्यातले जेधे देशमुख, खोपडे देशमुख वगैरे मंडळी पंतांनी मायेंत आणली. पंतांनी त्यांच्यांतील आपापसांतला गळेकापूपणा आटोक्यांत आणला.

पंतांबरोबर शिवबा मावळांतून, डोंगरांतून, रानावनांतून हिंडे. प्रत्येक गोष्टीची प्रत्यक्ष माहिती तो स्वतः करून घेई. माणसांच्या गुणावगुणांची पारख त्याला इतकी अचूक होऊं लागली की, कसलेल्या जवाहिऱ्या–प्रमाणेच लोकस्थिति व देशस्थिति त्याच्या बरोबर ध्यानांत आली. 'धाकुटपणापासून, देशांत मिरासदार कोण, गैरमिरासदार कोण हें तो जाणताती ! [२५] आणि आमच्या शिवबाराजांची बुद्ध तर अशी तल्लख की माणसाचें माणूस वलखताती !' एवढ्याशा वयांत त्याची बुद्धि भाल्यासारखी तीक्ष्ण होती. पुढच्या चार गोष्टी आधी लक्षांत येत

त्याच्या. शरिरानेहि तो खणखणीत बनला होता. तो पोरांत पोरासारखे अन् थोरांत थोरासारखें वागे. शिवबांचें हें शहाणपण पाहून पंतांना फार धन्यता वाटे. पंतांचें मन म्हणे, बाळा, तूंच हो ह्या मुलखाचा राजा, पण जरा काळजीने वाग ! गनिम फार दगाबाज आहे.

पंतांच्या प्रत्येक कृतीचें केंद्र शिवबा होता. ते जणू प्रत्येक घास आणि प्रत्येक श्वास शिवबाची आठवण करूनच घेत.

पंतांच्या बरोबर मावळांतून हिंडतांना शिवबाची चौकस गरुड नजर भिरीभिरी सभोवार फिरत असे. मावळांतलीं तरुण पोरें कावऱ्या-बावऱ्या नजरेने दुरून दुरून मुजरे करीत. लांब लांब उभीं राहात. बावळट आणि दरिद्री दिसत तीं. पण अंगाबांध्याने अशी टणक अन् चिवट असत की जशी पेरूच्या झाडाचीं खोडें. मुजरे करणारांचे मुजरे शिवबा किंचित् हसून स्वीकारी. मुजरा करणारांचें काळीज एवढ्यानेच पान्हवून जाई. इतक्या मायेने मुजऱ्याची दखल घेणारे पूर्वी नव्हतेच कुणी. पूर्वी बादशाही सरदार मावळांत येत, पण लाथा झाडीत झाडीत येत.

अगदी नेमका गडी शिवबाच्या नजरेंत भरे. त्याला शिवबा हसून जवळ बोलावी. राजाने आपल्याला बोलावलें हा आनंद, कशाला बोलावलें ही उत्सुकता आणि आपलें कांही चुकलेंमाकलें तर नाही ना, ही भीति त्या गड्याच्या काळजांत उभी राही. पण शिवबा गोड हसे अन् मग समोर उभा असलेला पोरगा आनंदाने विरघळूनच जाई. असे हुडकून हुडकून शिवबाने दोस्त जमा केले. साध्या गरीब मावळी शेतकऱ्यांचीं हीं पोरें. तान्हाजी मालुसरे, सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, सूर्याजी काकडे, शिवाय बाजी जेधे, सोनोपंत डबिरांचा मुलगा त्र्यंबक सोनदेव, बापूजी मुद्गल देशपांड्यांचीं मुलें नारोबा, चिमणाजी व बाळाजी, रोहीडखोऱ्याच्या नरसप्रभु गुप्ते यांचा मुलगा दादाजी

वगैरे सौंगडी शिवबाच्या भवती जमा झाले. हे सगळेजण अगदी एकाच वयाचे नव्हते. थोडे वर खाली होते. सर्वांत वयाने मोठे बाजी पासलकर. आजोबाच! वय बहुधा पासष्टीच्या आसपास. कारण कान्होजी जेध्यांचा जन्मच बाजींच्या घरीं झाला. तेव्हा बाजी तरुण व स्वतः देशमुखीचा कारभार पाहात होते. बाजींनी आपली सावित्री नांवाची मुलगी कान्होजींनाच देऊन जावई करून घेतलें. सर्जेराव जेधे हा या सावित्रीपासून कान्होजींना झालेला मुलगा ( जन्म दि. ६ नोव्हें. गुरुवार इ. १६२८ ). म्हणजे बाजींचा नातू शिवबापेक्षा सव्वा वर्षाने मोठा होता![२६] पण बाजी या पोरवड्यांत सामील झाले होते. जिगरदोस्त. अगदी, शिवबाकरिता तो सांगेल तेव्हा प्राण देण्याची तयारी करून!

शिवबाची ही सर्वच दोस्तसेना अगदी अशी होती की...तूर्त उपमा सुचत नाही. या दोस्तांचीं लाल महालांत पाउलें पडलीं. लाल महालांतील वातावरणांत कांही एक विलक्षण जादू भरलेली होती. आईसाहेबांची प्रसन्न, प्रेमळ आणि कळकळीची वागणूक व नितांत धर्मनिष्ठा; सोनोपंत डबीर, रघुनाथपंत अत्रे, बाळाजीपंत मेंडजोगी वगैरे कारभाऱ्यांचा भारदस्तपणा आणि पंत दादाजी कोंडदेवांचा करडा धाक यांमुळे लाल महालांत कांही वेगळेच संस्कार होत.


तान्हाजी, येसाजी, बाजी वगैरे मंडळी मावळांतील ऐन गाभ्यांतील होती. त्यांच्यामुळे मावळांतील इतर जवानांची संगत लाल महालाशीं जडली. आपल्या या आडदांड आणि व्रात्य सौंगड्यांना घेऊन शिवबा हत्यारांचे हात करी. घोडदौड करी. निरनिराळे आडमार्ग, डोंगरांतील गुहा, खिंडी, घाट, दऱ्या, चोरवाटा इत्यादि हेरून काढी.

हळू हळू ही दोस्त मंडळी शिवबाकरिता वेडी होऊन गेली. शिवबावर त्यांची अढळ भक्ति जडली. ती घरेंदारें विसरली. शिवबाकरिता

काळीज कापून द्यायलाहि हीं पोरें तयार झालीं. खुशाल रात्रीं, अपरात्रीं, वाटेल त्या अवघड जागीं, कशाचेंहि भय, पर्वा न ठेवतां तीं घोडा फेकूं लागलीं. शिवबाच्या व आईसाहेबांच्या मनांतलें महाभारत या सौंगड्यांच्या मनावर उमटूं लागलें. शिवबा म्हणजे त्यांना शिवाचा केवळ अवतार वाटूं लागला. दिल्ली नि विजापूरचे बादशाह त्यांना शुद्ध राक्षस वाटूं लागले. बादशाही अंमलाविषयी तीव्र तिटकारा त्यांच्या मनांत निर्माण झाला. शिवबा तुळजाभवानीच्या ठायीं किती तल्लीन होऊन जातो हें त्यांना प्रत्यक्षच दिसत होतें. त्यांची खात्री झाली होती की, आई भवानी आपल्या शिवबाराजाला प्रसन्न हाये !

...ालय ठाणे
८९१५

*स्वराज्याचीं स्वप्नें मावळच्या दऱ्याखोऱ्यांतून रंगूं लागलीं......*



शिवबा आपल्या या मित्रांवर तर अगदी भावासारखें प्रेम करी.[३६]

आणि त्यांच्या मनांतून बादशाहीचें भय पार उडालें ! त्यांचें ठरलें ! शिवबाचेंच आता राज्य करायचें ! मग त्या पायीं मरायचेंसुद्धा ! पण बादशाही उडवायची, अशी त्यांची आण ठरली. शिवबाची जगदंबेवर नितांत निष्ठा होती. तो आपल्या जिवलगांना म्हणे,[२७]

‘ येथे आपलें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे ! ’

मग देवदर्शनासाठी कधी आळंदी, कधी जेजुरी तर कधी मोरगांव गाठण्यासाठी घोडे पुण्याहून दौडत सुटत. रात्र असो वा मध्यरात्र असो. वेळेचें, भुकेचें, तहानेचें वा थंडी पावसाचेंहि भान नाहीसें झालें होतें. या पोरांच्या ओठांवरती काळी किनारहि अजून उमटलेली नव्हती. अन् स्वप्नें रंगत होतीं स्वराज्याचीं !

पंतांना शिवबाचे व त्याच्या पोरांचे हे उद्योग कळत होते. दिसत होते. पण ते लक्षपूर्वक दुर्लक्ष करीत ! कारण त्यांनाहि तेंच हवें होतें ! पंत स्वतः बारा मावळांत हाच डाव टाकीत होते. शिवबाच्या नांवाने जहागिरीचा कारभार सुरू झालेला होता. शहाजीराजांचें पाठबळ सावधगिरीच्या सूचनांसह होतें. आता शिवबाची मुद्रा तयार झाली. स्वतंत्र मुद्रा ! राजमुद्रा ![२८] ही मुद्रा अष्टकोनी होती. त्याची मोर्तबहि अर्थात् याच वेळीं तयार झाली. ही मोर्तब षट्कोनी होती.[२८]

*राजमुद्रा*



*मोर्तबी ’वर पुढील मजकूर होता.*

**म र्या**
**दे यं वि रा**
**ज ते**

शिवबा आणि पंत आपल्याबरोबर 'उनाड पोरांचं'[२९] टोळकं घेऊन कोंढाण्याचे बाजूस विजापूरकरांच्या बादशाही सुभ्यांत बेलाशक हिंडत. कडेकपाऱ्यांतून हेरगिरी, टेहळण्या करीत.

पंतांना व शिवबाला हें ठाऊकच होतें की, आपण बादशाहाच्या हातांतून राज्य हिसकावून घेण्याचा उद्योग आरंभिला आहे. तेव्हा आज नाही उद्या हें बंड बादशाहाला समजणारच. पण आपल्या 'गुप्त' मसलती मात्र कोणालाहि समजतां कामा नयेत. आणि त्यांच्या गुप्त मसलती या कानाच्या त्या कानाला कळतहि नसत.

पुण्याभवतीच्या कोटकिल्ल्यांची खडान् खडा माहिती त्यांनी मिळविली होती. चोरवाटा, भुयारें, तळघरें, दारूगोळा, हत्यारें, तसेच बादशाहाची फौज कुठे आहे, किती आहे, पहारे कुठे असतात, कुठे नसतात हें सर्व त्यांना टिप्पून ठाऊक झालें होतें.

पुण्याच्या दक्षिणेला पंचवीस कोसांवर भोर तालुक्यांत रायरेश्वर म्हणून अत्यंत पवित्र, रमणीय व प्राचीन असें शिवमंदिर आहे. रायरेश्वराची पिंडी स्वयंभू आहे. कारी व अंबवडें या जेधे–देशमुखांच्या गावांलगतच खूप उंच व अतिशय अवघड अशा सह्याद्रीच्या शिखरावर झाडींत हें मंदिर आहे. शिवबाला अशीं स्थानें फार प्रिय! तो तेथे दर्शनास जाई. त्याने व त्याच्या दादाजी नरसप्रभु गुप्ते या सौंगड्याने मिळून रायरेश्वराच्या पूजेअर्चेची व्यवस्था सुरू केली (दि २६ मे १६४२). शिवा जंगम नांवाच्या जंगम गृहस्थास त्यांनी पूजेसाठी नेमलें.[३०]

बारा मावळांत हिंडतांना पंतांबरोबर शिवबा असे अन् शिवबा-बरोबर त्याचे दोस्त असत. कांही देशमुख मनांतून पंतांवर व शिवबावर जळफळत असत. शिरवळला असलेल्या किल्ले सुभानमंगळमधील बादशाही ठाण्याच्या अमिनाला हें समजे. आणि मग शिवाजीसारखा

एवढ्या मोठ्या जहागीरदार बापाचा पोरगा, भिकार, उनाड, पुंड पोरांत खेळतो म्हणून ते हसत. त्यांना अंदरकी बात कुठे माहीत होती !

हळूहळू विजापुरांतहि ही गोष्ट जाऊन पोहोचली. शिवाजी उनाड व हलक्या लोकांच्या संगतींत असतो असें दरबारांतहि लोकांच्या बोलण्यांत येऊं लागलें. पोरगा व्यर्थ—वाया गेला असें त्या सर्वांना वाटूं लागलें ![२१] जहागीरदाराच्या पोराने अशा 'हलक्या', 'उनाड' लोकांच्यांत वावरावें हा काय वेडेपणा !

शिवबाच्या मित्रांचे उद्योग मात्र बारा मावळांत चालूच होते. मुलखाची व माणसांचीहि टेहेळणी चालू होती. आपले कोण, आपले कोण नाहीत, कोण आयत्या वेळीं पडल्या प्रसंगाला उपयोगी पडतील, कोण हरामखोरी करतील, कुठे पाळत राखली पाहिजे, हत्यारें कुठे मिळतील वगैरे टेहळून हेरून ठेवण्यांत हे 'हलके' व 'उनाड' लोक दंग होते !

आता जो तो आतुर झाला होता, शिवबा शिंग केव्हा फुंकतोय तें ऐकायला !

आणि शिवबा तेज साठवीत होता. तें त्याला देवी भवानीच्या व आईसाहेबांच्या सहवासांत मिळत होतें. आईसाहेबांच्या महान् धार्मिक, स्वाभिमानी व महत्त्वाकांक्षी वीरवृत्तीचा शिवबावर विलक्षण परिणाम होत होता.[३५] भवानीदेवी व आईसाहेब त्याला सारख्याच वाटत.

शिवबा आपल्या साऱ्या जिवलगांना राज्यव्यवहारास आवश्यक ते धडे आपल्या वागण्यांतूनच देत होता. त्या बाबतींत तो फार दक्ष होता. आजचे आपले हे मित्र उद्याचे राज्यकर्ते होणार असल्याची जाणीव तो स्वतःच्या वागणुकींतून नकळत देई. तो गोड बोले, प्रसन्न हसे, प्रेम करी, रागावत नसे. पण एके दिवशीं—

अनुक्रम २४४७८ दि. ...............
क्रमांक ........... नों: दि: ........... 12-2-59

शिवबा संतापला ! त्याला तें सहनच झालें नाही. हे असे प्रकार त्याला कल्पनेंतहि सहन होत नसत. अन् हा प्रकार तर प्रत्यक्ष पुणें जहागिरींत घडला. रांझ्यांत घडला. रांझें म्हणजे आईसाहेबांच्या खाजगी खर्चासाठी नेमून दिलेलें खेड–शिवापुराजवळचें गाव. पुण्यापासून नऊ कोसांवर.

रांझ्याच्या पाटलाने बदअंमल केला ! बाबाजी बिन भिकाजी गुजर पाटील हें त्याचें नांव. त्याने बदअंमल केला, म्हणजे एका परस्त्रीवर बलात्....! आणि शिवबाला हें समजलें ! परस्त्रीला केवळ आई मानणाऱ्या शिवबाच्या मुलखांत पाटलासारख्या एका जबाबदार सरकारी अधिकाऱ्याने

*स्वराज्याची नैतिक प्रतिष्ठा*



हा रावणशाही गुन्हा केलेला समजतांच तो संतापला. कदाचित् पाटीलकीच्या घमेंडींत कोणी असें वागेल अन् म्हणेल की, ' मी पाटील ! पिढीजात पाटील ! मला काय भ्या हाये कुनाचं ? माझ्या गावांत म्या काय बी करन । '

चालणार नाही ! जीभ छाटली जाईल ! स्वराज्याच्या जन्माआधीच जर असे हलकट चाळे आपले अधिकारी करतील तर स्वराज्य निर्माण झाल्यावर मग काय काय करतील ? स्त्री ही मराठयांच्या देव्हाऱ्यांतील देवता आहे. मग ती कोणत्याहि जातिधर्माची असो. आमच्या मुजऱ्याचा पहिला मान स्त्रीजातीला आहे. ती आई आहे !

तिचा अपमान ? मग रामायण वाचायचें कशाला ? रामराज्य हवें कशाला ? एका स्त्रीच्या प्रतिष्ठेकरिता सोन्याची लंका भस्म झाली. राक्षसकुलाचा संहार झाला. एका स्त्रीची भर राजसभेंत निरी ओढली गेली, म्हणून अठरा अक्षौहिणी सैन्याचा रणयज्ञ झाला. हें शिवबाचें स्वराज्य आहे ! स्त्रियांची प्रतिष्ठा सिंहासनारूढ करण्यासाठींच शिवबा कर्तव्याच्या रथावर चढला आहे ! तो आता प्रचंड शिवभारत घडविल्याशिवाय खाली उतरणार नाही !

शिवबाने ताबडतोब ढालाईत हशम रांझ्यावर रवाना केले. हशमांना हुकूम केला की बाबाजी पाटलाला जेरबंद करून हुजूरदाखल करा !

ढालाईत हशम रांझ्याच्या पाटलाला धरणें घेऊन आले. लोकांनी ओळखलें की पाटीलबुवांच्या वरातीला घोडें आलें !

पाटील गिरफ्तार झाला. पाटीलकीच्या मिशांचा पीळ झटक्यात् उलगडला. लोकांनाहि लाल महालातल्या न्यायी सदरेची ओळख पटली. आजपर्यंत अंमलदारांना सवडच मिळत नव्हती. बादशाही सरदार अन् अंमलदारच दुसऱ्याच्या पोरीबाळींवर छापे घालीत, तिथे अशा करणीला गुन्हा म्हणणार तरी कोण !

पण शिवबाच्या मोकाश्यांत अशी पापी इष्कबाजी पचणें अशक्य होतें. पाटलाला शिवबाच्या पुढे हाजीर करण्यांत आलें. शिवबाने गुन्ह्याची रीतसर चौकशी केली. गुन्हा शाबीत झाला! आणि शिवबाने कडाडून हुकूम सोडला, कोपरांपासून पाटलाचे दोन्ही हात आणि गुडघ्यापासून दोन्ही पाय तोडून टाकण्याचा!![३३] शिवाय पाटलाची पिढीजात पाटिलकी जप्त करण्यांत आली (दि. २८ जानेवारी १६४५). पाटलाचे हातपाय तुटले!

शिवबाला रागावलेलें लोकांनी पाहिलें! लोकांनी ओळखलें शिवबाला काय आवडतें आणि काय नाही तें!

* * *

---

**आधारः**—(१) शिभा १०।११ ते १८; सभासद पृ. ६ व ७. (२) सभासद बखर पृ. ७; शिभा १०।२५ ते २७. (३) शिभा १०।२५. (४) शिभा १०।२६. (५) शिचसा खं. ३।६३३ व ३५. (६) मंडळ त्रै. व ८ अं १ पृ. १००. (७) ऐफासा १।७. (८) शिचसा २।२२७. (९) राजखंड १७।३. (१०) शिचसा ५।९४७. (११) शिचसा २।३३८; राजखंड १६।१. (१२) शिचसा २।९३, ९८, २९६. (१३) शिचसा ३।६२४; राजखंड १७।२. (१४) शिचसा १।१२. (१५) राजखंड १६।१६. (१६) ऐ. पोवाडे १।३; भा. इ. सं. मं. अप्रकाशित कागद. (१७) राजखंड १५।३७९. (१८) शिचसा ५।८७८; शिचसा ७।३०. (१९) जेधे करीणा. (२०) राजखंड १६।१. (२१) शिचसा ३।६३४. (२२) शिचसा ३।६३५. (२३) राजखंड १७।२. (२४) ऐसंसा ४, पृ. ६७. (२५) पेशवे द. ३१।४१. (२६) जेधेश. (२७) राजखंड १५।२६८. (२८) बावडाद १।१६. (२९) मुधोघई ब. पृ. २३७; F. B. Shivaji—S. N. Sen, Page 173. (३०) राजखंड १५।२६६. (३१) ऐफासा १।४८. (३२) जेधे करीणा व शका. (३३) शिचसा २।२३९ अ. (३४) ऐ. पोवाडे १।३ (३५) S. Aurang, Part IV, Page 25. (३६) F. B. Shivaji—S. N. Sen, Page 211.



## ५ : सह्याद्रि

अग्नि आणि पृथ्वी यांच्या प्रणयांतून सह्याद्रि जन्मास आला.

अग्नीच्या धगधगीत उग्र वीर्याचा हा आविष्कारहि तितकाच उग्र आहे. पौरुषाचा मूर्तिमंत साक्षात्कार म्हणजे सह्याद्रि. त्याच्या आवडी-निवडी आणि खोडी पुरुषी आहेत. त्याचें खेळणें खिदळणेंहि पुरुषी आहे. त्यांत बायकी नाजुकपणाला जागाच नाही. कारण सह्याद्रि हा ज्वालामुखीचा उद्रेक आहे. अति प्रचंड. अति राकट. अति दणकट अन् काळा काळाकभिन्न. रामोशासारखा. पण मनाने मात्र दिलदार राजा आहे तो. आडदांड सामर्थ्य हेंच त्याचें सौंदर्य. तरी पण कधी काळीं कुणा शिल्पसोनारांनी सह्याद्रीच्या कानांत सुंदर आणि नाजुक लेणीं घातलीं. त्याच्या आटीव अन् पीळदार देहाला कुणाची दृष्ट लागूं नये म्हणून मराठी मुलखाने त्याच्या दंडावर जेजुरीच्या खंडोबाच्या आणि कोल्हापूरच्या ज्योतिबाच्या घडीव पेटया बांधल्या. त्याच्या गळ्यांत कुणीं सप्तशृंग भवानीचा टाक घातला. मनगटांत किल्ले–कोटांचे कडीतोडे घातले. पण सह्याद्रीला इतकें नटवलें सजवलें तरी तो दिसायचा तसाच दिसतो ! रामोशासारखा ! तालमीच्या मातींत अंग घुसळून बाहेर आलेल्या रामोशासारखा !

सह्याद्रीचा खांदाबांधा विशाल आहे. तितकाच तो आवळ आणि रेखीव आहे. त्याच्या घट्ट खांद्यांवरून असे कापीव कडे सुटलेले आहेत की तेथून खाली डोकवत नाही. डोळेच फिरतात ! मुसळधार पावसांत

तो न्हाऊं लागला की या खांद्यांवरून धो धो धारा खालच्या काळदरींत कोसळूं लागतात आणि मग जो आवाज घुमतो तो ऐकावा. सह्याद्रीचें हसणें खिदळणें तें! बेहोष खिदळत असतो.

पावसाळ्यांत शतसहस्र धारांखाली सह्याद्रि सतत निथळत असतो. चार महिने त्याचें हें महास्नान चालू असतें. काळ्यासावळ्या असंख्य मेघमाला त्याच्या राकट गालांवरून अन् भालावरून आपले नाजुक रेशमी हात फिरवीत घागरी–घागरींनी त्याच्या मस्तकावर धारा धरून त्याला स्नान घालीत असतात. हें त्याचें स्नानोदक खळखळ उड्या मारीत त्याच्या अंगावरून खाली येत असतें. त्याच्या अंगावरची तालमीची तांबडी माती या महास्नानांत धुऊन निघते. तरी सगळी साफ नाहीच. बरीचशी.

दिवाळी संपली की सह्याद्रीचा हा स्नानसोहळा संपतो. त्या हसऱ्या मेघमाला सह्याद्रीच्या अंगावर हिरवागार शेला पांघरतात. त्याच्या आडव्या भरदार छातीवर तो हिरवा गर्द शेला फारच शोभतो. कांचनाच्या, शंखासुराच्या, सोनचाफ्यांच्या व बिट्टीच्या पिवळ्या जर्द फुलांची भरजरी किनार त्या शेल्यावर खुलत असते. हा थाटाचा शेला सह्याद्रीला पांघरून त्या मेघमाला त्याचा निरोप घेतात. मात्र जातांना त्या त्याच्या कानांत हळूच कुजबुजतात.

‘आता पुढच्या ज्येष्ठांत मृगावर बसून माघारी येऊं हं! तोंपर्यंत वाट पाहा!’

रिकामे झालेले कुंभ घेऊन मेघमाला निघून जातात.

दाट दाट झाडी, खोल खोल दऱ्या, भयाण गुहा, अति प्रचंड शिखरें, उंच उंच सरळ सुळके, भयंकर तुटलेले ताठ कडे, अस्ताव्यस्त पसरलेलीं पठारें, भीषण अन् अवघड लवणें, घातकी वाकण, आड-वळणी घाट, अडचणीच्या खिंडी, दुर्लंघ्य चढाव, आधारशून्य घसरडे

उतार, फसव्या खोंगळ्या, लांबच लांब सोंडा, भयाण कपाऱ्या, काळ्याकभिन्न दरडी आणि मृत्यूच्या जबड्यासारख्या गुहा ! असें आहे सह्याद्रीचें रूप. सह्याद्रि बिकट, हेकट अन् हिरवट आहे. त्याच्या कुशी–खांद्यावर राहायची हिम्मत फक्त मराठ्यांत आहे. वाघांतहि आहे. कारण तेहि मराठ्यांइतकेच शूर आहेत !

सह्याद्रीच्या असंख्य रांगा पसरलेल्या आहेत. उभ्या आणि आडव्याहि. सह्याद्रीच्या पूर्वांगास पसरलेल्या डोंगरांमधील गली फार मोठमोठ्या आहेत. कृष्णा आणि प्रवरा यांच्या दरम्यान असलेल्या गल्ल्यांतच चोवीस मावळें बसलीं आहेत. दोन डोंगररांगांच्या मधल्या खोऱ्याला म्हणतात मावळ. एकेका मावळांत पन्नास पन्नास ते शंभर शंभर अशीं खेडीं नांदत आहेत.

प्रत्येक मावळामधून एक तरी अवखळ नदी वाहतेच. सह्याद्रीवरून खळाळणारें तीर्थवणी ओढ्यानाल्यांना सामील होतें. ओढेनाले तें या मावळगंगांच्या स्वाधीन करतात. सगळ्या मावळगंगा हें माहेरचें पाणी आपल्या ओंजळींत घेऊन सासरीं जातात. या नद्यांचीं नांवें त्यांच्या माहेरपणच्या अल्लडपणाला शोभतील अशींच मोठीं लाडीक आहेत. एकीचें नांव कानंदी, दुसरीचें नांव गुंजवणी, तिसरीचें कोयना. पण कांहीजणींचीं नांवें त्यांच्या माहेरच्या मंडळींनी फारच लाडीक ठेवलीं आहेत. एकीला म्हणतात कुकडी, तर दुसरीला म्हणतात घोडी ! तिसरीला म्हणतात मुठा, तर चौथीला म्हणतात वेलवंडी ! काय ही नांवें ठेवण्याची रीत ? चारचौघींत अशा नांवांनी हाक मारली की मुलींना लाजल्यासारखें नाही का होत ?

कित्येक मावळांना या नद्यांचींच नांवें मिळालीं आहेत. कानंदी जेथून वाहते तें कानदखोरें. मुठेचें मुठेखोरें. गुंजवणीचें गुंजणमावळ, पवनेचें पवनमावळ, आंद्रेचें अंदरमावळ आणि अशींच कांही.

मावळांत सह्याद्रीच्या उतरणीवर नाचणी ऊर्फ नागली पिकते. नाचणीची लाल लाल भाकरी, हिरव्या मिरचीचा ठेचा आणि कांदा हें मावळचें आवडतें पक्वान्न आहे. हें पक्वान्न खाल्लें की बंड करायचें वळ येतें! भात हें मावळचें राजस अन्न आहे. आंबेमोहोर भाताने मावळी जमीन घमघमत असते. अपार तांदूळ पिकतो. कांही मावळांत तर असा कसदार तांदूळ पिकतो की, शिजणाऱ्या भाताच्या पेजेवर तुपाळ थर जमतो. खुशाल वात भिजवून ज्योत लावा. नाजुक व सोन्यासारखा उजेड पडेल. महाराष्ट्राच्या खडकाळ काळजांतून अशी ही स्निग्ध प्रीत द्रवते.

मावळें एकूण चोवीस आहेत. पुण्याखाली बारा आहेत व जुन्नर शिवनेरीखाली बारा आहेत. मोठा अवघड मुलुख आहे हा. इथे राज्य करावें मराठ्यांनी नि वाघांनीच.

पण सुलतान राज्य करीत होते. रामदेवराव यादवाच्या पाठीशीं सह्याद्रि उभा असूनहि महाराष्ट्र स्वराज्य हरला. कारण यादव सह्याद्रीला विसरले. स्वराज्य बुडालें! सह्याद्रीच्या नकळत सुलतान महाराष्ट्रांत आले. जर रामदेव सह्याद्रीच्या आश्रयाने अल्लाउद्दिनाशीं लढला असता तर....? तसें घडलें मात्र नाही. पारतंत्र्य कपाळीं आलें. ज्यांनी ज्यांनी सह्याद्रीकडे दुर्लक्ष केलें ते पस्तावले. सह्याद्रि उगीचच्या उगीच या दारुड्या सुलतानांच्या साखळदंडांत अडकला गेला. सह्याद्रीवरचे किल्ले म्हणजे घटोत्कचाच्या आणि भीमाच्या बळाचे योद्धे होते. दऱ्या आणि अरण्यें म्हणजे अजिंक्य आश्रयस्थानें होतीं. पण आता तीं सर्व सुलतानांच्या पंजाखाली होतीं.

बहमनी सुलतानांच्या ऐन राक्षसी अंमलांतहि सह्याद्रीने व त्याच्या मराठ्यांनी एकदा सुलतानाला असा भयंकर तडाखा दिला होता की, तेथून पुढे सह्याद्रीशीं वागतांना ते मोठ्या सावधतेने वागत. साखळ-

दंडांनी बांधलेल्या सिंहाशीं वागतांना जसा सावधपणा ठेवावा लागतो तशा. एकदा फार मोठी गम्मत झाली. अल्लाउद्दीनशाह सानी या बहमनी सुलतानाच्या कारकीर्दींतील गोष्ट ( इ. १४५३ ). सुलतानाने आपला शूर व क्रूर सरदार मलिक उत्तुजार याला दहा हजार फौज देऊन कोकणांतील किल्ल्यांचा ताबा घेण्यास पाठविलें. या दहा हजारांत तीन हजार अरबी घोडेस्वार होते. कोकणांत शिर्के म्हणून प्रख्यात मराठा घराणें सह्याद्रीच्या बळकट आश्रयाने राहात होतें. त्याचप्रमाणे खेळणा ऊर्फ विशाळगड किल्ल्यावर शंकरराय मोरे नांवाचा एक असाच मराठा वाघ बळ धरून राहिला होता. त्या भयंकर क्रूर व सामर्थ्यसम्पन्न सुलतानशाहीच्या काळांतहि हे दोन मराठे आपआपल्या किल्ल्यांवर ताठ उभे होते. वाकतहि नव्हते अन् मोडतहि नव्हते. मोठमोठीं साम्राज्यें सुलतानांनी बुडविलीं आणि हे मराठे मूठभर मावळ्यांच्या माकडफौजेनिशी एवढे कसे टिकले ? हेंच तर सामर्थ्य आहे सह्याद्रीचें, त्याच्या अरण्यांचें अन् किल्ल्यांचें !

मलिक उत्तुजार शिर्क्यांच्या किल्ल्यावर (बहुधा हा प्रचीतगड असावा) चालून आला. आणि शिर्के झटकन् शरण आले ! ते स्वतः मलिकच्या स्वाधीन झाले ! मलिक खूष झाला. त्याने शिर्क्यांना सांगितलें की, तूं जर तुझा धर्म सोडायला तयार असशील तरच जगशील. नाही तर मी तुला ठार मारणार ! शिर्के कबूल झाले ! काय हरकत आहे ? सर्व धर्म सारखेच ! शिर्क्यांनी कबूल केलें. पण.... !

शिर्के म्हणाले की, प्रथम आपण शंकरराय मोरे खेळणा गडावर आहे त्याला बाटवूं. म्हणजे नंतर आम्हाला त्याचा जाच होणार नाही ! बरोबरच होतें शिर्क्यांचें. समानता असली म्हणजे विषमता राहात नाही ! मलिक उत्तुजारला हें तर लगेच पटलें. एका दगडांत दोन पक्षी ! लागलीच खेळणा गडावर स्वारी करायचें ठरलें. खुद्द स्वतः शिर्क्यांनी

आपली अत्यंत चिवट व निवडक मराठी शिपाई मंडळी घेऊन मलिकच्या बरोबर खेळण्याकडे कूच केलें.

वाट सह्याद्रीच्या भयंकर पहाडांतून व जंगलांतून होती. हें पहाडांचें स्वरूप पाहूनच कांही दख्खनी व हबशी कामगारांनी मलिकबरोबर खेळण्याकडे येण्याचें साफ नाकारलें! मलिकने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें. ते मागेच राहिले. मलिक व शिर्के फौजेसह चालूं लागले. वाटाड्याचें काम अर्थातच शिर्क्यांकडे होतें. पहिले दोन दिवस शिर्क्यांनी सरळ व त्यांतल्या त्यांत सोप्या वाटेने ही पाहुणे मंडळी नेली. पण तिसऱ्या दिवशीं त्यांना अशा एका भयंकर बिकट वाटेने नेलें की, प्रख्यात इतिहासकार फेरिस्ता लिहितो[1] :

"त्या घोर अरण्यास भिऊन मर्द वाघहि गर्भगळीत व्हावा! घाटांतील वाटा इतक्या वाकड्यातिकड्या होत्या की, त्यांची तुलना केसांच्या कुरळेपणाशीं केली तरीहि अपुरी ठरेल. तो पर्वतांचा भयंकर देखावा पाहून प्रत्यक्ष राक्षस व भुतेंहि तेथील कड्यांपाशी व गुहांपाशी आल्यावर दचकून जावींत. या अरण्यांत कधीहि सूर्याचा कवडासासुद्धा पडत नसेल. तेथे वाढलेलें गवतहि सर्पांच्या सुळ्या—दातांप्रमाणे तीक्ष्ण होतें. हवा तर अजगराच्या श्वासासारखीच! वाऱ्याची प्रत्येक झुळुक विषारी वाटे! अशा भयंकर ठिकाणीं गेल्यावर मलिक उत्तुजारचे सैनिक भिऊन गेले. थकून तर गेलेच. आणि शिर्क्याने तर नंतर त्यांना याहूनहि घोर व गडद अरण्यांत नेलें! तेथील वाट तर अशी बिकट होती की, तेथे वाऱ्यालाहि मोकळेपणाने वाहातां येत नव्हतें. तिन्हीहि बाजूंना अस्मानाला भिडलेले पहाड होते. सैन्याला धड चालतांहि येईना. हुकूम देणेंहि कठीण होऊन गेलें. त्यांतच मलिक उत्तुजारला रक्ताची हगवण लागली!"

इतकें होऊन अजून खेळणागड आणि तो शंकरराय मोरे किती दूर होता सैतान जाणे! मलिक उत्तुजारच्या सनिकांना तंबू ठोकायलाहि

जागा मोकळी सापडत नव्हती. ते तसेंच जमिनीवर पडले. मराठ्यांना व शिर्क्यांना मात्र या प्रवासांत कांहीच विशेष वाटत नव्हतें. कारण सह्याद्रि त्यांचा जन्माचा सोबती होता.

फेरिस्त्याच्या तोंडूनच पुढचें ऐकलेलें बरें.

"याप्रमाणें थकूनभागून अव्यवस्थित रीतीने मलिकची फौज विश्रांति घेत पडली असतां तो विश्वासघातकी नीच शिर्का, खेळण्यावर शंकररायकडे गेला आणि त्याने शंकररायाला सांगितलें की, मलिक उत्तुजारास सर्व फौजेनिशी तुझ्या जबड्यांत आणून सोडलें आहे ! लगेच शंकरराय मोठी फौज घेऊन निघाला !"[1]

आणि अरण्यांत व पहाडांत कोंडल्या गेलेल्या त्या फौजेवर शंकररायाच्या लोकांनी रात्रीं धाड घातली ! फेरिस्ता म्हणतो,[1]—

"अशा या पराधीन व दुर्बळ स्थितींत उत्तुजारच्या फौजेला मेंढ्यांप्रमाणे, कट्यारींनी व तलवारींनी सात हजार शिपायांसह मराठ्यांनी कापून काढलें ! या वेळी वारा जोराचा सुटला होता. त्यामुळे झाडांच्या खांद्या एकमेकांवर आदळून जो मोठा गोंगाट चालला होता त्यांत त्या शिपायांच्या किंकाळ्या एकमेकांससुद्धा ऐकूं आल्या नाहीत ! बड्या बड्या पांचशे सय्यदांसह व साडेदहा हजार शिपायांसह मलिक उत्तुजार ठार झाला ! दिवस उजाडायच्या आंत ही कामगिरी पार पाडून शंकरराय आपल्या लोकांसह निघून गेला !"[1]

महंमद कासीम फेरिष्ता हा लेखक आदिलशाहाच्या व निजामशाहाच्या पदरीं होता (इ. १५७० ते १६११).

असा आहे सह्याद्रि, असे आहेत मराठे आणि अशी आहे मराठ्यांची युद्धनीति ! या युद्धनीतीला व रीतीला 'गनिमीःकावा' असें लाडकें नांव आहे. मलिक अंबरनेहि हीच रीत उचलली होती. शहाजीराजे या बाबतींत पंडित होते. त्यांच्या हाताखाली तयार झालेले शामराजपंत,

रघुनाथपंत, गोमाजी नाईक पाणसंबळ, माणकोजी दहातोंडे वगैरे चेले आता शिवबाच्या हुतूतूंत सामील झाले होते. गनिमी कावा त्यांच्या व सह्याद्रीच्या हाडींमाशीं खिळला होता.

पण असा हा भीमरूपी अजिंक्य सह्याद्रि गुलामगिरींत पडला होता. तो चडफडत होता. गेलीं तीनशे वर्षें तो भेटेल त्याला सांगत होता, ‘ अरे, बंड करा ! बंड करा ! मी आहें पाठीशीं तुमच्या ! माझ्या हृदयांत दडा. माझ्या खांद्यावर चढा. माझ्या कानामागून लढा. तुम्ही जिंकाल !’

पण सह्याद्रीकडे आजपर्यंत कोणाचें लक्षच गेलें नव्हतें. शहाजीराजांची आणि सह्याद्रीची ओळख झाली तेव्हांच शहाजीराजांनी ओळखलें की, सह्याद्रीसारखा सखा दुसरा कोणी नाही. सह्याद्रीसारखा गुरु दुसरा कोणी नाही. अन् त्यांनी सह्याद्रीचा गुरूपदेश घेतला,.... गनिमी कावा !

निजामशाहीच्या नांवाखाली मराठेशाही स्थापण्याचा उद्योग जेव्हा शहाजीराजांनी आरंभिला होता तेव्हा ते धावले सह्याद्रीकडेच. पण शाहजहान बादशाहाने डाव घाव करून अखेर शहाजीराजांची व सह्याद्रीची कायमची ताटातूट केली.:आदिलशाहाला शाहजहानने निक्षून बजावलें की, या शहाजी भोसल्याला महाराष्ट्रांत ठेवूं नका ! धोका आहे त्यांत ! त्याला लांब कुठेतरी पाठवा !........अन् म्हणूनच तर शहाजीराजे कर्नाटकांत जाऊन पडले. त्यांची व सह्याद्रीची कायमची ताटातूट झाली.

महाराष्ट्राचें स्वातंत्र्य बुडाल्यापासून सह्याद्रि हळहळत उभा होता. पिढ्यांमागून पिढ्या जात होत्या. चौदा पिढ्या अशाच गेल्या. आता तो अगदी निराश, उदास, हताश होऊन डोळे झाकून निपचीत पडला होता.

अन् एके दिवशीं सह्याद्रीच्या बगलेंत किंचित् गुदगुल्या झाल्या !

सह्याद्रीनें डोळे किलकिले करून मान वळवून पाहिलें. कोण ? माझ्या काखे-बगलेंत चुळबूळ कोण करतंय् ?

एक गोंडस बाळ तुरूतुरू रांगत होतें. खुदूखुदू हसत होतें. दुडुदुडु धावत होतें. सह्याद्रीला कौतुक वाटलें. तें गोंडस बाळ हळूहळू खेळूं लागलें, :लढाईचे खेळ ! किल्ले जिंकण्याचे खेळ ! सह्याद्रीला आनंद झाला. त्याचा त्या बाळावर जीव जडला. त्या बाळाचें नांव शिवाजी !

शिवबाचें वय, त्यांचें मित्रवलय आणि त्याच्या अंतरींचे निश्चय वाढूं लागले.

शिवबाच्या आणि त्याच्या मित्रांच्या साहसी खेळण्याबागडण्यांतून सह्याद्रीला केवढा मोठा आनंद लाभत होता. या मुलांच्या हातापायांच्या स्पर्शानेच सह्याद्रीच्या आशा, महत्त्वाकांक्षा आणि पराक्रम उसळून उठत होता. साडेतीनशे वर्षांनी पुन्हा त्याला रम्य स्वप्नें पडूं लागलीं होतीं. घनदाट रात्र उलटल्यानंतरचीं पहाटेचीं स्वप्नें खरीं होतात म्हणे !

* * *

---

आधारः--(१) बराई पृ. १४५. ' सह्याद्रि '--श्री. स. आ. जोगळेकर.

## ६ : सह्याद्रीचे जिवलग

मराठ्यांना बंडाचा विचारच सोसवत नव्हता. किल्ल्यावरचा बादशाही हिरवा झेंडा पाहिला की मराठी माणसें धाकाने जमिनीकडे पाहात. सरदार बनलेल्या मराठ्यांची स्वाभिमानशून्य वागणूक लोचट थराला गेली होती. हेच लोचट सरदार लोकांत राजनिष्ठेचें लाचार वियाणें पेरीत होते. सारेजण अवघ्या अर्ध्या हळकुंडावर संतुष्ट होऊन पिवळे-धमक होत होते. आपण पारतंत्र्यांत आहोंत व बादशाह परकीय आहे, हें कोणाला उमजतच नव्हतें. बादशाह आणि परका? छेः छेः! तो तर ईश्वराचा अंश! विजापूरचा मरहूम बादशाह इब्राहीम सानी आदिलशाह गायनकलेचा फार शोकीन होता. तो तुर्की असूनहि त्याला थोडी फार मराठी भाषा येत असे. कलेची देवता म्हणून तो सरस्वतीला मान देत असे. आपल्या शाही फर्मानावर प्रारंभीं 'अज पूजा श्रीसरस्वती' असें लिहीत असे.[१] बस्स! आमचे लोक त्याच्या एवढ्याच उदात्त, विशाल आणि सहिष्णु स्वभावावर खूष होऊन गेले होते. केवढा थोर बादशाह! सरस्वतीदेवीला मान देतो! गायनविद्येला आश्रय देतो! नळदुर्गच्या खंडोबाची यात्रा भरविण्यास परवानगी देतो![२] मोडकेंतोडकें कां होईना पण मराठी बोलूं शकतो![३] बस् बस् बस्! हा बादशाह म्हणजे साक्षात् जगद्गुरूच![४] दिल्लीचा बादशाह जगदीश्वर ठरल्यावर विजापूरचा बादशाह जगद्गुरु ठरावयास कांहीच अडचण नव्हती. अन् खरोखरंच

आमच्या लोकांनी इब्राहीम बादशाहाला 'जगद्गुरु' मानलें होतें 'जगद्गुरु' इब्राहीम बादशाह! आणि तिकडे शंकराचार्य मात्र धूळ खात पडले होते. हाच इब्राहीम आदिलशाह मराठ्यांना बेधडक बाटवीत असे.[५] त्याने 'तयार' केलेला खवासखान ऊर्फ दौलतयार हा पूर्वी कोण होता? तो मराठा होता. हे जगद्गुरु दारू पिऊन तत्त्वचिंतनांत नेहमी तर असत! तरी पण आमचे लोक त्याच्या उदार व सहिष्णु स्वभावाच्या अर्ध्याच हळकुंडावर पूर्ण संतुष्ट होते. पराभूत व बावळट मनोवृत्तीला अर्धेंच हळकुंड पुरेसें असतें. कणखर स्वाभिमानाचा प्रचंड अवघड सह्याद्रि त्यांना पेलवणें अशक्यच.

पण शिवबासारख्या एका पोराने हर्षभराने सह्याद्रीला मिठी मारली. शिवबाला सह्याद्रीच्या कड्यांची कडकडीत भाषा उमगली. त्याचें मनोगत उमगलें. अन् एका कुबडीधारी समर्थ संन्याशालाहि सह्याद्रीने खुणाविलें,

'स्वामी इकडे या!'

समर्थ सह्याद्रीच्या खांद्यावर चढले. त्यांना सह्याद्रि एकदम प्रिय झाला. समर्थांना आवड होती वन, गहन गुहा, घळी यांची. समर्थ सह्याद्रि आणि समर्थ रामदास एकमेकांचे जिवलग सखे बनले. सह्याद्रीच्या हृदयगाभाऱ्यांत उभे राहून समर्थ आवेशाने गरजले,

समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे?॥

कोणीहि नाही! कोणीहि नाही! सह्याद्रीच्या हृदयींचे बोल समर्थांनी बोलून दाखविले. शिवथरच्या शिखरावरून अन् महाबळेश्वरच्या ब्रह्मारण्यांतून समर्थांच्या नेत्रांना सह्याद्रि आपल्या प्रचंड सामर्थ्याचा साक्षात्कार घडवीत होता. समर्थांना सह्याद्रीचा अत्यंत लळा लागला. त्याच्या कुशींत राहून ते लोकांना सामर्थ्याचा बोध करूं लागले. रामसेवा,

रुद्रसेवा आणि शक्तिसेवा केल्याशिवाय लोकांची आत्मिक व ऐहिक उन्नति होणार नाही हें त्यांनी पूर्ण ओळखलें. त्यांनी रामाची उपासना सांगितली.

उठा प्रातःकाळ झाला, अवघे राम पाहूं चला.

बळें आगळा वीर कोदंडधारी । महाकाळ विक्राळ तोही थरारी ।
पुढें मानवा किंकरा कोण केवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥

समर्थांनी रामाचा जयजयकार मांडला.

' जय जय रघुवीर समर्थ ! '

या जयजयकाराने सुप्त अंतःकरणें तरारून उठलीं. शिष्यांची मांदी समर्थांभवती जमूं लागली. उद्धव आले. कल्याण आले. दिनकर आले. दिवाकर आले. हे त्यागी विरागी शिष्य म्हणजे समर्थांनी केलेल्या जयघोषांचे प्रतिध्वनीच होते. समर्थांची शिष्यमंडळी भिक्षामिषें जनस्थिति व देशस्थिति न्याहाळीत गावोगाव रामाची व हनुमानाची उपासना सांगत भ्रमण करूं लागली. समर्थांनी अनेक ठिकाणीं मारुतीच्या मूर्ति स्थापन करण्यास सुरुवात केली. मारुतिस्तोत्रांच्या ओळी तरुणांच्या जिभेवर खेळूं लागल्या. रामाचे व मारुतीचे जन्मोत्सव नव्या उत्साहांत रंगूं लागले. रामायणाला नवा रंग चढला. ठिकठिकाणीं मठस्थापना होऊं लागली. समर्थांनी शिष्यांचें व मठांचें जाळें चारहि दिशांस पसरविलें. हा एवढा प्रपंच कशासाठी ? जनांच्या उद्धारासाठी. धर्माच्या संस्थापनेसाठी. वैफल्याची, नैराश्याची, औदासीन्याची आणि पराभूत मनोवृत्तीची राख फुंकून टाकून चारीहि पुरुषार्थ उत्कृष्टपणें पार पाडण्यास समाज आनंदाने व हिरीरीने उभा राहावा यासाठी.

अध्यात्माचें चिंतन आणि आचार हाच समर्थांच्या कार्याचा खरा आत्मा होता. परंतु अस्मानी संकटांमुळे व सुलतानांच्या जुलमांमुळे हैराण झालेल्या लोकांचे विस्कटलेले संसार आणि जीवन पुन्हा

कर्तव्योन्मुख, उत्साही व तेजस्वी केलेंच पाहिजे असें त्यांना दिसून आलें. म्हणूनच त्यांनीं लोकांना केवळ निवृत्तिपर अध्यात्म न सांगतां रोकडा व्यवहार आणि अध्यात्म सांगण्यास प्रारंभ केला. जीवन शतगुणांनी समृद्ध करा, गबाळेपणा टाका, आळस सोडा, दैवाला दोष देत रडत वसूं नका, प्रयत्न हाच ईश्वर समजा, जो जसा भेटेल तसेंच त्याच्याशीं वागा, दुष्टाशीं बेधडक दुष्टपणाने वागा, चातुर्याने वागा, हिशेबी वागणूक ठेवा, आपआपलीं वर्णकर्तव्यें चोख वजावा, जनीं निंद्य तें सर्व सोडा, जें जें वंद्य तें मनापासून करा. धीर कधींहि सोडूं नका, संकटांनी गडवडून जाऊं नका, जें जें उत्कट अन् भव्य असेल तेंच घ्या, जें जें मिळमिळीत असेल तें टाकून द्या, ऐक्याने वागा, वहुतांचीं मनें सांभाळा, भाग्योदय त्यांतूनच होईल, विवेक जागृत ठेवा, अभ्यास सोडूं नका, मठ करून ताठा करूं नका, सामर्थ्य हें चळवळींत आहे आणि तें करणारासच प्राप्त होतें, करंटेपण चुकूनहि पत्करूं नका, फुका वाद घालीत बसूं नका, शरीर स्वच्छ ठेवा, झोपा काढण्यांत वय घालवूं नका, रोज थोडें तरी लेखन वाचन करीत जा, चांगली संगत धरा, सभेंत चांगल्या प्रकारें वागा, वेष अगदी साधासुधा ठेवा पण अंगीं कला मात्र अनेक आत्मसात् करा, संसार रडतखडत करूं नका, सतत उद्योग करा, उपासना सोडूं नका, वडिलांचा मान राखा, सदैव सावधान राहा, देहदेवालयांतील देव पाहा, कठिण काळाला भिऊं नका, कलह व पक्षभेद विसरून अनन्यभक्त व्हा, कोणावर विसंबून राहूं नका, स्वतःच कष्टश्रम करीत जा, कोणावर फाजील विश्वास टाकूं नका, आपसांत भांडत बसूं नका, शत्रु कोण तें ओळखून त्याच्यावर एकवटून घसरा, संयमाने वागा, एखाद्या थोर कार्यांत जन्म सार्थकीं लावा, वगैरे वगैरे किती तरी गोष्टी समर्थ लोकांना सांगूं लागले. शिकवूं लागले. समर्थ जीवन जगण्याची कला समर्थ शिकवूं लागले. त्यांच्या एका एका शब्दांत ओज

साठविलेलें होतें. त्यांत विलक्षण फुंकर होती. समर्थ सांगत होते—

वन्हि तो चेतवावा रे । चेतवीतांचि चेततो ।
केल्याने होत आहे रे । आधी केलेंचि पाहिजे ।

साध्याच शब्दांत ते दुबळ्यांची स्थिति सांगत—

कोण पुसे अशक्ताला । रोगीसे वराडी दिसे ।
कळा नाही कांति नाही । युक्ति बुद्धि दुरावली ॥

आणि मग समर्थ सांगत—

दास म्हणे ऐसें करा । सदा मारुती हृदयीं धरा ।

शक्तीची उपासना सांगून पुढचा मंत्र ते सांगत—

भाग्यासी काय उणें रे । यत्नावाचूनि राहिलें ।
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥

आणि मग समर्थ बजावून सांगत—

कांही येक उत्कटेविण । कीर्ति कदापि नव्हे जाण ।
उगेचि वणवण हिंडोन । काय होतें ॥........
विवेकामध्ये सांपडेना । ऐसें तों कांहीच असेना ।
येकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ॥

सह्याद्रींतून स्रवणाऱ्या शतशत मावळगंगांच्या बरोबरीने समर्थांच्या मंत्रगंगा शिष्यांच्या द्वारें महाराष्ट्रभर खळाळूं लागल्या. समर्थ डोंगरांत, दऱ्यांत वा घळींतच बहुधा राहून धर्मजागृतीचीं सूत्रें हलवीत होते. ते म्हणत,

दास डोंगरीं राहातो । उत्सव देवाचा पाहातो ॥

समर्थ सह्याद्रीचे जिवलग बनले. अगदी असाच जिवलग सह्याद्रीला हवा होता.

आणखी एक सखा सौंगडी सह्याद्रीला लाभला. देहूचे तुकाराम महाराज. इंद्रायणीथडीच्या एका भंडाऱ्या डोंगरावर याच वेळीं या

वाण्याची मंगल अभंगवाणी निनादली. भंडारा डोंगर वीणेच्या झंकाराने आणि अभंगवाणीच्या माधुर्याने तल्लीन होऊन डोलूं लागला. तुकोबांनी सह्याद्रीच्या या भंडाऱ्या शिखरावर भळाळत्या वाऱ्यांत उभें राहून महाराष्ट्रांतील सगळ्या जातीयातींना दोन्ही हातांनी हाक मारली. या ! या ! अवघे या ! माझ्या भक्तीच्या दुकानीं या !

भरणी आली मुक्त पेठा । करा लाटा व्यापार ।
उधार घ्या रे, उधार घ्या रे । अवघे या रे जातीचे ।
येथे पंक्तिभेद नाही । मोठे कांही लहान ।
तुका म्हणे लाभ घ्यावा । मुद्दल भावा जतन ॥

रामनाम हेंचि मांडिलें दुकान । आहे वानोवाण घ्या रे कोणी ।
नका कोणी करूं, घेता रे आळस । वांटितो तुम्हास फुकाचे हे ॥

तुकोबांनी भक्तीची पेठ उघडली. शुद्ध आचार, निर्व्याज प्रेम आणि शुद्ध अध्यात्म सह्याद्रीवर प्रकटलें. समाजांतले ढोंगी गुरुपण, अडाणी क्रूर देवभक्ति आणि मूर्ख समजुती यांच्या दावणींतून लोकांना सोडवून साध्या, सोप्या व शुद्ध भक्तीने स्वतःचा उद्धार करतां येतो, हें तुकोबांनी सप्रयोग दाखविण्यास सुरुवात केली. अन् हा प्रयोग प्रत्यक्ष स्वतःच्या तनमनधनावरच, स्वतःच्या देहावरच. भागवतधर्माची ध्वजा पुन्हा वर चढूं लागली. पीर, फकीर, बोकड, कोंबडी, गांजेकस गुरु, अंगारे-धुपारे यांच्या नवसबाजींत लोक खोटा देवधर्म करीत होते. पोथी पुराणांतला देवधर्म अजूनहि संस्कृत भाषेच्या कोंडवाड्यांतच अडकला होता. तुकोबांनी ज्ञानेश्वरांचा, नामदेवांचा अन् सर्व संतांचा सोपा धर्म सांगण्यास सुरुवात केली. येथे गरज कोणत्याच अवडंबराची नव्हती. फक्त हृदयींचें आर्त प्रेम हवें होतें. त्या आर्त प्रेमाने उच्चारलेल्या विठ्ठल नामांत वेदांचें सार आणि ब्रह्मविद्येचा साक्षात्कार प्राप्त होऊं शकत होता. तुकाराम महाराज म्हणाले,

वेदांचा तो अर्थ आम्हासची ठावा । येरांनी वहावा भार माथा ॥
आणि मग ते म्हणत,........
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥
तुका म्हणे नाही जयासी निर्धार । नाडला साचार तोचि एक ॥
तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाद घेऊं ॥
तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥
कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥
आशावद्ध नये करूं ते करिती । तुका म्हणे जाती नरकामधी ॥
तुका म्हणे जैशी लांचासाठी ग्वाही । देतील हे नाही ठावी वस्तु ॥

*महाराष्ट्राची शिवशक्ति जागृत झाली*



तुका म्हणे शुद्ध नाही जो आपण। तया त्रिभुवन अवघें खोटें ॥
जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ। येर तो सकळ मूढ लोक ॥
तुका म्हणे विधि निषेध लोपला। उच्छेद या झाला मारगाचा ॥
नवसें कन्या पुत्र होती। तरि कां करणें लागे पती ॥
जाणे हा विचार। स्वामी तुकयाचा दातार ॥
वाचोनि पढोनि जाले शहाणे। म्हणती आम्ही संत ॥
परनारी देखोनि त्यांचें। चंचळ झालें चित्त ॥
टिळा टोपी घालुनि माळा। म्हणती आम्ही साधु ॥
दया धर्म चित्तीं नाही। ते जाणावे भोंदू ॥

कलियुगीं घरोघरीं। संत जाले फार।
वीतभर पोटासाठी। हिंडती दारोदार ॥
द्रव्य असतां धर्म न करी। नागविला राजद्वारीं ॥
कथाकाळीं निद्रा लागे। कामीं श्वानापरी जागे ॥
तुका म्हणे जाण। नर गाढवाहुनी हीन ॥

मऊ मेणाहून हृदयाचे तुकोबा एवढ्या कडक शब्दांचे आसूड खोट्या धर्मबाजीवर ओढीत होते. कथाकीर्तनें करीत होते. दिंड्या पताकांच्या दाटींत नाचत होते.

सामुदायिक भक्तीला पुन्हा असा पूर आला. तुकाराम आणि रामदास या दोघांनीहि शुद्ध आचार आणि सोपी भक्ति बिंबविण्याचें कार्य आरंभिलें. लोकांत नकळत देवबळ प्रकटूं लागलें. उत्साहाचा, स्वधर्मप्रेमाचा, आशेचा, धैर्याचा, आत्मविश्वासाचा, श्रद्धेचा आणि ऐक्यभावनेचा एक प्रभावी पण अदृश्य प्रवाह समाजाच्या अंतरंगांतून वाहूं लागला. समर्थ रामदास, तुकाराम, जयरामस्वामी, आनंदमूर्ति, रंगनाथस्वामी, चिंतामणिदेव, नारायणदेव चिंचवडकर वगैरे संतांनी हें फार फार मोठें व महत्त्वाचें कार्य आरंभिलें होतें. सुलतानी संस्कृतीच्या

व सत्तेच्या विरुद्ध या संतांनी कोणतींहि राजकारणें, कारस्थानें, प्रचार किंवा चळवळ केली नाही. तसा त्यांचा हेतूच नव्हता. त्यांची ती वृत्तीहि नव्हती. त्यांनी राग, द्वेष व संघर्ष यांना स्पर्शहि न करतां धर्मसंस्थापना, धर्मजागृति, आणि ईश्वरसेवा एवढ्याच गोष्टींचें व्रत घेतलें. याचा एक सुपरिणाम सहजपणें घडत गेला. तो म्हणजे महाराष्ट्राची शिवशक्ति जागृत होऊं लागली. ब्राह्मतेज व क्षात्रतेज आपोआप योग्य दिशेने फाकूं लागलें.

मुक्तेश्वर आणि वामनपण्डित हे कविवर याच उषःकालांत काव्यसंध्येस बसले होते. मुक्तेश्वरांचे काव्यविषय शुद्ध पौराणिक होते. पण त्यांतहि स्वराज्याच्या सुखाची गोडी सांगण्यांत त्यांची लेखणी तल्लीन झाली. मुक्तेश्वरांची परतंत्र, अपमानित व वनवासी द्रौपदी धर्मराजास म्हणते,

साधलिया स्वराज्य सम्पत्ति । यज्ञीं देव तृप्त होती ।
श्राद्धीं पितृगण अतिथी । अन्नदानें तोषती ।
हरेल दारिद्र्याचें दुःख । मित्र बंधु पावती सुख ।
अनित्य संसारीं कौतुक । करुनि जाती दादले ।
जेणें पाविजे परम दुःख । काय तें साधुवृत्तीचें सुख ।
धैर्य उपहासिती लोक । म्हणती दीनें अशक्तें ।
व्यवहारीं शांति नये कामा । परमार्थ क्रोध नाशी धर्मा ।
जेथे ज्याचाचि महिमा । तें तेथेचि योजावें ।
खळा कुटिलांचे ठायीं । शांति धरितां पडणें अपायीं ।
जैसे कंटक मर्दावे पायीं । तेवी दुर्जन दंडावे ।
देखोनिया साधुसंता । भावें चरणीं ठेविजे माथा ।
तेथ दाविता क्रूरता । अधःपाता जाइजे ॥

असा कणखर क्षात्रधर्म मुक्तेश्वर सांगूं लागले. अन् कां कोण जाणे, पण मुक्तेश्वरांना मराठ्यांच्या कर्तृत्वाबद्दलहि मोठा विश्वास आणि अभिमान

वाटूं लागला. मुक्तेश्वरांनी मोठ्या हिरीरीने म्हटलें,

महाराष्ट्र जे सर्व राष्ट्रांसि राजे। जयाच्या भयें व्यापिले देव लाजे ॥

जिवलगांचे हे जिव्हाळ्याचे बोल ऐकून तर सह्याद्रीचें हृदय उचंबळून आलें. त्याची आशा चौगुणित झाली. तो आतुरतेने वाट पाहूं लागला स्वातंत्र्याच्या सूर्याची.

* * *

**आधार:**—(१) राज १५।७; शिचसा ११।९४. (२) शिवरा ११।९४. (३) I D. Vol, VI, Page I52. (४) सपत्रें पृ. ८. (५) मंडळ त्रै. व. १ अं. १ पृ. १०. समर्थांची समग्र कविता. तुकारामाचा गाथा. अळतेकरकृत समर्थचरित्र. कै. पु. मं. लाडकृत तुकारामचरित्र.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २४४७८ दि. ...
क्रमांक ८६५ ... नों: दि: १३-२-५९



## ७ : तोरणा

चांद्याच्या गोंडांचें गोंडवन वगळलें तर काश्मीरपासून कावेरीपर्यंत उभा देश हिरवा हिरवागार पडला होता. पारतंत्र्याचें विष अंगांत भिनलें होतें. जर एखाद्याने ठरवलें असतें की, स्वातंत्र्यांत मरायचें, अगदी एका पायावर उभें राहून विष पिऊन मरायचें, पण स्वतंत्र भूमीवरच मरायचें, तर आत्महत्या करण्याइतकी पाऊलभर भूमीहि स्वतंत्र नव्हती! राणा प्रतापसिंहाचें उदयपूरहि गुलाम बनलें होतें. राणा प्रतापाचा नातू मोंगलांचा 'वैभवशाली' जहागीरदार बनला होता! इतर रजपुतांबद्दल बोलायला इतिहासाला युगानुयुगें लाजच वाटणार होती. पंजाब, बिहार, बंगाल, गुजराथ, महाराष्ट्र वगैरे प्रदेश गुलामगिरीच्या बाबतींत ज्ञानवृद्ध होते. शतकानुशतकें मूठभर परकीय सुलतानांचे गुलाम! सर्वांत अनुभवी व आदर्श गुलाम, सिंधप्रदेश! अनेक शतकें गुलामगिरींत गेलेलीं होतीं. अन् आणखी अशीं किती शतकें लोटणार हें सांगायची परमेश्वराचीहि छाती नव्हती!

महाराष्ट्रावर पांच सुलतानी सत्ता जरबेने हुकमत गाजवीत होत्या. दिल्लीचा मोंगल सुलतान, विजापूरचा आदिलशाही सुलतान, गोव्याचा फिरंगी गोरंदोर, जंजिऱ्याचा सिद्दी आणि वर्धा व गोदावरीच्या दुआबावर कुतुबशाह. कोणी कमाल जुल्म करीत होते, कोणी सात्त्विक जुल्म करीत होते. पण गुलामगिरींत प्रतवारी कसली? गुलामगिरीविरुद्ध अक्षर

उच्चारायची कुणाला शहामत नव्हती.

आणि मावळच्या दरींत पंधरा वर्षांचा शिवबा डोक्यांत वेड घेऊन बसला होता की, मी स्वराज्य मिळवीन! पांच अजगरांच्या विळख्यांतून माझी दौलत मी सोडवीन. ही आकांक्षा तें एक पोर मूठभर पोरांपुढे बोलत होतें! तोफा, दारूगोळा, पैसा आणि फौज शिवबापाशी किती होती? चिमुटभर! मोंगल सुलतान तीन तीन लाख फौज उभी करूं शकत होते. आदिलशाहाचें बळ पाऊण लाख फौजेपेक्षा कमी नव्हतें. कुतुबशाह बळाने तितकाच होता. फिरंगी गोवेकर आणि सिद्दी यांनी आपल्या बलाढ्य आरमाराने पश्चिम समुद्र बांधून टाकला होता. शिवाय त्यांचीं सैन्यें होतींच. सर्व किल्ले, ........ सर्व महाराष्ट्रच सुलतानांनी गिळलेला होता. कुठे शिवबा अन् कुठे त्याचीं तीं पोरेंसोरें! एका तोफेच्या एकाच सरबत्तींत हा पोरखेळ अस्मानांत उडूं शकला असता. विजयनगरच्या नऊ लाख फौजेचा चुराडा चार तासांत उडाला, तेथे शिवबाचें काय! तरीहि शिवबा म्हणत होता, माझें स्वराज्य मला हवें! स्वतंत्र दौलत मी उभी करीन. यवनाक्रांत भूमि मी सोडवीन.

अरे कशी? पोरासोरांनिशी?

होय! पोरासोरांनिशी!!

तें बळ शिवबांत कोठून आलें? आत्मविश्वासांतून, अत्यंत प्रखर तळमळींतून, ज्वलंत स्वाभिमानांतून. मनांत आणलें म्हणजे वाटेल तें करतां येतें. पहाडहि फोडतां येतात या निष्ठेंतून.

शिवबा आपल्या दोस्तांसह दऱ्याखोऱ्यांत खलबतें करीत होता. एखाद्या जुनाट देवळांत, कधी जाळीजंगलांत, कधी भवानीपुढे बसून, कधी तळघरांत वा भुयारांत बसून गुप्त कारस्थानें रचीत होता. शिवबाच्या या उद्योगांत सर्वांत मोठें सामर्थ्य निष्ठेचें होतें. शिवबाची तुळजाभवानीवर एवढी नितांत निष्ठा होती की, तो म्हणे, हें तिचेंच

कार्य आहे, तीच आपल्या हातून करवून घेणार आहे. निष्ठेशिवाय राज्य आणि विद्या प्राप्त होत नसते.

परमेश्वरावर नितांत श्रद्धा व अविरत अचूक प्रयत्न एकत्र झाले की शिवभारत आपोआप निर्माण होऊं लागतें.

आता सर्वजण उत्सुक झाले होते उड्या टाकायला ! आपल्या ताब्यांत एक तरी बळकट किल्ला आता हवाच, अशी प्रत्येकाला घाई झाली होती. उंच डोंगरावर आश्रयासाठी गरुडासारखें घरटें हवें. तेथून मग हवा तेवढा धिंगाणा घालतां येईल. शिवबालाहि हा मनसुबा मंजूर होता. कोणता गड मटकावायचा हेंहि त्याने हेरून ठेवलें होतें.

तोरणा ! कानदखोऱ्यांत हा गड आहे. खूप उंच, उंच, उंच. तोरण्याइतका उंच गड तोरणाच.[७] डोंगरी किल्ल्यांत त्याचें स्थान वडील-पणाचें. तोरणा जसा उंच तसाच रुंदहि आहे. गडाला दोन माच्या आहेत. एक झुंजार माची दुसरी बुधला माची. माची म्हणजे उपत्यका.[८] उपत्यका म्हणजे गडाच्या एखाद्या अंगास पसरत गेलेल्या पहाडावर केलेलें कोटबंद बांधकाम. झुंजारमाचीपासून बुधलामाचीचा शेवटचा बुरुज जवळजवळ कोसभर दूर आहे. एक कोस लांब व पाव कोस रुंद असा गडाचा पसारा आहे. बुधला माचीवर मध्यभागीं एक डोंगराचा सुळका उभा आहे व त्यावर खूप मोठा थोरला धोंडा आज शतकोशतकें बसून राहिला आहे. तो दिसतो तेलाच्या बुधल्यासारखा. म्हणून या चिंचोळ्या माचीला बुधला माची म्हणतात.

झुंजार माची खरोखरच झुंजार आहे. भक्कम तट आणि खालीं खोल खोल कडे आहेत. झुंजारमाचीवरून गडाखाली उतरावयास एक वाट आहे. परंतु ती इतकी भयंकर अवघड आहे की, स्वर्गाची वाटहि इतकी अवघड नसेल ! या वाटेवरून जातांना अर्धे बोट जरी झोक गेला तरीहि दया क्षमा होणार नाही. मृत्युच ! त्या दृष्टीने स्वर्गाला ही वाट

फारच जवळची आहे ! महाराष्ट्रांतल्या अत्यंत बळकट व अत्यंत बिकट किल्ल्यांच्या पंगतींत तोरण्याचा मान पहिला लागावा. काळेकुट्ट अन् ताठ भिंतीसारखे कडे, अत्यंत अरुंद वाटा, भक्कम दरवाजे, काळ्या सर्पासारखी वळसे घेत घेत गडावर कडेकडेने गेलेली तटबंदी, मधून-मधून बांधलेले व अचूक मारा साधणारे बुरुज आणि गडाच्या मध्यावर बालेकिल्ला, असें तोरण्याचें रूप आहे. गडाला दरवाजे दोन आहेत. एक आहे पुण्याच्या दिशेला, म्हणजे साधारणतः उत्तरेला बिनीदरवाजा, आणि दुसरा पश्चिमेला कोकणदरवाजा. गडावरून होणारें सह्याद्रीचें दर्शन जितकें रमणीय तितकेंच भयप्रद वाटतें. गडाच्या भवती डोंगराच्या खाचांत व झाडींत एकूण सात चौक्या होत्या.

गडावर तोरणजाई देवी तटाच्या उत्तरांगीं लहानशा देवळींत वसली आहे. शिवाय इतरहि दैवतें ठिकठिकाणीं आहेत.

तोरणा शिववाच्या डोळ्यापुढे होता. याचें कारण तो उत्कृष्ट होता हें तर होतेंच, पण बादशाहाचें या गडाकडे अगदी दुर्लक्ष होतें. गडावर धड शिबंदी नव्हती. पहारे, तोफा, दारूगोळा, गस्त वगैरे कांहीहि व्यवस्था धड नव्हती. गड बेवसाऊ पडला होता. या गडाकडे बादशाहाचे आजिबात लक्ष नव्हते. टपून बसलेल्या शिववाने आपले सौंगडी आणि इतर मावळ्या टोळ्या घेतल्या आणि एक दिवशीं एकदम कानद खोऱ्यांत उतरून सर्वजण भराभरा गड चढून गेले. किल्ल्यांत घुसले ! बिनीच्या दरवाजावर भगवाझेंडा फडफडूं लागला ! शिणगार चौकीवर मावळ्यांचे पहारे बसले. कोकणदरवाजावर, झुंजारमाचीवर आणि बुधलामाचीवर चौक्या पहारे बसले. तोरणा स्वतंत्र झाला ! प्रतिपदेची चंद्रलेखा साडेतीनशे वर्षांच्या वद्य पक्षानंतर आज उगवली. नगाऱ्यांचा आणि शिंगांचा आवाज आणि हर हर महादेव ही गर्जना सह्याद्रीच्या हृदयांत घुमली. भंगलेल्या मूर्तींच्या वेदना आज थांबल्या. शंकरदेव

यादवाच्या आणि हरपालदेवाच्या आत्म्यांना आज समाधान लाभलें. स्वतंत्र तोरणा, स्वतंत्र मावळे, स्वतंत्र शिवबा, स्वतंत्र पंत, स्वतंत्र भगवा-झेंडा आणि स्वतंत्र आईसाहेब आज कांही एका स्वतंत्र जगांत प्रवेशले. सह्याद्रि आज निहायत खूष झाला. तोरणजाई प्रसन्न झाली. गुलामगिरी संपली! महाराष्ट्राच्या तळहाताएवढया भूमीवरची सुलतानी सत्ता पार उडाली.

शिवबाने गडाची पाहाणी केली. कांही बांधकाम चांगलें पक्कें करणें आवश्यक होतें. शिवबाने त्या तटबंदीची दुरुस्ती करण्याचा निश्चय केला. किल्ल्याचा कारभार सुरू केला. मराठा किल्लेदार, ब्राह्मण सबनीस, प्रभु कारखानीस आणि शिबंदींत मावळे, कोळी, रामोशी, महार वगैरे विविध जातींचीं शूर माणसें ठेवलीं. अस्ताव्यस्त पडलेल्या तोफा बुरुजांवर व्यवस्थित ठेवल्या. केवढी जबाबदारी येऊन पडली आता! शिवबाने भयंकर कठीण संसारास सुरुवात केली. म्हातारपणीं पंतांनी बारा मावळें पोखरून मिळवून ठेवलीं त्या कार्याचें आज पुण्याहवाचन झालें.

तोरण्याच्या दुरुस्तीस सुरुवात झाली आणि भवानी पावली! तटाचें काम चालू असतांनाच तटांत हंडा दिसला! धनाने तुडुंब भरलेला! आनंदाची लाट उसळली. खूप मोठें धन हाताशीं आलें. शिवबाला जगदंबा प्रसन्न आहे, हें राज्य व्हावें ही तिचीच इच्छा आहे आणि तिनेच हें धन दिलें अशी प्रत्येकाची खात्री झाली. गडावर स्वयंभू खजिना तयार झाला. एवढें मोठें धन सापडलें म्हणून कोणाहि मावळ्याच्या तोंडाला स्वार्थाचें पाणी सुटलें नाही. यांतील चार मोहरा गुपचूप कमरेला खोचाव्या अन् घरीं नेऊन लाडक्या बायकोच्या गळ्यांत पुतळ्यांची माळ करून घालावी असा विचारहि कोणाच्या काळजाला शिवला नाही. कारण हें धन म्हणजे स्वराज्याचें धन. महादेवाचें धन. महादेवाच्याच चरणीं खर्च होयाचें.

तो खजिना नव्या स्वराज्याच्या कामासाठीच वापरायचा हेंहि त्याच-क्षणीं ठरलें. पंतांचें आणि शिवबाचें लक्ष फार पूर्वीपासून एका मोठ्या-थोरल्या डोंगरावर होतें. हा डोंगर असाच अतिशय उंच, बिकट आणि मोक्याचा होता. तोरण्यापासून फक्त अडीच कोसांवर पूर्वेला. मुरुंब-देवाचा डोंगर असें त्याला म्हणत. वास्तविक हा एक किल्लाच होता.[१] अकरा वर्षांपूर्वी बादशाहाने मुरुंबदेवाच्या डोंगरावर डागडुजी करून रसद वगैरे ठेवण्याचा हुकूम दिलेला होता[२] (दि. १७ फेब्रुवारी १६३४). पण हा अर्धवट गड असाच वेवसाऊ पडला होता. शिवबाराजांनी तोहि एकदम कबजांत आणला.[३] आणि तोरण्यावर सापडलेलें धन मुरुंब-देवाच्या बांधकामासाठी खर्च करण्यास प्रारंभ केला. लगेच शिवाजी-राजांनी मुरुंबदेवाचें नांव ठेवलें, ‘ राजगड. ’[३]

भराभर शिवाजीराजांचीं पावलें पुढे पडूं लागलीं. घोडदौडच. पंतांनी पौडखोऱ्यांतला कुवारीगड ढमाले देशमुखांच्या ताब्यांतून आपल्या ताब्यांत घेतला.[५] हा गड पुण्याच्या पश्चिमेस वीस कोसांवर आहे. कुवारीगडावरहि तावा झाला. बाजी पासलकरांचें मोसेखोरें या गडाला अगदी जवळ होतें. शिवाजीराजांनी यानंतर लौकरच एकएक मावळ व्यापण्यास सुरुवात केली. घेतलेले हे किल्ले बादशाहाने दुर्लक्षिले होते ते प्रथम शिवाजीराजांनी भराभरा कबजांत घेतले. लढाया न कराव्या लागतांच हे गड राजांनी घेतले. भवतालचा मुलुखहि अर्थात् कबजांत आला.

या सर्व भागावरचा म्हणजे भोर भागावरचा बादशाही अधिकारी शिरवळ येथील सुभान मंगळ नांवाच्या सुईकोट किल्ल्यांत राहात असे. त्याला अमीन म्हणत. हिरडस मावळ, रोहीडखोरें व शिरवळखोऱ्याची कर व सारावसुली सुभान मंगळचा अमीन वसूल करीत असे.[३] शहाजीराजांच्या पोराने फिसाद करून लोकांच्या आणाशपथा घेतल्या.

आहेत ही खबर अमिनाला पोहोचली. मागोमाग ' राजगड ' नांव करून एक गड वळकावल्याचीहि खबर अमिनाला कळली !

कशी कळली ? पंतांशीं व शिवाजीराजांशीं वाईटपणा धरून वागणाऱ्या वांदल देशमुखाने, केदारजी खोपडे देशमुखाने व कान्होजी जेध्यांच्या भाऊबंद देशमुखांनी ही खबर शिरवळास जाऊन अमिनाच्या कानीं घातली ! [४] केव्हा तरी ती अमिनाला व बादशाहाला कळणारच होती. पण मराठ्यांच्या स्वराज्याशीं हरामखोरी करण्याचें पहिलें महत्पुण्य आमच्याच मराठ्यांनी साधूं नये तर कोणीं साधावें ?

वेवसाऊ किल्ले शिवाजीराजांच्या फिसादखोर साथीदारांनी घेतले हें

नव्या स्वराज्याची नवी राजधानी..



अमिनाला चटकन जाणवलें नाही, पण मुलखांत त्याला अनुभव आलाच. आपण होऊन वसुलाची रक्कम शिरवळास पोहोचती करणारे स्वामिनिष्ठ देशमुख, देशपांडे शिरवळला फिरकलेहि नाहीत.[४] वसुलाची रक्कम जमा झाली 'स्वराज्याच्या' खजिन्यांत.[३] बादशाहीचा संबंध संपला !

बारा मावळांत वीरश्रीचे, आनंदाचे आणि उत्साहाचे वारे स्वैर वाहूं लागले. लहानसाच मावळमुलुख पण आता स्वतंत्र झाला होता. जबाबदारीची जाणीव आणि आच असल्याशिवाय स्वातंत्र्याचा खरा आनंद लुटतांच येत नाही. आता केव्हा शत्रु चालून येईल, कोणत्या बाजूने येईल, आला तर काय काय करायचें, याच विचारांत व डाव-पेचांचें चिंतन करण्यांत आणि कणाकणाने बळ वाढविण्यांत शिवाजी-राजांची मित्रमंडळी दंग होऊन गेली. जो तो हरणाच्या चपळाईने, वाघाच्या धडाडीने, कोल्ह्याच्या धूर्ताईने आणि शिकाऱ्याच्या सावध-पणाने वागत होता. आता विश्रांतीला वेळच नव्हता. आपण एक भयंकर धाडस करीत आहोंत याची जाणीव स्वस्थ बसूं देत नव्हती.

शिरवळच्या सुभान मंगळ किल्ल्यांतील ठाणेदार अमिनाला हा सारा धिंगाणा कळला. त्याचे रागाने लाल झालेले डोळे पांढरे व्हायची वेळ आली. त्याने ताबडतोब विजापुरास बादशाहाकडे हा बंडावा लिहून कळविला. सांडणीस्वार तीं पत्रें घेऊन सुभान मंगळच्या दरवाजांतून दौडत सुटला.

शहाजी भोसल्यांच्या पोराने उनाड व हलकीं पोरें गोळा केलीं असून तो त्यांचा म्होरक्या बनला आहे[६], त्याने तोरणा किल्ला व राजगड नांव करून मुरुंबदेव किल्ला कबजांत घेतला आहे, रोहीडखोऱ्यांतल्या देशमुख–देशपांड्यांचें त्याला पाठबळ आहे, नरसप्रभु देशपांडा हाहि त्यांच्याशीं मिळतावा करून हरामखोरी करीत आहे,[४] अशी खबर

शाहाच्या हातीं पडली. एवढ्या सुलतानींत शेंबडीं पोरें पुंडावा करीत आहेत हें बादशाहाला खरेंच वाटेना. कसें शक्य आहे हें? आणि जर असें असेलच, तर खाटकाविरुद्ध बंडाळी करणारी ईदचीं बकरीं उद्या मरायचीं तीं आज मरतील! कां फिकीर?

बादशाहाने ही क्षुल्लक बाब लक्षच देण्याच्या लायकीची नाही असें मानून नजरेआड केली.


राजगडची कारगर सिलाट झपाट्याने सुरू झाली होती. पाथरवटांच्या छन्न्या दगड घडवीत होत्या. लोहाराचा भाता निखारा फुलवीत होता. सुतार, गवंडी, मजूर, भिस्ती कामांत दंग होते. गडाचे कडे फोडून वाटा अवघड बनविण्यासाठी लावलेले सुरुंग उडत होते. राजांचे कारकून देखरेख करीत होते.

नव्या स्वराज्याची नवी राजधानी आकार घेत होती, राजगडच्या रूपाने.

* * *

---

**आधारः**—(१) राजखंड १७।१०. (२) ऐफासा १।३९. (३) राजखंड १५।२६७. (४) राजखंड १५।२६८ व ६९. (५) शिचनि पृ. १३६. (६) मुघोघव पृ. २३७. (७) भोसंऐस्थव. (८) राजकोश.



## ८. पंत दादाजी कोंडदेव

किल्ले सुभानमंगळाचा अमीन मावळांतल्या बंडखोरीमुळे फारच खवळला. या अमिनाचें नांव होतें मिया रहीम महंमद.[१] मियासाहेबांच्या तक्रारी विजापुरांत जातच होत्या. पण अद्याप बादशाह हजरत आदिलशाह यांनी कांहीच उचल घेतली नव्हती. वास्तविक मोठी थोरली फौज येऊन तिच्या टापाखाली हे हरामखोर आणि त्यांचा मुलुख तुडवून निघायला हवा होता. बादशाहाकडून शिवाजीराजांच्या या पहिल्याच पुंडाव्याकडे दुर्लक्ष होत होतें. याला कारणेंहि तशींच होतीं. लहान पोरांसोरांच्या पोरखेळांकडे लक्ष काय द्यायचें म्हणून दुर्लक्ष झालें हें एक. दुसरें असें की, बादशाहाचें सर्व लक्ष व बळ कर्नाटकावरच एकत्र झालें होतें. कारण दक्षिणेंतील उरलीं-सुरलेलीं सर्व काफरराज्यें बुडवून लुटून फस्त करण्यांत त्याचे सर्व सरदार मग्न होते. रामेश्वरास मशीद बांधून तेथील ब्राह्मणांच्या शेंड्या व जानवीं तोडून टाकण्याची महंमद आदिलशाहाची पवित्र महत्त्वाकांक्षा होती ! तो ती बोलूनहि दाखवीत असे.[२] पेनुकोंड्याचा महाराजा व्यंकटेश, विद्यानगरचा श्रीरंगराय, मदुरेचा तिरुमलनाईक, जिंजीचा राजा वेंकटनाईक वगैरे सर्वांना साफ बुडवावयाची त्याची व त्याचे सरदार मुस्तफाखान, अफजलखान, फरादखान, मसाऊदखान वगैरे सर्वांची मनापासून धडपड चालली होती. शहाजीराजे मात्र ही कर्नाटकचीं 'स्वराज्यें' शक्यतोंवर टिकविण्याची व या राजा-महाराजांना आंतून जेवढी मदत करतां येईल तेवढी करण्याची शिकस्त करीत होते.[८]

कर्नाटकच्या स्वाऱ्यांमुळे बादशाहाचें मावळाकडे दुर्लक्ष होत होतें. शिवाय शिवाजी या पोराने पडीक व ओसाड किल्ल्यांवरच फक्त पोरखेळ चालविला आहे, म्हणजे विशेष महत्त्वाची गोष्ट नव्हे, असें तो समजत होता! शिवाय याच वेळीं बादशाह स्वत: फार आजारीहि पडला होता. शहा हाशीम उलुवी नांवाच्या साधूने मात्र 'तूं बरा होशील' असा धीर त्याला दिला होता. तरीपण शिरवळचा अमीन वाट पाहात होता फौज येण्याची. पूर्वी एकदा बादशाहाने तडकाफडकी फौज पाठविली होती.[३] तशीच आताहि हें बंड मोडावयास फौज येईल ही त्याला खात्री होती.

आणि आलीच! विजापुराहून बादशाहाने धाडलेली खूप मोठीं फर्मानें आलीं! फौज आलीच नाही! देशमुख देशपांड्यांना फक्त ताकीद देणारीं कागदी भेंडोळीं आलीं! अमिनाची निराशा झाली. पण आता ती बादशाही रद्दी देशमुख, देशपांड्यांना घरपोच करणें त्याला भाग होतें. अमिनाने आलेलीं फर्मानें देशमुख-देशपांड्यांना रवाना केलीं.

यांतच शिवाजीराजांचा सौंगडी दादाजी प्रभु गुप्ते देशपांडे याचे वडील नरसप्रभु देशपांडे यांना एक शाही फर्मान आलें. फर्मान कडक होतें. नरसप्रभु फर्मान वाचूं लागले. तें असें होतें—[४]

सिका

इजतइसार दादाजी नरसप्रभु देशपांडे कुलकर्णी ताा रोहिडखोरें व वेलवंडखोरें यासि सुाा खमस अर्बेन अलफ वजारतमाहब सीवाजीराजे फरजंद शाहाजीराजे याणे शाहाजीसी बेमानगी करून तुझे खोरियात रोहिरेश्वरचे डोंगराचे असराण पुंडावेयाने मावले वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्ल्यावरील ठाणे उठवून आपण किल्ल्यात सिरला. हाली राजगड किला नाव करून वलकावला तोहि वेलवंड-खोऱ्यालगत. त्यास लोकाचा जमाव तू सामील असून फिसात करून

रसिद राजे मजकूरनिल्हेस देतोस व ठाणे सिरवली आमिनासी रुजु राहत नाहीस व जमाव बितरजुमा करीत नाहीस व तनखाहि हरदु तपियाचा दिवाणात देत नाहीस मगरूरीचे जवाव ठाणगे व नाईकवाडियासि देतोस हे जाहिरात आले. त्यास हे नामाकुल गोष्ट तुझे जमेदारीचे इजतीस आहे. तरी ठाणेमजकुरी आमिनासी रुजू राहणे आणि तनखा साह करोन देणे हे न जालियास खुदावंत शाह तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हक्कानु चालणार नाही हे मनी समजणे आणि याउपरी दिवाणात रुजू राहणे छ ११ सफर.

फर्मान वाचल्यावरोबर नरसप्रभूंची छाती धडधडूं लागली. ‘ खुदावंत शाह तुजला विजापुरीं नेऊन गर्दन मारतील ! ’ हें वाचून तर आपला, आपल्या संसाराचा आणि घरादाराचा नाश त्यांना डोळ्यापुढे स्पष्ट दिसूं लागला ! ते हवालदील झाले. दादाजीपंतांच्या व शिवाजीराजांच्या भानगडींत आपण पडलों खरे. पण आता ठाणेदार अमीन धरणें पाठवील तेव्हा आपल्याला वाचवील कोण, हा प्रश्न नरसप्रभूंना स्वस्थ बसूं देईना. ते भयाने आपल्या घरांतून ‘गुप्त’ झाले ! ते लपून राहिले ![५] अमिनाला कळलें की नरसप्रभु देशपांडा फरारी झाला आहे ![५]

अगदी स्वाभाविक होतें नरसप्रभु घाबरणें. वयाने ते म्हातारे होते. बादशाही वरवंटा पाहाण्यांतच सगळा जन्म गेला होता त्यांचा. बायकापोरांच्या धिंडी कशा निघतात, तरण्या लेकीसुना कशा उघड्या बाजारांत विकल्या जातात किंवा जहाजावर घालून अरबस्तानांत वा तुर्कस्तानांत कशा पाठविल्या जातात, घरांना कशा आगी लावल्या जातात, अन् तोफेच्या तोंडी कसें उडविलें जातें, हें त्यांनी पाहिलेलें होतें. त्यामुळे त्यांना हादरा बसणें स्वाभाविकच होतें. त्यांचे चिरंजीव दादाजी नरसप्रभु गुप्ते हे त्या मानाने बेडर ! दादाजीने ही सर्व भानगड शिवाजीराजांना पत्राने तावडतोब कळविली.

राजांना ही खबर कळलेली होतीच. त्यांनी किंचितहि न डगमगतां अत्यंत प्रभावी व भारदस्त शब्दांत दादाजीला पत्र पाठविलें. तें पत्र असें होतें,—

— श्री —

सिक्का

राजश्री दादाजी नरस प्रभु देशपांडे व कुलकर्णी ताा रोहिडखोरे व वेलवंडखोरे यासि प्रति सीवाजीराजे सुाा खमस अर्वैन अलफ तुम्हास

सिक्का

मेहरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणे सिरवलाहून अमिनानी तुम्हाकडे पाठविला. त्याजवरून तुमचे वाप नरसिबावा हवालदिल जाले वगैरे कित्येक बहुतेक लिाा त्यास शाहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही. श्रीरोहिरेश्वर तुमचे खोरियांतील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. त्यास बावास हवाल होऊ नये खामाखा सांगावा आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताव हुजूर येणे. राजश्री श्रीदादापंताचे विद्यमाने बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इनाम जाले ते कायम वज्रप्राय आहे त्यात अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे वतन वगैरे चालविण्याविसी करणार नाही. हे राज्य व्हावे हे श्रीचे मनात फार आहे याप्रमाणे बावाचे मनाची खातरी करून तुम्ही येणे राा छ २९ सफर बहुत काय लिहिणे ? ( मोर्तब )

रुजू सुरनीस माहे सफर बार

शिवाजीराजांचें हें पत्र वाचून नरसप्रभूंना धीर आला. दादाजीला भयहि वाटलें नव्हतें अन् कधी शंकाहि वाटली नव्हती. त्याचेंहि राजांवरचें प्रेम आणि निष्ठा जास्तच वाढली.

शिरवळच्या अमिनाने या शाही फर्मानाच्या जबाबांची व परिणामांची आतुरतेने वाट पाहिली. पण जबाबहि आले नाहीत आणि परिणामहि दिसला नाही! पाठविलेलीं फर्मानें ज्याने त्याने आपआपल्या दफ्तरांत गुंडाळून ठेवून दिलीं! अमीन चडफडत हुक्क्याची नळी चावीत बसण्यापलीकडे कांहीच करूं शकला नाही.

आता या छोट्याशा नव्या स्वतंत्र राज्याचा कारभार पंतांनी घालून दिलेल्या शिस्तबद्ध पद्धतीनुसार सुरू झाला. पंत स्वतःच कारभार पाहात होते. मलिक अंबरापेक्षाहि काकणभर सरस अशी जमीन-महसुलाची पद्धत पंतांनी घालून ठेवलेली होती. घोडदळ, पायदळ, किल्ले, न्याय वगैरे सर्व खातीं चोख होतीं. पंतांच्याइतकीच करडी शिस्त व पंतांच्याइतकीच साखरमाया शिवाजीराजांच्या स्वभावांत उतरली होती.

एखाद्या कुशल शिल्पकाराने देवाची मूर्ति घडविण्यासाठी हातांत हातोडा आणि छन्नी घ्यावी. अगदी तन्मय होऊन अत्यंत सुंदर मूर्ति घडवावी. प्रसन्न देवपण त्या मूर्तींत अवतरावें. मूर्ति पूर्ण होतांच त्या शिल्पकाराने तिच्याकडे पाहावें. आणि चटकन् हातींचा छन्नी–हातोडा खाली ठेवून त्याने ओंजळभर फुलें भक्तिभावाने त्या मूर्तीवर गहिंवरून वहावींत. त्या ‘ देवाला ’ नमस्कार करावा, अन् म्हणावें, ‘ त्वमेव माता च पिता त्वमेव......त्वमेव सर्वं मम देव देव ! ’—ही मूर्ति मीं घडविली, मीच हिचा निर्माता आहें, हा अहंकार तेथे रतीभरहि न सापडावा, अगदी हीच स्थिति पंतांच्या मनाची होती. शुद्ध आनंद ! पंतांनी शिकविलेल्या प्रत्येक गोष्टींत राजे अगदी तरबेज झाले होते. एवढयाशा लहानग्या वयांत राजांची ही प्रगल्भ कर्तृत्वशक्ति पाहून सर्वांना आश्चर्य वाटे. पंतांना मात्र फक्त उमाप आनंदाचें भरतें येई. त्यांचा आनंद त्या शिल्पकाराचा होता. शिवरायाची मूर्ति त्यांनी घडविली होती. पण ही

मूर्ति मीं घडविली; मीच हिचा निर्माता आहें, असा अहंकार पंतांच्या मनांत कधींहि उमटला नाही. शिवरायांची सुंदर मूर्ति घडल्यावर पंतांनी आपल्या हातांतील कारभाराचा हातोडा आणि लेखणीची छन्नी खाली ठेवली आणि शिवाजीराजांना भक्तिभावाने नमस्कार केला. मूर्तिकाराचें नातें संपलें. भक्ताचें नातें सुरू झालें.

हळूहळू राजे स्वतःच कारभार पाहूं लागले. पंत फार थकले होते. थकत चालले होते. पंत आता केवळ इशारतीचें बोलणें करीत. आता दिवसेंदिवस कठीण कठीण प्रसंगांना तोंड द्यावें लागणार होतें. पंतांचा आधार राजांच्या पाठीशीं डोंगरासारखा होता. पण वार्धक्याने पंत वाकले.

पंतांना आता धावदौड करवेना. थकले. काळजीने माणूस दहापट थकतो.

शिवाजीराजांनी आणि आईसाहेबांनी पुण्यांत प्रथम आल्यानंतर ज्या गणपतीचें देऊळ बांधलें, त्या पुण्यांतल्या कसब्याच्या गणपतीला त्यांनी नंदादीप दिला ( दि. १९ मार्च १६४६ ). पूजाअर्चा व नैवेद्य याचीहि कायमची व्यवस्था याच दिवशीं करून विनायकभट ठकार यांना व्यवस्थेस नमलें.

आपले हे धाडसी उद्योग करतांना शिवाजीराजे चिंचवडास जाऊन श्रीमहाराज देवांचे आशीर्वाद घेत.[६] त्याचप्रमाणे चाकणचे एक थोर विद्वान् वेदमूर्ति सिद्धेश्वरभट ब्रह्मे म्हणून सत्पुरुष होते, त्यांनाहि राजे फार मान देत.[७] पंतांनी व आईसाहेबांनी राजांवर केलेले संस्कार त्यांच्या मनावर शिलालेखासारखे कोरले गेले होते.

—आणि थकलेले पंत आजारी पडले. प्रकृति दिवसेंदिवस ढासळत चालली. शक्ति आटत चालली. पंतांची वृद्ध पत्नी व पुत्र सन्निध असतच. त्यांच्या आयुष्याची आता संध्याकाळ सुरू झाली. पंतांना

आपल्या बायकामुलांची काळजी वाटत नव्हती. तशी वाटण्याचें कांही कारणच नव्हतें. आईसाहेबांच्या मायेखाली कुणी उघडीं पडणार नाहीत. अन् आपल्या पदराखाली महाराष्ट्राला झाकू पाहाणारी ती माउली माझ्या बायकापोरांना वगळणार नाही ही त्यांना अंतरींची खात्री होती. पंतांना काळजी वाटत होती नव्या दौलतीची, शिवाजीराजांची आणि आईसाहेबांचीच ! या सर्वांचें पुढें कसें होणार ? या भयंकर दिव्यांतून हे पार पडतील कसे ? या महासागरांत लोटलेली ही नौका पैलतीरीं जाईल कशी ? पंत परमेश्वराला प्रार्थीत होते—तूंच सांभाळ, तूंच पाठ राख म्हणून.

पंत वेळोवेळीं शिवाजीराजांना मायेच्या शब्दांत सांगत, शिकवत आले होते की राजे, तुम्ही सूज्ञ आहांत ! माझ्या थोड्याथोडक्या बुद्धीप्रमाणे मीं तुम्हांला चार गोष्टी शिकवल्या, त्या विसरूं नका. तुमच्या हातून स्वराज्य आणि धर्मस्थापना होणार, ही ईश्वराचीच योजना दिसते. दूरदृष्टीने बुद्धि पोक्त ठेवून आणि गनीमाला ओळखून दौलत चालवा. मात्र वडिलीं मिळविलेली दौलत घालविली असा दुर्लौकिक होऊं नये. चार गावच्या जहागिरीला स्वतंत्र राज्याचें रूप दिलें. हें अवघड वाण तुम्हीं घेतलेंत. आता पुढची कामगिरी कठीण. चार बादशाह्या चौफेर उठतील. श्रीजगदंबेने तुम्हांस सिंहबळ दिलें आहे. एका वेळीं एकाच गनिमाशीं डाव मांडा. अंगेजणीने काम करा. जिवाचे जिवलग भोवती ठेवा. सर्वांपेक्षा कार्य मोठें आहे. कारभारी ठेवा. सल्ल्याने चाला. जरबेंत ठेवा. राज्यकारणांत कोवळी माया ठेवूं नका. सलाबत राहिली पाहिजे. हें काम तुम्हांहातून पार पडावें ही श्रींचीच इच्छा आहे.

पंत अंथरुणाला खिळले. पंतांनी ओळखलें की, आता हेंच अखेरचें दुखणें. यमाजी भास्करांनी आपल्यावर मोर्चे लावले. लौकरच

यमाजींच्या फौजेचा वेढा पडणार ! आता हा खंगलेल्या शरीराचा गड फार दिवस तगत नाही. पंतांनी शेवटची आवरासावर करण्यास सुरुवात केली. कोणास आता मुद्दाम कांही शिकवासांगायचें उरलें नव्हतें. आजपर्यंत रोजच मायेने रागावून, गोंजारून, समजावून, आर्जवून आणि कधी डोळ्याने दटावून पंतांनी सर्वांस शिकविलें होतें. शिस्त शिकविली होती. न्याय-अन्याय, नफा-तोटा, शत्रुमित्र, अस्सल-बनावट ओळखण्यास शिकविलें होतें. आता कांही उरलेलें नव्हतें.

पंतांचा शेवटचा दिवस जवळ येत चालला. त्यांची महान् पतिव्रता पत्नी अहोरात्र त्यांची सेवा करीत होती. पुत्र सान्निध होता. पंतांचा आवाज खोल जात चालला शिवाजीराजांस पंतांनी जवळ बोलाविलें. राजे जवळ आले. या वृद्ध देहाने पाठ कायमची जमिनीला लागेपर्यंत आपल्याकरिता आणि उगवत्या स्वराज्याकरिता अतोनात कष्ट घेतले आहेत याची जाणीव राजांच्या अंतःकरणांत शिगोशीग होती. त्यांच्याबद्दल शिवाजी-राजांच्या हृदयांत स्वतंत्र आसन होतें. पंतांनी उच्चारलेला शब्द वेचायला राजे सदैव तत्पर आणि अधीर असत. तेथे श्रद्धा होती, प्रेम होतें, कृतज्ञता होती.

राजांनी पंतांच्या शब्दांना कान दिला. पंतांच्या थरथरत्या ओठांतून ठळक पुसट शब्द उमटूं लागले.[१]

“आम्ही बहुतां दिवसांचे पदरचे सेवक. आमचा शेवट आता जाहला. वडिलीं वाढविलीं माणसें, मुलुख, द्रव्य आम्हीं जतन केलें. आता पुढे साहेब खावंद आहेत. सर्व पाहून जतन करावें !”

पंतांनी आपल्या पुत्रास राजांच्या स्वाधीन केलें.

आता केवळ ईश्वरसत्ता ! या लोकीं करणें तें पंतांनी चोख केलें. आता त्यांचा आत्मा राजांना, आईसाहेबांना आणि स्वराज्याला अनेकानेक शुभाशीर्वाद देत होता. पंतांनी अखेरची नजर फिरविली. आणि ती

करडी प्रेमळ नजर कायमची मिटली गेली ! पंत गेले ! पंतांवर अखेरचें पांघरूण मृत्यूने घातलें.

परंतु राजांवरचें मायेचें उबदार पांघरूण मात्र उडालें !

* * *

---

आधार :—(१) शिचनि पृ. १४०. (२) आघइ. महंमद कारकीर्द. (३) ऐफासा १।४८; शिभा १३।४४; शिचसंत्र २, पृ. १२ व १३. (४) राजखंड १५।२६७. (५) शिचसा ८।५२ ते ५४. (६) सपत्रें पृ. १७३. (७) सपत्रें ११३. (८) शिभा ११।३ ते १०; ऐफासा ४।१. (९) चिटणीसब पृ. ६४.



## ९ : किल्ले कोंढाणा

पंत गेले. कारभाराची सर्व जोखीम शिवाजीराजांच्या शिरावर आली. राजांच्याभवती शामराजपंत पेशवे, रघुनाथपंत, सोनोपंत, पंताजी गोपीनाथ, माणकोजी दहातोंडे वगैरे भारदस्त मुत्सद्दी होते. त्याचप्रमाणे तुकोजी चोर सरनौबत [१] आणि त्यांच्या हाताखाली तान्हाजी, येसाजी वगैरे शूर मंडळी होती.

याच वेळीं एक राजकारण निर्माण झालें. जावळीचा चंद्रराव मोरे मरण पावला. ‘ चंद्रराव ’ हा मोऱ्यांच्या घराण्याला किताब होता. मरण पावलेल्या चंद्ररावाचें खरें नांव होतें दौलतराव. दौलतराव फार जरबेचा माणूस होता. स्वतः तो फार शूर होता. अगदी अजिंक्य बळाचा पुरुष. आणि चंद्ररावांची जावळी तर त्याहूनहि अजिंक्य. जावळीचें खोरें अशा कांही अटक बिकट अडचणींत वसलें होतें की, त्यामुळे मोरे अजिंक्यांनाहि अजिंक्य होते. जावळीच्या खोऱ्यांतले, कोकणांतले आणि कृष्णाकाठचे लोक तर चंद्ररावाला बादशाहाच समजत ! [२] असा त्याचा धाक होता. असें त्याचें बळ होतें. पण चंद्रराव मात्र विजापूरच्या बादशाहाचा नम्र सरदार होता.

तो हा दौलतराव चंद्रराव मोरे मरण पावला ( इ. १६४७ ). चंद्ररावाला पुत्र नव्हता. आता जावळीच्या दौलतीला धनी कोण ? चंद्ररावाच्या विधवा बायकोवर आभाळ उघडें पडलें. आता जावळीची

दौलत भाऊबंद किंवा विजापूरचा बादशाह घशाखाली घालणार हें तिला दिसूं लागलें. जर कोणी बळाचा बळवंत आपल्या पाठीशीं भाऊपणाने उभा राहिला तरच दौलत आपल्या घरांत टिकेल, नाही तर सर्व गमावून माजघरांत तांदूळ निवडीत जन्मभर रडत बसावें लागेल हें तिला दिसलें. बाई मोठी शहाणी. तिची नजर राजांच्या राजगडाकडे गेली. हा माझा भोसलेराया माझी भाऊबीज करील असा तिला तिच्या मनाने शकुन दिला.

बाईचें पाचारण शिवाजीराजांना आलें. राजांचें लक्ष जावळीकडे होतेंच. राजांच्या मुलखाला लागूनच जावळी होती. राजे घोडदळ पायदळ घेऊन आणि मनांत सारें राजकारण गुंफून निघाले.

बाईने ठरविलें होतें की, शिवथरच्या मोरे घराण्यापैकी एक मूल गादीवर घ्यावें. बाईने मूल शोधून ठेवलें होतें.

राजे सैन्यासह कोयनेच्या खोऱ्यांत उतरले. जावळी घनदाट अरण्यांत वसली होती. जावळीच्या चारहि अंगांना आपल्या सर्व विक्राळ वैशिष्ट्यां-सह सह्याद्रि उभा होता. खरोखर कोयना खोऱ्यांतील ती जावळीची दरी म्हणजे काळदरीच. राजे जावळींत शिरले आणि त्यांनी भराभर आपल्या सैन्याच्या चौक्या पहारे बसवून आपणच जावळीचा ताबा घेतला. बिनबोभाट जावळी राजांच्या कबजांत आली.[३] राजांनी बाईचा विश्वासघात........

केला नाही! राजांची ती नीत नव्हती. राजांनी जावळी कबजा केली ती स्वतःसाठी नव्हे. मोऱ्यांच्या बाईचा मानस निर्विघ्न पैलाड जावा म्हणून. नंतर राजांनी बाईच्या इच्छेप्रमाणे तिनेच निवडलेलें मूल, नवे ‘ चंद्रराव ’ म्हणून गादीवर स्थापलें. तिच्या मनाप्रमाणे गोष्ट घडली. हें मूल अगदीच लहान नव्हतें. वयाने सुमारे पस्तीस ते चाळीस वर्षांचें होतें! या मुलालाहि दोन मुलें होतीं! चांगला कर्ता लढता

बाप्यामाणूस जावळीच्या दौलतीला धनी केला. याचें नांव बहुधा यशवंतराव असें असावें.[४]

राजांच्या मदतीमुळेच नवा चंद्रराव जावळीच्या गादीवर आला. आपल्या उपकाराला जागून चंद्रराव मोरे कायमचे आपले होतील अशा विश्वासाने व दूरदर्शी धोरणाने राजांनी हें राजकारण केलें. यावेळीं राजांचें वय सोळा पूर्ण होऊन सतरावें चालू होतें.

राजे जावळीहून परत आले. आता तर केवढीं मोठीं राजकारणें वाढून ठेवलेलीं होतीं. पंत दादाजी कोंडदेव हे वारले असें विजापूर दरबारला कळल्याबरोबर दरबारने शिरवळला असलेल्या मिया रहीम महंमद ठाणेदाराला कोंढाणा किल्ल्यावर व कोंढाणा सुभ्यावर नेमलें व त्याला हुकूम पाठविला की, कोंढाण्यावर रुजू व्हा. राजांना नेमकें हें बाधणार होतें. हा मिया रहीम आपल्याला फार त्रासदायक ठरणार हें राजांनी आधीच ओळखलें होतें. ते विचारांत पडले होते, कोंढाणा ताबडतोब आपल्या कबजांत कसा घ्यावा? कोंढाण्याचा किल्लेदार या वेळीं सिद्दी अंबर वाहब म्हणून जुना आणि कर्तबगार माणूस होता. त्यामुळे तर जास्तच अवघड काम होतें. राजगडच्या ईशान्येला बरोबर सहा कोसांवर सरळ रेषेंत कोंढाणा आहे. राजांची नजर कोंढाण्यावर खिळली होती. कोंढाणा हवा! कोंढाणा स्वराज्यांत हवा!

राजांनी बापूजी मुद्गल देशपांड्यांना आपल्या मनांतली गुंज सांगितली. कोंढाणा हवा! कांहीहि करून कोंढाणा हवा! बापूजी कोंढाण्याच्या दक्षिणेस पसरलेल्या खेडेबाऱ्याचे देशपांडे होते. त्यामुळे कोंढाण्याची नसन् नस त्यांना माहीत होती. पण कोंढाणा काबीज करणें म्हणजे काय थट्टा? सहा महिने झुंजूनहि हातीं येणें कठीण. पण माझ्या अकलेचें बळ दाखवतोंच राजाला, अशी गाठ मनाशीं बांधून बापूजी निघाले. एकटेच.

आणि काय सांगावी बापूजींच्या गुळचट जिभेची तारीफ ! बापूजींनी कोंढाण्याच्या गडकऱ्याशीं कारस्थान करून, त्याला फितवून, भुलवून आपलीं माणसें गडावर घातलीं. बिनबोभाट कोंढाणा बापूजींच्या स्वाधीन झाला ! [५] न लढतां गडावर झेंडा लागला ! तलवार लाजली ! आता कोणी हिणवायला नको की, बामणाचें काम अन् सहा महिने थांब ! झटक्यांत् काम केलें. राजे बेहद्द खूष झाले.

आणि मिया रहीम महंमद, नामजाद सुभेदार किल्ले कोंढाणा आपल्या सुभेदारीचा ताबा घ्यावयास शिरवळहून कोंढाण्याकडे निघाले. शिरवळहून कोंढाणा फक्त अकरा कोस, अन् सुभेदारसाहेबांना बातमी आली की, गड भोसल्याच्या पोराने फितवा करून बळकावला ! मिया रहीमला चडफडत माघारी फिरावें लागलें. बिचाऱ्याच्या मुंडावळ्या वाटेंतच तुटल्या. त्याने ही खबर विजापुरास कळविली. तो दुसरें काय करणार ?

विजापुरास आजपर्यंत शिवाजीराजांविरुद्ध कितीतरी वेळां बातम्या आल्या होत्या. शिवाजी भोसले उनाड पोरें जमवीत असतो, इथपासून बातम्यांना सुरुवात झाली होती. ही पहिली बातमी ऐकून बादशाह हसला. पुढच्या बातमीच्या वेळीं तो थोडेंसेंच हसला. नंतर पुढे बादशाह मुळींच हसला नाही. एक दिवशीं त्याच्या गुडगुडींतली राख किंचित् उडाली.

आणि आता बातमी आली, 'शिवाजी भोसल्याने किल्ले कोंढाणा कबजांत घेतला !'

त्याच्या गुडगुडींतली राख एकदम उडाली ! बादशाह भडकला ! शहाजीचा एवढासा पोरगा एवढी धाडसी करामत करूं शकतोच कसा, याचें त्याला मनस्वी आश्चर्य वाटलें. तांबडा थेंबहि न पडूं देतां पोराने गड कबजा केला. अजबच ! आता बेफिकीर राहिलों तर शिवाजीची शरारत फैलावेल. ती गोशमाल केलीच पाहिजे. या विचारांत बादशाह गढून गेला.

मराठा ... ... स्थळप्रत
अनुक्रम २८४७८ दि: ...
क्रमांक ८६५ नों: दि: ...



शिवाजीराजांनी कोंढाणा ताब्यांत येतांच गडाचा बंदोबस्त केला. आणि पुढची झडप घालण्याकरितां किरण साधले. अन् अकस्मात् झपकन् झडप टाकली ती शिरवळच्या ठाण्यावरच! मिया रहीम महंमदाचें हें मुक्कामाचें ठाणें. पार दाणादाण उडवून राजांनी किल्ले सुभानमंगळहि झपाट्याने घेतला. मियासाहेबाचें बिऱ्हाडच हाललें! शिवाजीराजांच्या मावळे मंडळींचा उत्साह भरतीच्या लाटेसारखा फोफावत होता.

अन् शिरवळचा किल्ला शिवाजीने घेतल्याची ही ताजी खबर बादशाहाच्या कानीं पडली! न कळत एकदम कानाशेजारी बंदुकीचा बार उडावा तशी वाटली ती त्याला. ठाणें शिरवळ, किल्ले सुभान मंगळ शिवाजीने कबजा केला! बादशाहाचा राग जास्तच भडकला. आणि तो विचार करूं लागला. मोठ्या गहन चिंतेंत पडला तो.

कां? एवढेंसें चिमुकलें बंड मोडायला एवढा विचार? एखादा मोठा फौजबंद सरदार आणि दहा तोफा पाठविल्या असत्या तर चार तासांत हा सर्व पोरखेळ अस्मानांत उडाला नसता का? मग त्यासाठी एवढा विचार? चिंता?

होय. कारण हें इतकें सोपें नव्हतें. शिवाजीचें बंड मोडणें ही एक क्षुल्लक गोष्ट आहे, असें बादशाहाहि समजत होता. त्यासाठी हुकूम सोडून एखादा सरदार शिवाजीवर पाठविण्यास अधीरहि झाला होता. पण हें करतांना त्याला धास्ती वाटत होती शहाजीराजांची. आपल्या पोराविरुद्ध फौज गेली आहे, असें जर कर्नाटकांत शहाजीला कळलें, तर तो बिथरेल. त्याच्या हाताखाली कर्नाटकांत पंधरा हजार फौज कुर्बान आहे. शहाजी बंडच करील. त्याला ती सवय आहे! तीच सवय त्याच्या पोरांत उतरली आहे. दक्षिणेंतील काफर राजेलोकहि शहाजीवर मोठी प्यार मोहब्बत करतात. आणि मग शहाजीचें बंड

आपल्याच अंगावर उतेल. शहाजी शूर आहे. सतत तीन वर्षे निजामशाही आपल्या मांडीवर घेऊन तो दिल्लीशीं लढत होता. म्हणून शिवाजीचें बंड मोडण्यापूर्वी शहाजीचा विचार केला पाहिजे.

याच वेळीं नेमकी एक थैली कर्नाटकांतून आली. बादशाहाचा प्रख्यात प्यारा सरदार अफजलखान याने ती धाडली होती. खानाचा व शहाजीराजांचा मुक्काम जिंजीच्या पायथ्याशीं आपआपल्या लष्करी छावणींत शेजारीशेजारी होता. अफजलखानाने बादशाहाला कळविलें होतें—[६]

"शहाजीराजे भोसले बादशाहांशीं बेइमानी करीत आहेत ! येथील रांचेवार मराठ्यांशीं त्यांची रिश्तेदारी आहे. हजरत बादशाहांच्या दुष्मनांना शहाजीराजे आंतून मदत करीत असतात. ही दगाबाजी आहे. हुजूरनी या कलमाचा बंदोबस्त करावा !"

अफजलखानाचें हें पत्र पाहिल्यावर मग तर बादशाह सुन्नच झाला. शिवाजीला पकडायला जावें तर शहाजी नक्की बंड करील. अन् शहाजीला पकडायचें ठरवावें तर तो हमखास बंडाचा वणवा पेटवील. आणि मग कुतुबशाह नि मोंगल टपलेले आहेतच आपल्यावर घाव घालायला. काय करावें ? काय करावें ?

या वेळीं लहमाजी ज्योति नांवाच्या आणखी एका शाही अंमलदाराचें असेंच एक पत्र आलें. शहाजीराजे हे जणू कर्नाटकचे बादशाह बनूं पाहात आहेत, इकडील राजेलोक शहाजीराजांना फार मानतात, अशी तक्रार लहमाजीने केली होती.

बादशाह महंमद आदिलशाह मोठ्या विचारांत पडला.

पण सल्लागार मुत्सद्दी होतेच जवळ. बादशाहाने आपला वजीर मुस्तफाखान यास बोलावून घेतलें. दरबारी सरदारांत या वेळीं मुस्तफाखान, बाजी घोरपडे, अफजलखान, मंबाजी भोसले, फत्तेखान,

८९५ १०१

फर्दिखान वगैरे सरदार शहाजीराजांचा अतोनात द्वेष करीत असत. राजांच्या सतत वाइटावर राहणारी ही मंडळी होती. या वेळी अफजलखान कर्नाटकांत होता. बाकीचे विजापुरांत होते.

शहाजी भोसल्याला बायकापोरांसह आगींत ओढायला ही फार चांगली संधी आली आहे हें पाहून मुस्तफाखान व बाजी घोरपडे यांना फारच उत्साह आला. बादशाहाने मुस्तफाखानास आपला पेच सांगितला. त्यावर नवाब मुस्तफाखानाने अचूक सल्ला दिला. बाजीराजे घोरपडे व बड्या बेगमेचा म्हणजे बादशाहाच्या बायकोचाहि सल्ला हाच होता. प्रथम शहाजीला कैद करायचें आणि ताबडतोब शिवाजीवर फौज पाठवायची. म्हणजे बाप कैद झालेला पाहून शिवाजी मुठींत नाक धरून शरण येईल. सर्वांसच हा बेत पटला. परंतु शहाजीला कैद करायचें कसें ? त्याच्यापाशी फौज आहे. तो स्वतः दांडगा आहे. तो सापडावा कसा ? पण हा सवाल नवाब मुस्तफाखानाला तर फारच क्षुल्लक वाटला. आपल्याच दरबारची सरदारी करणारा शहाजी आपल्याच हातीं सापडणें काय कठीण ? कुठेंहि अन् कसाहि पकडूं. आणि ती जबाबदारी प्रत्यक्ष मुस्तफाखानानेच उचलली. खानाच्या मदतीला बाजीराजे घोरपड्यांसारखा निष्ठावंत पाईक तयार होताच. आणि बादशाहाने नवाब मुस्तफास हुकूम दिला की, कर्नाटकांत जाऊन बगावतखोर शहाजीला गिरफ्दार करा.[१]

अत्यंत गुप्तपणें हा डाव रचण्यांत आला. बादशाहाला व कांही अगदी विश्वासाच्या लोकांनाच ही मसलत माहीत होती. मुस्तफाखान आपल्याबरोबर खूप मोठी फौज व बाजीराजे घोरपडे यास घेऊन विजापुराहून जिंजीकडे जाण्यास निघाला (दि. १७ जानेवारी १६४८). नवाबाच्या फौजेंत खानखानान, रुस्तुमजमान व बहलोलखान वगैरे अनेक महशूर सरदार होते.

नबाव मुस्तफाखान हा फार प्रसिद्ध सरदार होता. आदिलशाहाचा तो मुख्य वजीर होता. विशेष म्हणजे तो बादशाहाचा सासरा होता. त्याची ताजजहाँ बेगम नांवाची मुलगी बादशाहाला दिलेली होती.[७] शिवाय निजामशाहीचा प्रख्यात मरहूम मुत्सद्दी वजीर मलिक अंबर याचा जावई होण्याचा मान मुस्तफाला लाभलेला होता.[८] असें हें जुनें मिजासखोर प्रस्थ होतें. मुस्तफाखानाचें त्याच्या पदव्यांसह सबंध नांव होतें, मिर्झा महंमद अमीन लारी नवाब मुस्तफाखान मनसब-इ-कार-इ-मुल्की ऊर्फ खानबाबा.[९] तो मूळचा खुरासान देशांतला होता.[१०]

शहाजीराजांना कैद करण्याकरिता मुस्तफाची फौज जिंजीची वाट कातरूं लागली.

इकडे शिवाजीराजांचा स्वराज्याचा डाव रंगत चालला होता. आट्यापाट्यांतला 'सूर' जसा चौफेर लक्ष फिरवीत खेळत असतो तसा प्रत्येकजण सावधपणाने व चलाखपणाने वागत होता.

आपल्यावर एक भयंकर संकट कोसळणार आहे याची कल्पना कर्नाटकांत शहाजीराजांनाहि नव्हती आणि मावळांत शिवाजीराजांनाहि नव्हती.

* * *

---

**आधारः**—(१) सभासद पृ. ८. (२) पसासं ५१७. (३) शिभा १३।४३. (४) शिचनि पृ. १४६. (५) जेधेशका. करीणा. (६) जेधे करीणा. (७) शिचवृसं २।१०. (८) पेपया पृ. ८. (९) शिभा ११।११. (१०) शिभा ११।१७.

## १० : घात

नवाब मुस्तफाखान जिंजीच्या नजीक येऊन पोहोचला. शहाजी-राजांची छावणी जिंजीच्या जवळच होती. नवाब येत आहे हें शहाजीराजांना समजतांच ते त्याला सामोरे निघाले. पण एकटेदुकटे नव्हेत, सैन्यासह.[१] शहाजीराजांना नवाबाबद्दल काडीइतकेंहि प्रेम वाटत नव्हतें.[१] कारण त्यांना अनुभवाने माहीत होतें की, हा नवाब आपला, आपल्या धर्माचा आणि धर्मबांधवांचा अतिशय द्वेष करतो. पण तो आता मुख्य वजीर आहे. मनांत नसलें तरी केवळ रिवाज म्हणून सामोरें गेलें पाहिजे.

नवाब मुस्तफाखानाची व शहाजीराजांची भेट झाली. आणि मग आदरातिथ्यें झालीं. खानबाबाने आपल्या छावणीचा मुक्काम राजांच्या जवळच ठोकला. तो राजांशीं आता फारच प्रेमाने वागूं लागला. जिंजीचा किल्ला वेंकट नाईक नांवाच्या राजाच्या ताब्यांत होता. तो जिंकून घेण्याची मोहीम सुरू होणार होती. मुस्तफाखान प्रत्येक बाबतींत राजांचा सल्ला विचारून, त्यांना खूप मान देऊन व पुढाकार देऊन वागत होता. पण त्याच्या मनांत भयंकर पाप होतें !

राजांना पकडावयास तो जपूं लागला. पण प्रत्येक वेळीं त्याला असें दिसूं लागलें की, शहाजीच्या भवती त्याचे शूर हस्तक व सैनिक

आहेतच. अनेक वेळां मनांत आणूनहि त्याला राजांवर झडप घालतां आली नाही.[२] पण त्याने तुम्ही आम्ही भाई भाई, हें लबाडीचें नाटक मात्र चालूच ठेवलें. राजे आले की त्यांना तो खोट्या आदराने आईये जनाब! म्हणून उठून ताजीम देई. चार पावलें सामोरा जाई. राजांचे हात आपल्या हातीं घट्ट धरून, हसत हसत त्यांच्या हातांत हात घालून व गोड गोड बोलून आपल्या अगदी शेजारीं बसवी. प्रेमाने खूप बातचीत करी. भेटीदाखल बेशकीमत चिजा तो राजांना पेश करी. अगदी मिठ्ठास हसे. अत्यंत महत्त्वाच्या व गुप्त मसलती राजांना सांगे. त्यांतल्या खऱ्या किती अन् बनावट किती हें खुदा जाणे! नंतर तर खान इतक्या सलगीने वागूं लागला की, तो लडिवाळपणें राजांची थट्टामस्करीहि करूं लागला. तर कधी कधी गंभीर उदात्त अध्यात्मावरच चर्चा करूं लागला![३] राजांवर इतकें प्रेम करणें, राजांच्या बायकांनाहि कधी साधलें नसेल! खान राजांना विश्वासांत घेण्यासाठी एकामागोमाग एकेक रोज नवीं नवीं जाळीं फेकूं लागला.

आणि राजांनाहि त्याचें मोठें गूढ वाटलें. नेहमी आपला मत्सर करणारा हा गृहस्थ हल्लीच कां आपल्यावर एवढें प्रेम करतो आहे, हें रहस्य राजांना उकलेना. कारण खानाचें वागणेंच तितकें सफाईचें होतें. पण तरीहि एकदा सहज थट्टेथट्टेने राजांनी खानाला म्हटलेंच की, दगा करण्यापूर्वीच दगा करणारे लोक अशा दाट प्रेमाने वागतात!!

हें ऐकून मुस्तफाखान चमकलाच! त्याला वाटलें, शहाजीने अखेर आपला डाव ओळखला रे ओळखला! खानाच्या मनाची त्रेधातिरपीट उडाली. वास्तविक राजांच्या मनांत तशी कुत्सित धूर्तता कांहीहि नव्हती. पण खानाच्या मनांत चांदणें लखाखलें. कारण तो चोर होता!

बावरलेल्या खानाने सफाईने झटकन् राजांच्या हातावर हात ठेवून

गंभीरपणें म्हटलें की, मी कुराण शरीफ आणि माझा लडका आतिशखान यांची कसम खाऊन सांगतों की, राजे, माझ्या हातून तुम्हाला हरगीज दगा होणार नाहीं[४] !

आता मात्र राजांना पटलें की, मुस्तफाखान फार फार चांगला मनुष्य आहे ! खान – भोसले भाई भाई ! खानासारखा माणूस नाही !

अन् त्याच दिवशीं ( दि. २५ जुलै १६४८ ) रात्रीं नवाब मुस्तफाखानाने आपल्या सर्व सरदारांस एकांतांत गोळा करून अतिगुप्तपणें त्यांच्याशीं मसलत केली.[५] त्या गुप्त खलबतांत अफजलखान, बाजीराजे घोरपडे, याकूतखान, अजमखान, राघो मंबाजी, वेदाजी भास्कर, बाळाजी हैबतराव, सिधोजी पवार, मंबाजी पवार, मंबाजी भोसले वगैरे अनेक सरदार होते. मुस्तफाखान नवाबाने सर्वांस म्हटलें,[६]

“ हम हजरत बादशाह का आबदाना खाते हैं । इसलिये हमें बादशाह की हरतरह की खिदमत के वास्ते तैयार रहना चाहिए । हमारी जानपर बादशाह का हक् है । शुक्र है उन्हें जो मालिक की खिदमत इमानदारीसे करता है । मालिक की खिदमतमें यार-दोस्त, रिश्तेदार, सगाभाई इतनाही नहीं खुद अपने बाप की भी परवाह न करनी चाहिए । हमें अपने हजरत महंमद बादशाह के वास्ते सब कुछ करने के लिए तैयार रहना चाहिए । बादशाह हजरत महंमद आदिलशाहने हुक्म भेजा है की शहाजी राजा भोसले को कैद किया जाय । वह ताकदवर शहाजी राजा भोसला अब गहरी नींद में सो रहा है । इसलिये जागने के पहले हमें उन्हें गिरफ्तार करना होगा । ”

छापा घालण्यास तयार राहा असा हुकूम सर्व सरदारांस खानाने दिला. अंधारांतील हें गुप्त खलबत संपलें तेव्हा मध्यरात्र उलटली होती. सर्वांत जास्त उत्साह बाजी घोरपड्याचा होता. कारण तो शहाजीराजांना अगदी पाण्यांत पाहात असे.

शहाजीराजे खूप वेळ जागे होते. खूप उशिरां ते झोपावयास गेले. हा आषाढाचा महिना होता. तिथि पौर्णिमा होती. आकाशांत पूर्ण चंद्र होता. पण तो आषाढी काळ्या ढगांनी वेढला गेला होता. आपल्या शामियान्यांत जाऊन राजे झोपले. कांही वेळ गेला न गेला तोंच शामियान्याची कनात झटकन् वर सरकली ! राजांनी दचकून एकदम उठून पाहिलें. एक माणूस झटकन् पुढे आला आणि त्याने लगबगीने राजांना मुजरा केला. राजांचाच तो शिलेदार होता. राजांनी त्याला 'काय' म्हणून विचारलें. त्याने राजांना हळूच एक भयंकर बातमी सांगितली ![७]

"सरकार, नवाब मुस्तफाखानाने आपल्या सरदारांच्या संगती मध्यान् रात उलटेपावतर गुप्त मसलत चालविली होती ! अन् आत्ता त्याचे सगळे सरदार आपआपल्या डेऱ्यांत हत्यारें बांधून जय्यत तयार राहिले आहेत !"

खानाचा खास दगा करण्याचा मनसुबा आहे, ही गुप्त बातमी त्या हेराने शहाजीराजांना सांगितली.[७] पण राजांना ती खरीच वाटली नाही. राजांना पटली नाही. आपल्याशीं इतक्या प्रेमाने वागणारा मुस्तफाखान आपला विश्वासघात करील ? छेः !

अशक्य ! शिवाय खानाने आपण होऊन शपथ घेतली आहे की, माझा पोटचा पुत्र आतिशखान आणि कुराण शरीफची कसम खाऊन सांगतों की, मी हरगिज तुम्हाला दगा करणार नाही. शहाजीराजांच्या डोळ्यापुढे आपले हात घट्ट दाबून धरणारी,[६] गोड स्मित करणारी, अत्यंत जिव्हाळ्याने बोलणारी आणि आपल्याला कळकळीने वचन देणारी ती बंधुतुल्य मुस्तफाखानाची आदरणीय मूर्तीच जणू या वेळीं उभी राहिली ! त्यांची खात्री होती की, तो प्रेमळ हात आणि ती खानदानी जबान आपल्याशीं बेवफाई करणार नाही ! शक्यच नाही !

शामियान्याची कनात पडली.

राजांनी हेराच्या बातमीकडे पूर्ण दुर्लक्ष केलें![७] राजे शांत, निश्चित, गाढ झोपले! छावणींतली सर्व फौज झोपली!

रात्र दाटत गेली. गार वारा वाहात होता.[८] छावणींत निःशब्द शांतता पसरली होती. छावणीभवतीचे गस्तवाले फक्त जागे होते. आणि नवाबाच्या छावणींत मात्र गुप्तपणें जय्यत तयारी झाली होती. नवाब मुस्तफा आणि बाजी घोरपडे यांच्या विषारी कानगोष्टी संपल्या होत्या. मुख्य कामगिरी बाजीनेच अंगावर घेतली होती. मध्यरात्र पूर्ण उलटून उत्तर रात्रीचा अंमल सुरू झाला होता. शहाजीराजांना व त्यांच्या फौजेला मोठ्या पहाटेची साखरझोप लागली होती. पहाटेचे सुमारें साडे–तीन वाजले होते.

एवढ्यांत हुकुमाची वाट पाहाणाऱ्या हजारो हशमांना हुकूम झाला! अन् हजारो घोडेस्वार व प्यादे हशम खानाच्या छावणींतून भाले तलवारी परजीत राजांच्या छावणीवर तुटून पडले. दिलावरखान, मसूदखान, सर्जायाकूतखान, अंबरखान, फर्रादखान, खैरियतखान, याकूतखान, अजमखान, बहलोलखान, मलिक रेहानखान, राघो मंबाजी, वेदाजी भास्कर, बाळाजी हैबतराव, सिधोजी पवार, मंबाजी पवार, मंबाजी भोसला, अदोनीचा राजा, कर्णपूरमचा राजा, मुधोळकर बाजी घोरपडा, खंडोजी, अंबाजी व भानाजी हे तिघे बाजीचे भाऊ, यशवंतराव वाडवे, मालोजी पवार आणि तुळोजी भोसला इतके सरदार शहाजीराजांच्या झोपलेल्या व त्यामुळे अत्यंत बेसावध असलेल्या छावणीवर मुस्तफाच्या हुकुमाने एकदम तुटून पडले![९] स्वतः मुस्तफाखान मात्र गेला नाही. कारण त्याने राजांना वचन दिलें होतें! पण पिछाडीला राहून सेनापतित्व तोच करीत होता.[१०]

ही हजारो हशमांची धाड एकदम राजांच्या छावणीवर आली आणि तिने सबंध छावणीला गराडा घातला.[९] त्यांचा आरडाओरडा एवढा

प्रचंड होता की, त्यामुळे राजांचे झोपलेले सैनिक घाबरून भांबावूनच गेले. एकच गोंधळ उडाला.

बाजी, खंडोजी, अंबाजी व मानाजी हे घोरपडेबंधु शहाजीराजांच्या रोखाने एकदम छावणींत घुसले. त्यांच्याबरोबर यशवंतराव वाडवे हा शहाजीराजांचा कट्टा वैरी होता.[११] राजांच्या बेसावध फौजेची तर अक्षरशः दाणादाण उडाली. राजे हा आरडाओरडा ऐकून खडबडून जागे झाले व ढालतलवार घेऊन बाहेर धावले. आता ते 'तयार व्हा! तयार व्हा!' म्हणून आपल्या लोकांना ओरडून सांगत होते.[१२] राजे लगेच एका घोड्यावर स्वार झाले.

बाहेर गोंगाट माजला होता. राजांचे सैनिक ओरडत होते, 'घोडा घोडा! तलवार तलवार! भाला भाला!' कारण त्यांच्या हाताशीं यांपैकी एकहि गोष्ट चटकन् लागेना. हल्ला तर भयंकर आलेला. बाजी घोरपडे घोड्यावरून राजांच्या शामियान्याच्या रोखाने दौडत आहे, हें राजांच्या पदरच्या खंडोजी पाटील नांवाच्या अत्यंत शूर शिलेदाराने पाहिलें. तो मात्र या गडबडींतहि भाला घेऊन घोडयावर स्वार झाला होता. खंडोजी पाटलाला बाजी घोरपडे व त्याची टोळी दिसतांच खंडोजीने एकदम ताडताड घोडा उडवीत थेट बाजीवर चाल केली. बाजी, बाजीचे भाऊ व इतर हशमांनीहि आरोळ्या ठोकल्या. आणि एकट्या खंडोजी पाटलावर असंख्य लोक तुटून पडले.[१३] घोडयावरून खंडोजी पाटील भाला फिरवूं लागला. अन् तोहि अशा जोशाने की, किंकाळ्या फोडीत घोरपडयांचे हशम पटपटा मरूं लागले. त्याच्याभवती नाचत्या घोडेस्वारांचें रिंगण त्याच्यावर हल्ले करीत होतें. आणि तो एकटा सर्वांशीं लढत होता. बाकीच्या छावणीची मात्र स्थिति वादळांत सापडलेल्या गवताच्या सुट्या पेंडयांसारखी झाली होती. एकटा लढणारा खंडोजी भाल्याने घाव आडवीत होता. त्याच्या भवतीचे शत्रु त्याच्यावर

नेम धरून हत्यारें फेकीत होते. तो तीं उडवून लावीत होता. एवढ्यांत बाजी घोरपडयाने गुर्झ म्हणजे गदेसारखे एक जड शस्त्र नेम धरून खंडोजी पाटलावर जोराने हाणलें. तें खंडोजीच्या वर्मीच बसलें. अन् खंडोजी पाटील घोडयावरून धाडकन् कोसळला. गतप्राणच झाला.

घोडयावरून शहाजीराजे हातांत ढालतरवार घेऊन लढत होते. बाजी घोरपडयाला हवे होते खुद्द राजेच. बाजी तेथून निघाला तो वेध घेऊन एकदम राजांच्या अंगावर धावून आला. शहाजीराजे समोर बघतात तों खुद्द बाजी घोरपडेच! आपण ज्याच्या हिताकरिता कष्ट केले, तो आपल्या रक्ताचा भाऊबंद आपल्यावरच धावून आलेला पाहून

*मायावी शब्दजालाची मोहिनी ' हिंदु राजा 'वर पटकन् पडते*



राजे एक निमिषभर थक्कच झाले. पण लगेच घावावर घाव विजेप्रमाणे आदळूं लागले.

घोरपडे म्हणजे भोसल्यांचे प्रत्यक्ष भाऊबंद. एकाच वंशाचे. एकाच रक्ताचे. मुधोळकर भोसल्यांनी स्वतःला 'घोरपडे' हें आडनांव स्वीकारलें होतें. वाजी घोरपडे मनापासून भाऊबंदकी करीत होता. हुषार मुस्तफाखानाने ही आजची झुंज भावाभावांत लावून दिली होती. शहाजीराजांच्या मदतीला राजांचा पुतण्या त्र्यंबकजी शरीफजी भोसले व योगाजी भांडकर, संताजी गुंजावटकर, मेघाजी ठाकूर, दसोजी गवळी व इतरहि त्यांचे अनेक सैनिक धावून आले आणि मग तुंबळ रण सुरू झालें. वाजी कडाक्याने झुंजत होता. राजे व त्यांचे वीरहि शर्थ करीत होते. आता उजाडलें होतें. पौर्णिमा संपून वद्य प्रतिपदा झाली होती. राजांचीं माणसें मरून वा जखमी होऊन पडत होतीं. राजे थकत चालले होते. वद्य चंद्राचें बळ कमी कमी होत होतें. जखमांमुळे राजांच्या अंगांतून रक्त वाहत होतें.

—आणि लढतां लढतां राजांना भोवळ आली आणि ते आपल्य घोड्यावरून जमिनीवर कोसळले! आणि बाजी घोरपड्याने बेहोष होऊन आनंदाने आरोळी ठोकली! शत्रूचे सर्वच हशम व सरदार मोठमोठ्याने विजयाच्या गर्जना करूं लागले. राजांच्या फौजेची तर वाताहत झाली. आता राजांचा देह तुडविला जाणार हें स्पष्ट दिसूं लागलें. तेवढ्यांत शत्रूच्याच सैन्यांतील एका सरदाराने घोड्यावरून उडी टाकून धावत जाऊन राजांच्या मस्तकावर आपली ढाल धरून त्यांचें रक्षण करण्यास सुरुवात केली. मुस्तफाखानाच्या या सरदाराचें नांव होतें बाळाजी हैबतराव.[१४]

वाजी घोरपड्यानेहि लगेच उडी टाकली आणि दात पाडून टाकलेल्या नागाला गारुडी जसा पकडतो, त्याप्रमाणे वाजीने बेशुद्ध

होऊन पडलेल्या शहाजीराजांना आपल्या हाताने स्वतः कैद केले.[१५] केवढें कौशल्य बाजीचें !


मुस्तफाखान खूष झाला. राजांना तंबूंत नेण्यांत आलें. त्यांच्या छावणींतील सर्व साजसरंजाम मुस्तफाखानाने जप्त केला. आज एक अत्यंत बिकट गोष्ट खानाने व बाजीने साधली होती. शहाजीराजांच्या हातांत व पायांत लोखंडाच्या बेडया ठोकण्यांत आल्या ![१६] शहेनशाह शाहजहानला व आदिलशाहाला एकेकाळीं वर्षन्‌वर्षे शह देणारे साहसी शहाजीराजे आज या शेळपट शाही सरदारांचें सहज सावज झाले (दि. २५ जुलै १६४८).

शहाजीराजे शुद्धीवर आले तेव्हा त्यांना दिसलें की, आपण कैदी आहोंत ! आपल्या हातापायांत बेडया आहेत !

* * *

---

**आधारः**—(१) शिभा ११।१८. (२) शिभा ११।२२. (३) शिभा ११।२४ ते २८. (४) शिभा ११।११४. (५) शिभा ११।२९. (६) शिभा ११।३० ते ३८. (७) शिभा ११।४९. (८) शिभा १२।३. (९) शिभा १२।१ ते ११ व १६ ते २०. (१०) शिभा १२।१५. (११) शिभा १२।१६ ते २०. (१२) शिभा १२।२२. (१३) शिभा १२।२५ ते ४०. (१४) शिभा १२।१०९. (१५) शिभा १२।११०. (१६) मुहंमदनामा.



# ११ : किल्ले सुभान मंगळ

राजगडावर आनंद आणि उत्साह ओसंडत होता. शिवाजीराजे, आईसाहेब, सर्व मुत्सद्दीमंडळी नव्या स्वराज्याचीं नवीं नवीं राजकारणें रचण्यांत गुंग होती. आता नवीन काय जिंकायचें, कसें जिंकायचें, कोणती तटबंदी करायची, बुरुज कोठे बांधायचे, पहारे कुठे ठेवायचे, सरहद्दीवर गस्त कशी ठेवायची, राजगड, तोरणा, सुभानमंगळ, कोंढाणा वगैरे गडकिल्ल्यांचा जास्तींत जास्त पक्का बंदोबस्त कसा ठेवायचा, ते झुंजते कसे बनवायचे, बादशाही किल्लेकोटांतून आणि तिकडच्या सरदार जहागिरदारांच्या पोटांतून गुप्त गुप्त बातम्या कशा काढून आणायच्या वगैरे किती तरी महत्त्वाच्या गोष्टींचा खल समईच्या उजेडांत व जगदंबेच्या पायाशीं बसून खलबतखान्यांत गुप्तपणें नित्य चालला होता. नवीन नवीन साहसें करण्यासाठी, पराक्रम गाजविण्यासाठी आणि शिवबाची शाबासकी मिळविण्यासाठी मावळी अंतःकरणें फुरफुरत होतीं.

—आणि तेवढ्यांत ती कडू जहर खबर राजगडावर आली ! श्रावणी पुनवेच्या मध्यरात्रीनंतर मुस्तफाखानाने अन् बाजी घोरपड्याने महाराज शहाजीराजांच्या छावणीवर दगा करून छापा घातला ! बाजी घोरपड्याने शहाजीराजांना गिरफ्तार केलें ! उभ्या छावणीची नासाडी केली. माणसें मारलीं, छावणी लुटली. शहाजीराजांना जखमा झाल्या. ते आता मुस्तफाखानाच्या कैदेंत आहेत. अन् त्यांच्या हातीं-पायीं बेड्या ठोकण्यांत आल्या आहेत. मुस्तफाखानाने वचन देऊन हा असा भयंकर

विश्वासघात केला. बादशाहाने शहाजीराजांवर खानाच्या व बाजीच्या हातून असा डाव केला.

ही बातमी ऐकून राजगड सुन्न झाला! कुऱ्हाडच कोसळली! स्वराज्यावर, शिवाजीराजांवर आणि आईसाहेबांच्या सौभाग्यावर हें केवढें भयंकर संकट आलें! आईसाहेबांचा जीव कळवळला. त्यांचें मंगळसूत्रच बादशाहाने अलगद पकडलें! आता केव्हा हिसडा मारून तो तें तोडून टाकील याचा नेम उरला नाही. सर्वांचीं छाताडें धाड धाड उडूं लागलीं. शिवाजीराजांच्या हृदयाचा थरकाप उडाला. मागचा सारा इतिहास सर सर सर डोळ्यांपुढून सरकूं लागला. मुरार जगदेवांचें काय झालें? आपले आजोबा लखुजी जाधवराव यांचें काय झालें? आपल्या तिघां मामांचें काय झालें? चतुर साबाजीपंतांचें काय झालें? बाबाजी काट्यांचें काय झालें? आणि आता पाळी आली आपल्या वडिलांवरच! आता काय होणार? शिवाजीराजांच्या मनाला भयंकर भविष्य भेडसावूं लागलें. पण हें असें अकस्मात् घडलें तरी कसें? दगा झाला तरी कसा?

त्याहि बातम्या एकामागोमाग येऊन थडकूं लागल्या. शहाजीराजांनी मुस्तफाखानाच्या वचनावर विश्वास कसा ठेवला आणि खानाने बाजीच्या मदतीने कसा दगा केला ही हकीकत इत्थंभूत राजगडावर समजली. खान दगा करणार आहे अशी गुप्त बातमी हेराने शहाजीराजांना आधी सांगितली असूनहि ते खानावर विश्वास ठेवून झोपले, हेंहि शिवाजीराजांना समजलें!

दुर्दैव उभें राहिलें! दुसरें काय!

जिंजी येथे मुस्तफाखानाच्या छावणींत कैद झालेले शहाजीराजे मान खाली घालून पश्चात्ताप करीत होते. मुस्तफाखानाबद्दल व बाजी घोरपड्याबद्दल त्यांच्या मस्तकांत काय तुफान माजलें होतें हें त्यांचें

त्यांनाच माहीत. मुस्तफाने राजांच्या दोन मोठ्या हस्तकांनाहि कैद केलें होतें. कान्होजी नाईक जेधे देशमुख व त्यांचाच कारभारी दादाजी कृष्ण लोहोकरे या दोघांना खानाने कैद करून कनकगिरीच्या किल्ल्यावर बंदोबस्ताने पाठविलें.[२] दादाजीपंत लोहोकऱ्यांचा मुलगा रतनाजी दादाजी लोहोकरे हाहि कैद झाला.

या वेळीं बंगळूर शहर व तेथील किल्ला शहाजीराजांचे थोरले पुत्र व शिवाजीराजांचे सख्खे बंधु संभाजीराजे यांच्या ताब्यांत होता. राजांचीं बायकामुलें बंगळुरासच होतीं. मुस्तफाचें कपटी लक्ष राजांच्या घरट्यावर होतें. तावडतोब मुस्तफाने आपल्या हाताखालची तीन शूर मंडळी फौज देऊन बंगळूर काबीज करण्यासाठी रवाना केली. फर्राद-खान, तानाजीराजे डुरे व विठ्ठल गोपाळ हीं तीन माणसें[३], बंगळूरावर फौज घेऊन निघालीं.

खतः मुस्तफाने जिंजीचा किल्ला वेंकट नाईक नांवाच्या स्वतंत्र राजाच्या ताब्यांत होता तो जिंकायचें ठरविलें. त्याप्रमाणे जिंजीवर मोर्चे लागले.

विजापुरांत तर आनंदाची उकळी फुटली. सुलतान महंमद आदिल-शाह निहायत खूष झाला[१]. डोईजड झालेला बेइमान शहाजी कैद झालाच. आता त्याचा बगावतखोर शिवाजी चुटकीसरसा हातीं येईल या खात्रीने बादशाहाने ताबडतोब शिवाजीराजांवरहि मोठी फौज रवाना करण्याचें ठरविलें. सरदार फत्तेखानास तयारी करण्याचा हुकूम त्याने दिला. स्वारीची तयारी सुरू झाली.

विजापुराहून फत्तेखान मोठी थोरली फौज घेऊन त्वरेने निघाला. शिवाजीला कैद करून त्याची शरारत चिरडून काढायची आणि कोंढाणा वगैरे किल्ले जिंकून पुन्हा एकदा शाहीसत्तेचा तिखट दरारा बसवावयाचा ही कामगिरी खानावर होती. खानाबरोबर मिनादशेख,

रतनशेख, शरीफशाह, मुसेखान, अशरफशाह, मताजीराजे घाटगे, वाळाजी हैबतराव आणि बजाजीराजे नाईक निंबाळकर ही सरदार मंडळी होती. हे बजाजी म्हणजे प्रत्यक्ष शिवाजीराजांचे मेव्हणे होते.[४] एकूण फौज किती होती, हें सांगतां येत नाही. पण खूप होती! बहुधा ती पांच हजार असावी.

शहाजीराजे कैद झालेच होते. फर्रादखान बंगळुरावर व फत्तेखान शिवाजीराजांवर चालून निघाले होते. म्हणजे भोसल्यांच्या बंडखोर बीजाचा पार नायनाट करून टाकण्याचा हा अघोरी डाव मुस्तफाखान, बाजी घोरपडे आणि बादशाह यांनी मांडला होता. चिंतेंत जळणाऱ्या

*बोल! काय हवें? सौभाग्य की स्वराज्य?*



राजगडावर बातम्यांवर बातम्या येऊन थडकत होत्या. मोठी थोरली फौज बंगळुरावर चालून निघाली आहे आणि बंगळूरच्या किल्ल्यांत सर्व कबिला व संभाजीराजे आहेत हीहि खबर आली.

आणि त्यांतच हीहि एक बातमी राजगडावर येऊन थडकली की, विजापुराहून खूप मोठी थोरली फौज घेऊन बादशाहाचा एक प्रख्यात सरदार कोंढाण्याच्या रोखाने स्वराज्यावर चालून येत आहे! फत्तेखानाच्या हाताखाली अनेक बडे बडे सरदार देण्यांत आले आहेत!

केवढें भयंकर आणि विक्षिप्त संकट हें! पहिलेंच संकट स्वराज्यावर हें असें अकाळ आलें. थोरामोठ्या अनुभवी पंतांच्या अकला गुंग झाल्या. अशा तऱ्हेचे बादशाही सरदार केव्हा ना केव्हा तरी येणारच, कारण आपण उघड उघड स्वराज्यासाठी बंडच पुकारलें आहे, याची पुरेपूर जाणीव शिवाजीराजांना, आईसाहेबांना व सर्वांनाच होती. असे सरदार अन् अशा फौजा चालून आल्या, तर त्यांच्याशीं कसें झुंजायचें याचीहि तयारी सतत चालू होती. योजना तयार होती. योजनेशिवाय शिवाजीराजे चुकूनहि पाऊल टाकीत नसत. हें शिक्षण त्यांना दादाजीपंतांनी पूर्ण दिलेलें होतें. पण आता आलेलें हें संकट अगदी विचित्रच होतें. प्रत्यक्ष वडिलांनाच शाहाने कैद केलें! म्हणजे अप्रत्यक्षपणें शिवाजीराजांचा गळाच धरला त्याने. बादशाहाचा उघड उघड हा सवाल होता की, बोल, तुला तुझा बाप जिवंत हवा आहे की, स्वराज्य हवें आहे? बोल! स्वराज्य हवें असेल,....तेंहि मिळणार नाहीच; कारण सुलतान आदिलशाहाची सल्तनत इतकी दुबळी नाही की, तुझ्यासारख्या घुंगुरटाने बंड करून राज्यें जिंकावींत. पण तूं बाप मात्र गमावून बसशील. जर बाप हवा असेल तर हे हरामखोरीचे ढंग बंद कर! बिनशर्त, बिनतक्रार रुमालाने हात बांधून आमच्या पायाशीं शरण ये! बाप हवा की, स्वराज्य हवें? विचार तुझ्या आईला!

बादशाहाचा हा करडा सवाल होता आईसाहेबांनाहि. बोल, तुला तुझें सौभाग्य हवें की स्वराज्य हवें? तुझा नवरा हातापायांत बेड्या घालून कैदी केला आहे आम्हीं! तुला आठवण आहे का तुझ्या बापाच्या आणि भावांच्या मरणाची? आम्ही सुलतान तुमच्यासारख्या हरामखोरांचीच काय पण हरामजादगीचा नुसता शक-अंदेशा आला तर मोठमोठ्या सरदारांचीं खांडोळीं उडवतों. तुम्ही भोसले तर जातीचे हरामखोर बेइमानी! सारें खानदान मुलुखमैदानच्या तोंडीं देऊन अस्मानांत उडवूं! याद राख! आज तुझा नवरा आमच्या कबजांत आहे! तूं....तूं शिकवलेंस तुझ्या पोराला बंड करायला! भोग आता त्याचीं फळें! जर तुझें सौभाग्य हवें असेल तर त्या बंडखोर पोराला बोटाला धरून घेऊन ये विजापुरांत! गुडघे टेकून पदर पसर माझ्या तख्तापुढे. आणि म्हण, चुकलें, चुकलें! दया करा! पुन्हा असें करणार नाही! मला चुडेदान द्या! माझा शिवबा हुजूरच्या पायावर वाहिला आहे, तो तहहयात तख्ताचीच सेवा करील!

आहे कबूल?

नाही! शहाजीमहाराज भोसल्यांची राणी आणि शिवाजीराजे भोसल्यांची आई जरूर पदर पसरील! पण तो बादशाहापुढे नाही. महन्माता जगदंबा तुळजाभवानीपुढे पसरील!

आणि करारी जिजाऊ आईसाहेबांचा पदर सततच भवानीपुढे पसरलेला होता. हसतांना अन् रडतांनाहि. आताहि!

शिवाजीराजांची मति कुंठित झाली. काय करावें? राजे अत्यंत मातृभक्त नि पितृभक्त होते. वडिलांवर संकट आलें अन् तेंहि प्राणांतिक. त्यांना कल्पनाच साहवेना. राजे कांही झालें तरी माणूस होते. अगदी पोरवयाचे होते. त्यांना समजेना काय करावें तें. त्यांचे सौंगडी चिंतेंत पडले. मुत्सद्द्यांची बुद्धि चालेना. वडिलांना सोडवायला जावें तर

स्वराज्यावर कायमची तिलांजली सोडली पाहिजे. स्वराज्याचा हट्ट चालवायचा असेल तर—आई विधवा होईल! काय करावें? चिंता! चिंता! चिंता!

आणि आता तर इंदापुराकडून खबरीचे जासूद एका मागोमाग एक बातम्या आणूं लागले की, बाच्छावाचा सरदार फत्याखान फौज घेऊन येतोय?—खान भीमथडीला आला. नीरथडीवर आला. जेजुरीवर आला. बेलसरावर आला! त्याने बेलसरचा कबजा घेतला! कऱ्हेपठार भयभीत झालें! आता खान स्वराज्यांत घुसणार!

विचार करण्याची वेळ संपली! निकराची घडी आली. आता? शिवाजीराजे शहारले. उठले! त्यांच्या मनाचा निर्धार झाला. बस्स, काय होईल तें होवो! फत्तेखानाशीं लढायचेंच! जर हें राज्य व्हावें अशी खरोखरच श्रीची इच्छा असेल तर खानाची फौज आमच्या रुस्तुमीपुढे वादळांतल्या पाचोळ्यासारखी उधळून जाईल. तीर्थरूपहि आदबखान्यांतून सलामत सुटतील! बस्स्! युद्धाचाच निश्चय!

अन् राजगडावर नौबत कडाडली. शिंगाची ललकारी उठली. फौजेस जय्यतीचा हुकूम सुटला. फौज ती किती? सगळी झाडून झटकून अवघी हजार बाराशे! पण लढाईची नौबत ऐकून ती समिंदराच्या लाटेवाणी उसळली. गनीम दहा हजार असो नाही तर दहा लाख असो, चेंदायचाच! राजगडावरच्या पोरांनी कंबर आवळली. बाजी जेधे, कावजी, भिमाजी वाघ, भिकाजी चोर, भैरोजी चोर, गोदाजी जगताप, बाळाजी नाईक शिळमकर, शिवाजी इंगळे, संभाजी काटे वगैरे सगळीं हिरीरीचीं वादळें उठलीं. आणि त्यांतच बाजी पासलकरहि. पांढऱ्या मिशांनाहि पीळ पडला. घोंडीं फुरफुरलीं. मनगटें शिवशिवलीं. भाले तळपले.

राजे पुरंदरगडावर जाण्यास निघाले. कूच करण्याची नौबत झाली.

राजांनी राजवाडयांत देवीचें दर्शन व आईसाहेबांचा आशीर्वाद घेतला आणि ते स्वार झाले. इशारत झाली आणि राजांच्या दौडत्या सावली-मागोमाग त्या निष्ठावंत वीरांची शिवगंगा उचंबळत निघाली.

किल्ले पुरंदर. राजगडच्या कांहीशा आग्नेयेला सरळ रेषेंत दहा कोसांवर पुरंदरगड आहे. गड खूप मोठा. गड खूप उंच. गड खूप बळकट. वास्तविक पुरंदर किल्ला या वेळीं राजांच्या स्वराज्यांत नव्हता. गडावर महादाजी नीळकंठराव सरनाईक म्हणून एक जबरदस्त म्हातारा ब्राह्मण गडाचा कारभार पाहात होता. 'नीळकंठराव' हा महादजी-पंतांच्या घराण्याला किताब होता. पंतांच्या पिढ्यांमागून पिढ्या बादशाहांची सेवा करण्यांत गेल्या होत्या. चंद्रसपंत नांवाच्या त्यांच्या पूर्वजानें पुरंदराची निगाहदास्ती केली, तेव्हापासून पुरंदरच्या किल्लेदारीचें पान सरनाइकांच्या खानदानींत होतें.

महादाजीपंतांचा व शहाजीराजांचा फार जुना जिव्हाळा.[१९] राजांना वाटे पंत आपले. पंतांना वाटे राजे आमचे. असा दोघांचा भाऊपणा. पंत एवढे पिकले होते तरी अजून त्यांनी समशेर खाली ठेवली नव्हती. त्यांना शहाजीराजांच्या या बंडखोर पोराबद्दलहि तसाच जिव्हाळा वाटे. तितकेंच कौतुक अन् आश्चर्यहि वाटे. एवढयाशा वयांत बादशाहीविरुद्ध बंड मांडतो म्हणजे काय! बस्स्! पोरगा मर्द आहे!

शिवाजीराजांनी पुरंदरावर बसून फत्तेखानाशीं झुंजायचा बेत योजला. पण गड होता पंतांच्या हातीं. ते बादशाहाच्या हातीं. पुरंदर कसा उपयोगास यावा? पंतांनाच विचारावें, आम्हांला गडांत घेतां का? सारी हयात बादशाहाची सेवा करण्यांत गेली. आता मरायच्या आधी पंत कसे शिरतील या आगींत? आपणच जिवावरच्या संकटांत सापडलों आहोंत, हें दिसत असतांना हें आपलें जळतें कोलीत कसें घेतील पंत आपल्या घरांत? पण राजांना खानाशीं झुंजायला पुरंदरच हवा होता.

कारण फत्तेखान जिथे तळ देऊन बसला होता तें बेलसर गाव पुरंदराच्या पूर्वेला पांच कोसांवर होतें. जेजुरीच्या जवळ.

राजांनी पुरंदरावर पंतांकडे विचारणा पाठवली. आम्हांला गडांत घेतां का? फार संकटांत आहोंत. खान दौलत बुडवायला आलाय. मला गडांत घेतां का?

आणि काय आश्चर्य पाहा! महादाजीपंत 'हो' म्हणाले! म्हातारा विघडला! पंतांनी भोसल्यांवरच्या मायाममतेमुळे पुरंदरचा दरवाजा शिवाजीराजासाठी सताड उघडला.[२०] त्यांनी शिवाजीराजांना अशा रीतीने आपला सक्रिय आशीर्वाद दिला.

राजे पुरंदरी बैसोनु फत्याखानासी झगडावयासाठी निघाले.[२२]

त्यांना फार आनंद झाला. आपल्या सर्व फौजेसह राजे पुरंदरावर आले. ही राजांची सेना जास्तींत जास्त एक हजार ते बाराशे असावी.

गडाचा बंदोबस्त चोख होता. पंतांनी व राजांनी गडाची बेहबुदी उत्तम केली. तेवढयांत खबर आली की, फत्तेखानाच्या बरोबर आलेल्या बाळाजी हैबतराव नांवाच्या सरदारास खानाने शिरवळचें ठाणें कबजांत घ्यावयास पाठविलें. बाळाजी हैबतरावाने त्याप्रमाणे फौजेसह जाऊन शिरवळ घेतलें व तो शिरवळच्या सुभान मंगळ किल्ल्यांत घुसला![२१] ही बातमी सर्वांस समजली. पण कोणीहि त्यामुळे दचकला नाही. घाबरला नाही. कांही वेळानंतर राजांनी आपल्या प्रमुख मित्रांना एकत्र बोलावलें.

राजांच्याभवती त्यांचे सर्व सखेसौंगडी जमा झाले. उत्सुकता गळ्याइतकी दाटली. राजे त्यांच्यापुढे उभे होते. त्यांनी अंगावर चिलखत घातलें होतें. कमरेला तलवार, पाठीवर ढाल, डाव्या खांद्यावर धनुष्य आणि उजव्या खांद्यामागे बाणांचा भाता लटकवला होता. राजांच्या मुखावर स्मित झळाळत होतें.[६] भवती जमलेल्या आपल्या शूर सौंगड्यांना राजे म्हणाले—[७]

" या दगाबाज मुस्तफाखानाने बादशाहाच्या हुकुमावरून महाराज तीर्थरूपसाहेबांस गिरफ्दार केलें ! सापाला मिठी मारणें, विषाची चव पाहाणें आणि गनिमावर विश्वास टाकणें याचा नतिजा सारखाच दिसणार ! दुष्ट तुर्कांची कितीहि नेकीने खिदमत केली तरीहि घातच व्हायचा ! महाराजांनी असा कोणता गुन्हा केला होता बादशाहाचा ? शाहाची दौलत जिवापाड जतली, शाहाचे हुकूम पाळले हाच गुन्हा ! हाच गुन्हा ! ! दगाबाजीने महाराजवडिलांस त्याने कैद करून ठेवलें आहे. बादशाहास मोठा गर्वाचा फुंद चढला आहे. पण आपल्या हातचा एक तडाखा खाल्ला की त्याचा फुंद खाडकन् उतरेल ! वडिलांस कैदेतून त्याला मोकळे करावेंच लागेल ! आणि जर न करील तर तो आपल्या कर्माचीं फळें खास भोगील ! जर बादशाह वडिलांना अपाय करील तर तो आणि त्याचे कपटी साथीदार महाराज वडिलांच्याच हातून ठार होतील ! ज्याचें मन हरहमेश धर्माने वागतें त्याला तुरुंगाचें काय भय ? महाराजवडील धर्माने चालणारे आहेत ! आपणहि जावळी कबजांत घेऊन मोऱ्यांची चंदरराई न्यायाने मोऱ्यांच्या पदरांतच टाकली. या गडकोटांची राखण करीत गनिमांशीं या माझ्या सज्ज हत्यारबंदांनिशी मी लढणार ! बंगळुरास संभाजीराजे आणि इकडे आपण दुष्मनाशीं झुंजून झुंजून महाराजवडिलांस सोडवूं ! यश आपलें आहे. फत्तेखानाशीं शर्थीची झुंज मांडूं ! "

शिवाजीराजांचें तें बोलणें ऐकून पुढे बसलेल्या जवानांना असें अवसान चढलें की, त्या सर्वांनी सिंहासारख्या प्रचंड गर्जना करून आकाशपाताळ दणाणून टाकलें.[८]

हर हर हर हर महादेव ! जय तुळजा भवानीचा उदो उदो !

जय येळकोट मल्हार !

शिरवळचा सुभान मंगळ किल्ला फत्तेखानाच्या बरोबर आलेल्या

बाळाजी हैब्रतरावाने जिंकला होता. या वातम्या आलेल्या होत्या. शिरवळ पुरंदरगडाच्या दक्षिणेस सरळ रेषेंत सात कोसांवर आहे. नीरा नदीच्या दक्षिण थडीवर सुभान मंगळ किल्ला उभा होता. वीरश्रीने फुर-फुरलेली ती मावळी मंडळी जयजय आरोळ्यांनी कल्लोळ उठवीत होती. त्या उंच उत्तुंग पुरंदरगडावरून लांब दक्षिणेस झाडींत झाकलेला सुभान मंगळ अंधुकसा दिसत होता. राजांच्या डोक्यांत सुभान मंगळ होता. राजे म्हणाले,[९]

“तें शिरवळ! मोठी घमेंड चढली आहे बाळाजी हैबतरावाला शिरवळ घेतल्यापासून. म्हणून तुम्ही टाकोटाक जाऊन त्या बाळाजीला गिरफ्दार करा! आपलें शिरवळ सोडवा! आजच! मग उद्या किंवा परवा फत्तेखानाशीं इथे पुरंदराखाली किंवा तिथे बेलसरापाशी झुंज घालूं!”

सर्वांनी पुन्हा गर्जून गर्जून आभाळ कोंदून टाकलें. शिरवळवर चालून जाण्यासाठी तयारी सुरू झाली. राजांनी भराभरा गडी निवडले. एक एक मर्द म्हणजे नामी हुर्मुजी मोतीदाणा होता. हा गोदाजी जगताप! शत्रूचें हाड न हाड खिळखिळें करण्याची मर्दानी किमया गोदाजींत होती. हा एक भयंकर माणूस, भिमाजी वाघ! भीम आणि वाघ या दोघांचेंहि बळ याच्यांत होतें. हा संभाजी काटे! हा रणचंडिकेचा केवळ अलंकार होता. हा शिवाजी इंगळे! हे शिवबा म्हणजे भाल्याच्या फाळाचें टोकच होतें! घुसतील तेथे फाडीत कापीत आरपार निघून जातील! हा भिकाजी चोर अन् तो भैरोजी चोर, सख्खे भाऊ भाऊ. धडकीच भरावी यांना पाहिल्याबरोबर शत्रूला![१०]

—आणि हा पठ्ठा कावजी! कावजी म्हणजे दुधारी तलवारच! अन् चपळ तर पाण्यांतल्या सुसरीसारखा. भराभरा राजांनी हे गडी उचलले. कावजीला त्यांनी म्होरक्या केलें. कावजी होताच तसा. या

कावजीचें सबंध नांव बहुधा कावजी मल्हार खासनीस असें असावें.[११] बाजी पासलकरांचा कावजी खासनीस तो हाच असावा.[११]

शिरवळ जिंकायला कोण कोण जातो म्हणून विचारलें असतें तर सगळेच भाले 'मी' 'मी' करीत उठले असते. म्हणून राजांनीच निवड केली. या शूरांच्या दिमतीला मावळी फौज दिली. राजांचे हे शूर वीर निघाले. गडावर नौबत वाजूं लागली. कावजीने व सर्वांनीच राजांना मुजरे घातले आणि ढगांप्रमाणे कडाडून गर्जना करीत सर्वजण पुरंदरावरून निघाले.[१२] तें स्फुरण विलक्षण होतें. थोरल्या महाराजांना दग्याने कैद करणाऱ्यांचीं मुंडकीं आपल्या हातून उडालींच पाहिजेत, आपल्या समशेरीनेच महाराजांच्या हातांतल्या बेड्या तुटतील, आता हा फत्तेखान अन् त्याची फौज विजापुराला जिवंत माघारी गेलीच तर रक्त गाळीत गेली पाहिजे, जगदीश्वराचें वरदान आपल्याला आहे, हें तें आत्मविश्वासाचें स्फुरण होतें. त्यांच्या खडखडत्या टापा राजांना म्हणत होत्या की, पुरंदरेश्वरा, चिंता नको करूंस. माघारी येऊं ते सुभान मंगळचे मानकरी म्हणून! आम्ही गनिमाचें काळीज पाठीकडून काढून आणतों!! हर हर हर हर महादेव!!!

हर हर गर्जत कावजी आणि त्याची वानरसेना गडांतून बाहेर पडली आणि डोंगरावरून ताड ताड् घोडे उडवीत निघून गेली. दिसेनाशी झाली.

सुभान मंगळ हा भुईकोट किल्ला त्या मानाने अगदी किरकोळच होता. याचे तट फार उंच नव्हते. ते मातीच्या भेंड्यांचे होते. किल्ल्याच्या भवती खंदक होता. पण फारसा खोल नव्हता.[१३] किल्ल्याचा दरवाजाहि यथातथाच होता. बुरूज तर अजिबातच नव्हते. बाळाजी हैबतराव आपल्या सैन्यानिशी किल्ल्यांत ठाण देऊन राहिला होता. बाळाजीबरोबर फाजलशाह व अशरफशाह हे सरदारहि होते.[११]

कावजी आपल्या सैन्यानिशी शिरवळाकडे दौडत निघाला. लौकरच त्याने नीरा नदी ओलांडली व किल्ल्याच्या तोंडावर येऊन अत्यंत आवेशाने बेधडक थेट किल्ल्यावरच त्याने चाल केली. बाळाजी हैबतरावाने शत्रु आलेला पाहिला. त्याच्या हशमांनीहि पाहिला. कावजीच्या मावळ्यांचा व भिमाजी वाघ, भैरोजी चोर, गोदाजी, संभाजी काटे व खुद्द कावजी या सर्वांचाच युद्धावेश इतका कमालीचा भयप्रद होता की, किल्ल्यांतील बाळाजी हैबतरावाची फौज भेदरूनच गेली[१४] ! तिचा धीर खचला ! आपले लोक गडबडलेले पाहून बाळाजी त्यांना धीर देऊं लागला. तो मोठमोठ्याने त्यांना म्हणाला,[१४]

"शिवाजीची ही घमेंडखोर फौज पाहून घाबरूं नका! लढतां लढतां मरण आलें तरी बेहेत्तर, पण पळून जाणें भ्याडपणाचें आहे! लढा! बादशाहाला फत्ते करण्यासाठी आपण या कठीण प्रसंगीं किल्ल्यामधील उंच टेकडीचा आश्रय घेऊं. अभिमानाने आपण शिरवळांत लढत लढत मरून जाऊं ! पण शिवाजीला यश मिळूं देणार नाही!"

त्याच्या या प्रोत्साहनाने त्याचे हशम चेतले आणि रणगर्जना करूं लागले. पण त्याचे असंख्य हशम तटावरून बाहेर डोकावून पाहूं लागले. कावजीच्या मावळ्यांनी सरासर बाण सोडून सगळ्यांना टिपून ठार केलें ! चारीहि बाजूंनी मराठे किल्ल्यांत घुसण्याकरिता धडपडूं लागले. कावजीने आधीच त्यांना सांगून ठेवलें होतें;[१५]

"शिरवळच्या किल्ल्यांत कांही दम नाही. खुशाल भिंताडें फोडून खंदकावर लोटा. घोडे उडवून तटावर चढा! ही कांही मोठी लंका नाही लागून गेली!"

आणि मग खरोखरच मराठ्यांनी भयंकर हल्ला चढविला. किल्ल्यांतले लोक जें हातीं लागेल तें तटावरून खाली मराठ्यांवर फेकूं लागले. बैलगाड्यांचीं चाकें, नांगर, कर्णे, गोटे, पेटलेले पलिते, जळतीं लाकडें,

निखारा, तापवलेलीं तेलें आणि उखळें–मुसळें सुद्धा ![१६] वरून मारा होत असतांनाहि मराठे शिड्या लावून वर चढत होते. कावजीने तर अनेकांच्यासह किल्ल्याच्या दरवाजावर हल्ला करून व अवजड वस्तूंचा मारा करून तो दरवाजाच धाडकन् पाडला आणि मुंग्यांच्या थव्याप्रमाणे सर्वजण ओरडत आंत घुसले. हर हर महादेव ! आता हातघाईची लढाई पेटली. शिवाजी इंगळा माणसें छाटीत सुटला होता. भिमाजी वाघाने व कावजीने चांगले कसाचे योद्धे लोळविले. तेवढ्यांत किल्ल्यांतली घरटीं–खोपटीं आगींत सापडलीं ![२२] धूर, ज्वाला ओरडाओरड आणि शस्त्रांचा खणखणाट उडाला. बादशाही फौज घाबरली. लोक सैरावैरा पळत सुटले ! आता त्यांना सावरणें बाळाजी हैबतरावालाहि जमणें अशक्य होतें ![१७] बाळाजी मोठमोठ्याने सांगत होता की, कापा, मारा, लढा, हटूं नका ! पण त्याचें म्हणणें मराठेच ऐकत होते ! किल्ल्यांत शिवाशिवीचा खेळ सुरू झाला होता. बाळाजी हैबतराव मात्र शौर्याने लढत होता.

आणि गाठ पडली कावजीची आणि बाळाजीची ! कावजीच्या हातांत भाला होता. झुंज जुंपली, अटीतटीचा सामना लागला. अन् पडला ! कावजीच्या भाल्याचा फाळ बाळाजीच्या मर्मावर खचकन् बसला अन् बाळाजी पडला ! ठार झाला ! किल्ल्यांत मराठ्यांनी गर्जनांचा धडाका उडविला. विजापूरची उरलीसुरलेली फौज वाट फुटेल तिकडे पळत सुटली. असंख्य लोक शस्त्र टाकून शरण आले. मराठ्यांनी त्यांना जीवदान दिलें. किल्ल्यावर भगवाझेंडा चढला. सुभान मंगळ फत्ते झाला. खूप युद्धसाहित्य कावजीच्या हातीं सापडलें. स्वराज्यासाठी लढविलेली ही पहिली लढाई. ताबडतोब किल्ल्याची व जखमी लोकांची निगाहदास्ती करून कावजी आपल्या विजयी वीरांसह पुरंदराकडे दौडत निघाला. आनंद उरांत मावत नव्हता त्याच्या.

कावजीची फौज वाऱ्यासारखी बेहोष उधळत पुरंदराकडे येत होती. राजांनी ताडलें की, सुभान मंगळ फत्ते झाला. राजे हसले! हजारपट उत्साहाने गेलेले वीर लाखपट उत्साहाने पुरंदरावर आले. कावजीने हस्तगत केलेला शत्रूचा मौल्यवान् खजिना बरोबर आणला होता, तो त्याने राजांच्या पुढे ठेवला व सर्वांसह राजांना मुजरे केले.[१८] राजांनी सर्वांच्या पाठी थोपटल्या, शाबास, शाबास कलिजांनो!

* * *

**आधारः**—(१) शिभा १२।११९. (२) जेधेशका व करीणा. (३) शिभा १३।५ व ६. (४) शिभा १३।८ ते १२. (५) चिटणीस ब. (६) शिभा १३।१५ व १६. (७) शिभा १३।२०, २६, ३२, ३४, ३७ ते ४३. (८) शिभा १३।५०. (९) शिभा १३।४७ व ४८. (१०) शिभा १३।५१ ते ५६. (११) शिचसा ५।७७३. (१२) शिभा १३।५६, ५८ व ५९. (१३) शिभा १३।७८ व ७९ (१४) शिभा १३।६३ ते ७३. (१५) शिभा १३।७८ ते ८१. (१६) शिभा १३।८८ व ८९ (१७) शिभा १३।११६. (१८) शिभा १३।१३०. (१९) शिचसा ३।४१५. (२०) शिचसा १।३२ व प्रस्ता. पृ. २५. (२१) १ ।१४. (२२) शिचसा १।३२



## १२ : किल्ले पुरंदर

बादशाह आदिलशाहाने विजापुराहून मुस्तफाखानास हुकूम पाठविला की, कैद केलेल्या शहाजी भोसल्यास हुजूर दाखल करा. शहाजीराजांना विजापुरास खान रवाना करणार होता. परंतु तेवढ्यांत तो स्वतः आजारी पडला. दिवसेंदिवस खानाचें दुखणें वाढत चाललें. विकोपाला गेलें. आणि अखेरचीं चिन्हें दिसूं लागलीं. मरणाचा क्षण जवळ आला. खान बराच वृद्धहि होता. खानाने आपल्या सर्व नेक सरदारांस जवळ बोलावलें. त्याने अत्यंत कळकळीने सर्वांस सांगितलें की, वेंकट नाइकाचा जिंजी किल्ला लौकर काबीज करा व शहाजीला अत्यंत बंदोबस्ताने विजापुरास घेऊन जा. एवढीच इच्छा !

आणि मुस्तफाखानाने प्राण सोडला ! ( दि. ९ नोव्हेंबर १६४८. )

एक अत्यंत कर्तबगार, शूर व मुत्सद्दी पुरुष दख्खनच्या राजकारणांतून कायमचा अदृश्य झाला. या खानाचें सर्वांत मोठें वैशिष्ट्य म्हणजे तो शहाजीराजांचा कट्टा द्वेष्टा होता. शहाजीराजांचें निजामशाही उभी करण्याचें राजकारण यानेच मारून काढलें होतें व आता तर शहाजी-राजांची अगदी पाळेंमुळें खणून काढण्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत तो धडपडत होता.

शहाजीराजांना विजापुरास घेऊन जाण्याची कामगिरी सेनापति खानमहंमद याने अफजलखानावर सोपविली. याच वेळी फर्रादखान

बंगळूरास संभाजीराजांशीं व फत्तेखान शिवाजीराजांशीं झुंजावयास गेले होते. हे संभाजीराजे म्हणजे शिवाजीराजांचे सख्खे थोरले भाऊ. ते बंगळूरास होते. तेथेच सर्व भोसले कुटुंबहि होतें.

फत्तेखानाची मोठी थोरली छावणी कऱ्हा नदीच्या समीप बेलसरच्या शिवारांत पडली. खानाने खूप मोठें वऱ्हाड आणलें होतें. हत्ती, उंट, तंबू, घोडदळ, पायदळ, सरदार, वगैरे पसारा आणला होता. आणणारच. आदिलशाही दौलतींतला एवढा मोठा नामजाद सरदार तो. हवीच मग एवढी उमरावशोभा. पण इकडे पुरंदरावर पाहावें तर साराच पोरखेळ. वीतभर राज्य, मूठभर सैन्य आणि करंगळीएवढा राजा. एवढासा हा चिमुकला डाव उधळायला एवढी मोठी फौज घेऊन येणाऱ्या फत्तेखानाला कदाचित् लाजच वाटली असेल मनांतून........ चिलमींतला विस्तव विझवायला आपण घागरभर पाणी आणलें म्हणून !

उत्रवळीच्या केदारजी देशमुखालाहि बादशाहाने फर्मान पाठविलें होतें[1] कीं, खुदायवंद फत्तेखान यांस कोंढाण्याचे बाजूस शिवाजीवर रवाना केलेलें आहे, तरी त्यांस सामील व्हावें (दि. ८ ऑगस्ट १६४८). याप्रमाणे केदारजी खानाच्या सैन्यांत सामील झाला असावा. कारण प्रथमपासून अखेरपर्यंत तो शिवाजीराजांचा विरोधकच राहिला होता.

खानाने बेलसरास येतांच बाळाजी हैबतरावाबरोबर फाजलशाह व अशरफशाह हे दोन सरदार व सुमारें दोन हजार फौज दिली व त्याला शिरवळला रवाना केलें. बाळाजीने शिरवळांत मुक्काम ठोकला. पण कावजीने पुरंदरावरून जाऊन बाळाजींचा पुरा चुराडा उडविला. ही बातमी अजून फत्तेखानाला कळायची होती.

पुरंदर गडाचा बंदोबस्त अत्यंत उत्तम ठेवलेला होता. गडावर मावळे, कोळी, महार आणि रामोशी मंडळी गडाची राखण करीत होती.

शिवाजीराजांनी तटावर जागजागीं तोफांची मोर्चेबंदी बळकट केली. गडावरचे पहारे, गस्ती, भेटें जागतीं ठेवलीं. गड चांगलाच झुंजता केला.

खानाला एक फटकारा दिलाच पाहिजे हा विचार गडावर सर्वांच्या डोक्यांत आला. कावजीने व त्याच्या सर्वच साथीदारांनी शिरवळावर मिळविलेल्या विजयामुळे सर्वांना स्फुरण आलें होतें. फत्तेखानाचें भय वाटेनासें झालें होतें. लगेच हल्ला करण्याचा बेत ठरला.

शिवाजीराजांनी आपल्या जिवलगांपुढे मनसुबा मांडला, फत्तेखानावर अवचित झडप घातली तर ? जमलें तर पुरताच मोडूं ! नाहीतर निदान चटका तरी बसेल त्याला ! सर्वांनी महाराजांचा मनसुबा लगोलग उचलून धरला.

तिथे काय ! समशेरीच्या मनसुब्याला सारेच अर्जुमंद. सगळ्यांच्या माना डोलल्या.

खानाच्या छावणीवर हल्ला करण्याचा बेत मुक्रर झाला. महाराजांनी लगेच सदरेंतल्या मंडळींना तयार होण्याचा हुकूम दिला.

गार गार वारा घोंघावूं लागला. इतर सरदारांनी आपआपलीं निवडक माणसें निवडण्यास सुरुवात केली. प्रत्येकाचें मनगट शिवशिवत होतें.

फौजेची तुकडी बिनीच्या दरवाज्याशीं तयार होऊन उभी राहिली. सगळ्या फौजेची तयारी झाली. महाराजांचा निरोप घेऊन तुकडी गडा-बाहेर पडली. तिच्या मागोमाग इतरहि तुकड्या बाहेर पडल्या.

भगव्याझेंड्याचीं तुकडी निघाली. बातम्यांचें व हुकमांचें केंद्र कांही तरी खुणेचें असावें म्हणून भगवाझेंडा बरोबर देऊन एक स्वारांची तुकडी महाराजांनी मुद्दाम तयार करून बरोबर दिली. ही तुकडी अगदी मागे होती. एका जवान गड्याच्या हातीं झेंडा दिलेला होता व सुमारें पन्नास-पंचावन्न आडदांड मराठे स्वार तींत सामील केले होते. झेंडा वाऱ्यावर फडफडत होता. घोड्यांच्या टापांशिवाय दुसरा आवाज उमटत नव्हता.

बेलसरच्या परिसरांतील फत्तेखानाची छावणी बेसावध होती. तंबू-राहुट्या डोलत होत्या. जणू पांढरे हत्तीच. छावणीच्या चारी अंगांला पहारा चालू होता.

मावळे मराठे टाच लावून दौडत होते. जणू काळविटांचा कळपच. किर्रर झाडी भेदीत स्वारांच्या तुकड्या खानाच्या छावणीकडे दौडत होत्या.

स्वारांच्या तुकड्या बेलसरच्या परिसरांत घुसल्या. आता त्यांनी आपला वेग एकदम कमी केला. थोडीही बोलाचाल न करतां ते छावणीच्या नजीक पोहोचले. त्यांच्यांत आणि छावणींत अंतर मात्र बरेंच होतें. आपली चाहूल गनिमास थोडीसुद्धा लागूं नये म्हणून प्रत्येकजण काळजी घेत होता. तिथे येतांच पूर्वी गडावर योजल्याप्रमाणे सर्व तुकड्या फत्तेखानाच्या छावणीच्या भवती पांगून गेल्या.

........आणि एवढ्यांत इशारत झाली आणि चारीहि बाजूंनी धडाधड मराठी स्वारांच्या तुकड्या लांडग्यासारख्या खानाच्या छावणीवर तुटून पडल्या ! निरभ्र अस्मानांत एकाएकी ढग गोळा व्हावे आणि पावसाची भयंकर झोड उठावी, तशी मराठ्यांनी खानाच्या छावणीवर अकस्मात् झोड उठविली. हा हल्ला कोसळतांच खानाच्या साऱ्या फौजेची दाणादाण उडाली ! अगदी गाढ झोपेंत जणू फुललेले निखारेच अंगावर पडले ! त्यांची अगदी दैना उडाली. आरडाओरड आणि धावपळ ! कांही वेळ हें काय घडतेंय् हें कोणाच्या लक्षांतच येईना. कोणी नुसतेच पळत सुटले, कोणी शस्त्रें शोधूं लागले. मराठे तर असे पिसाळलेल्या वाघासारखे धुमाकूळ घालीत होते की बस्स ! त्यांनी शाही फौजेची वारेमाप कत्तल आरंभिली. खानाच्या फौजेला सज्ज व्हायला अवसरहि मिळेना. खुद्द खान या गलबल्याने दचकून उठला. पाहातो तों मराठी गेंडे मुसंड्या मारमारून जीव घेत होते. मराठे पाहावे तर मूठभर आणि नाच तर सैतानी मांडलेला.

स्वतः फत्तेखान मात्र आता एकदम पुढे झाला. त्याचें बरेंचसें लष्करहि कसेंबसें तयार होऊन मराठ्यांना तोंड द्यायला धावलें. आतापर्यंत मराठ्यांनी मात्र चांगलाच हात दाखविला होता. खानाचा पुरता मोड झाला नाही तरी एकदा मराठी मात्रेचा झणझणीत वळसा देण्याचा त्यांचा हेतु तडीला गेला होता. खानाची छावणी चांगली आडवीतिडवी तुडविली गेल्यानंतर खानाचें लष्कर उपराळ्याला सज्ज झालें होतें.

मराठ्यांच्या साऱ्या तुकड्या छावणीवर तुटून पडल्या होत्या. झेंड्याची तुकडी मात्र छावणीपासून थोडी लांब उभी होती. पण तीहि आता पुढे पुढे सरकत छावणीवर चालून निघाली.

फत्तेखानाने सारी ताकद एकवटून मराठ्यांवर चढाई केली. खानाची फौजहि खूप होती. त्यामुळे ही त्यांची चढाई परिणामाची झाली. मराठ्यांना झटकन् थोडी माघार घेणें भागच पडलें. खानाची ताकदहि वाढत होती. कारण छावणींतील त्याचे हशम त्याच्या मदतीला धावत होते.

मराठ्यांनी सारा रंग ताडला आणि माघार घेण्याचा इशारा दिला. एकदम पिछाडीला न निसटतां झुकांड्या देत देत ते काढता पाय घेऊं लागले. त्यांचा पाठलाग खानाने चालविलाच होता. घाव झेलीत आणि घालीत सारे स्वार पांगले.

झेंड्याची तुकडी मात्र माघारी फिरली नव्हती. उलट त्या मर्दांनी चढाईच सुरू केली ! निशाणबारदार झेंडा तोलीत तोलीत पुढे सरकत होता. बाकीच्या जवानांनी न डरतां गनिमाची कापाकाप चालविली. बाकीच्या साऱ्या टोळ्या छावणीपासून दूर झाल्या होत्या. खानाचें फार मोठें लष्कर झेंड्यावर चालून आलें. गनिमांनी अगदी खाशा झेंड्यावरच गर्दी केली. झेंडा हेलकावूं लागला. प्रत्येकाचें काळीज धडधडूं लागलें.

जीवाच्या भीतीने नाही, अपेशाच्या भीतीने. मेलों तर पर्वा नाही, पण झेंडा गेला तर अब्रू जाईल.

छे: ! अशाने काय शिपाईपणाची कळा राहील ? प्रत्येकजण झेंड्यासाठी धारेची शर्थ करूं लागला. पण गनीम फारच जोरावर होता. झेंडा ऐन गर्दींत सापडला. निशाणबारदारावर मोहोळ उठलें. आता अगदी अब्रूवर प्रसंग आला, काय होतेंय—काय नाही–पापणी लवेना !

एवढयांत एक मराठा स्वार इतक्या झपाट्याने गनिमांच्या गर्दीत घुसला की, जणू कडकडून कोसळलेली वीजच ! त्याने पहिल्या धडाक्यालाच सहा सात दुष्मन खटाखट उडविले ! हा त्याचा तडाखा शत्रूला असा कांही जाणवला की, निशाणाची झोंब सोडून दुष्मन मागे हटला ! पण तेवढयांत झेंड्याच्याच स्वाराला गनिमांपैकी कुणाचा तरी घाव असा जोरांत बसला की, तो स्वार घोड्यावरून खालीं कोसळलाच. त्याच्या हातांतला झेंडा निसटला. आता झेंडा जमिनीवर पडणार एवढयांत त्या नव्याने चालून आलेल्या तरवारबहाद्दराने झेंडा वरच्यावर पकडला. त्या जखमी स्वाराला तसाच जलदीने दुसऱ्या एका घोड्यावर घेऊन त्याने झेंडा आपल्याच हातीं ठेवला आणि साऱ्या तुकडीला माघार घेण्याचा हुकूम दिला. या वेळेपावेतो सर्व मराठी टोळ्यांनी माघार घेतली होती. माघार घेतां घेतां बेलसरापाशी कांही मराठे खस्त झाले. बाकीच्यांनीं घोड्याला टाच मारली आणि ते पुरंदरच्या झाडींत पसार झाले.

झेंड्याच्या तुकडीनेहि माघार घेतली आणि पुरंदराकडे दौडत निघाली. जात असलेली अब्रू तोलून धरणारा तो समशेरबहाद्दर स्वार प्रत्येकाच्या ओळखीचा होता. बाजी जेधे ! कान्होजी जेध्यांचा लेक. झेंडा तोलीत तोलीत आणि हर हर गर्जत बाजी आणि बाजीची तुकडी गड पुरंदराकडे निघाली. खानाच्या लोकांनी मराठ्यांचा पाठलाग केव्हांच सोडून देऊन छावणी गाठली होती. वाऱ्यामागे धावण्यांत काय शहाणपण आहे ?

गडाच्या पायथ्याशीं पोहोचेपर्यंत सर्व तुकड्या एकत्र आल्या.

झेंडयाची तुकडी आणि मागोमाग बाकीचे स्वार, असें हें मावळी सैन्य गड चढूं लागलें.

पुरंदरचीं दरीखोरीं जयघोषांनी कोंदून गेलीं.

फत्तेखानाला हा गनिमी कावा फारच झोंबला. एवढयांत अशरफशाह व पराभवामुळे पळून आलेले शिरवळचे हशम खानाच्या छावणींत येऊन पोहोचले. त्यांची ती हैराणगत पाहून खान थक्कच झाला. बाळाजी हैबतरावासारखा प्रख्यात सरदार शिवाजीच्या पुंडांनी उघडउघड लढाईत मारला, फौजेची धूळधाण उडविली आणि सुभान मंगळचें ठाणें जिंकलें हें ऐकून, आधीच चिडलेला खान भयंकरच संतापला.[३] त्याला असें झालें, आता या शिवाजीचें काय करूं! त्या संतापाच्या भरांतच पुरंदरगडाकडे त्याने आपली भडकलेली नजर फेकली.

भयंकर नामुष्की! एवढी प्रचंड फौज आणूनहि अखेर पोरासोरांनी पराभव केला. खानाचा तीळपापड उडाला. पण समोरचा पुरंदर मात्र शांतपणें हसत होता. खानाने एकदम आपल्या फौजेला सज्ज होण्याचा हुकूम सोडला. संतापामुळे खानाचा विवेक सुटला. शिवाजीचा फन्ना उडविण्यासाठी त्याची समशेर म्यानांतून बाहेर पडली.

मुसेखान, असरफशाह, मिनादशेख, हसनशेख वगैरे सर्व सरदार आणि त्यांचे सैनिक भराभरा तयार झाले. हत्तींवर हौदे चढले. निशाणें व नौबती तयार झाल्या. खानाने कूचाचा इशारा केला आणि फौज पुरंदरच्या रोखाने निघाली. बेलसरापासून पुरंदर फक्त पांचच कोसांवर.

पुरंदराच्या रोखाने फत्तेखान चिडून दौडत सुटला. ती फौज रणघोष करीत मागोमाग दौडत सुटली.

पुरंदरावर उत्साहाचा सागर महाराजांभवती नाचत होता. फत्तेखाना-

वर घातलेली यशस्वी झडप आणि शिरवळचा घवघवीत विजय यांमुळे महाराजांच्या सौंगड्यांना जास्तच स्फुरण चढलें होतें.

फत्तेखानाची फौज गडाच्या रोखाने दौडत येतांना गडावरच्या टेहळेकरी मावळ्यांना दिसली. एकदम इशारतींच्या आरोळ्यांनी गड कोंदून गेला. गडबड, गर्दी, धावपळ सुरू झाली. तोफांचीं तोंडें फिरूं लागलीं. हत्यारेंपात्यारें घेऊन जो तो आपआपल्या जागीं मोर्चा साधूं लागला. महाराज जातीने हिंडून हुकूम सोडूं लागले. तोफा बंदुका ठासून सज्ज झाल्या. तोफा किरण साधूं लागल्या. गोफणी सरसावल्या गेल्या. पुरंदरावर लगीनघाई उडाली. राजांच्या हुकुमावरून नौबत सुरू झाली.

खान आला. तो जों जों जवळ येऊं लागला तों तों गडावरचें वातावरण तणावत चाललें. खानाची फौज त्या प्रचंड पुरंदरगडाच्या पायथ्याशीं येऊन ठेपली आणि खानाने गडावर चढून जाण्याचा हुकूम दिला. आघाडीला मुसेखान होता. फौजेच्या डाव्या बगलेस बजाजी नाईक निंबाळकर, उजव्या बगलेस मताजी घाटगे व पिछाडीस खासा फत्तेखान होता. ओरडत गर्जत खानाचें लष्कर गड चढूं लागलें.[५]

फत्तेखानाच्या या लष्करांत सुखवस्तु मंडळींचाच भरणा वराच होता. डोंगरावर राहोच, पण पायींसुद्धा जे फारसे कोणी फिरलेले नाहीत, वहानांशिवाय हिंडायची ज्यांना जन्मांत कधी सवय नाही,[६] असे वीर केवळ हौसेखातरच जणू या स्वारींत दाखल झालेले होते. अन् आता डोंगर चढण्याचा प्रसंग त्यांच्या भाळीं आला होता. डोंगर चढणें म्हणजे केवढें कष्टाचें काम. त्यांतून सह्याद्रीचा डोंगर अन् त्यांतूनहि पुरंदर! पावला–पावलाला धाप लागत होती. आता हे वर जाणार! लढणार! गड जिंकणार! अन् बंडखोर शिवाजीला........! चढतांनाच दम लागून त्यांचा जीव जायची वेळ आली होती. ही फौज वाटेल

तेथून डोंगर चढत होती. हें असें खास स्वतःच्या इच्छेप्रमाणे खाजगी वाटांनी सह्याद्रीचे डोंगर चढणें म्हणजे शुद्ध वेडेपणाच ! त्यांत भयंकर हाल व्हायचे ठरलेलेच. खानाने पठाण लोक बरेच आणले होते. त्या सैन्याचे असेच हाल होत होते.

गडावरती राजांची माकडफौज टपून बसली होती. खानाची फौज माऱ्याच्या टप्प्यांत येईपर्यंत गडावरून कांहीहि प्रतिकार झाला नाही. आणि गनीम टप्प्यांत आला ! गडावर राजांनी इशारत केली ! अन् मग काय सांगावी त्या खानाची दुर्दशा ! गडावरून तोफांचा, बंदुकांचा आणि बाणांचा केवळ भडिमार सुरू झाला. तटांवरून राजांच्या मावळ्यांनी खूप मोठमोठ्या आकारांचे धोंडे खाली ढकलून देण्यास प्रारंभ केला ! ते धोंडे तटावरून निसटले की, इतक्या वेगाने गडगडत सुटत की त्यांना चुकवून बाजूला सरकणेंहि अशक्य ! आणि किती चुकविणार-एक, दोन, पांच, पंचवीस, पन्नास ? किती ? धडा धडा धडा सारखा सर्वच बाजूंनी हा दगडी पाठलाग सुरू झाला होता ! खानाचे लोक भराभरा धोंड्याखाली सापडून ठेचाळून निघूं लागले. एकेक धोंडा मोठा उत्पातच करी. तो तटावरून खाली निसटला की, डोंगरावरती शांत पहुडलेल्या धोंड्यासहि धडक देई. ती धडक बसतांच तोहि धोंडा उड्या मारीत, माती उधळीत, खानाच्या लोकांवर धावत सुटे ![७] शिवाय मावळे गोफणी गरगर फिरवून सणाणून गोटे सोडीत होते. खानाच्या फौजेचा हुरडा उडूं लागला. आरडाओरड अन् किंकाळ्यांनी तर कऱ्हेपठार दणाणून गेलें.

खानाच्या फौजेचा भयंकर संहार उडत होता. शिरवळला पराक्रम गाजवून आलेले भीमाजी वाघ, गोदाजी जगताप वगैरे वीर व खुद्द कावजी आणि बाजी जेधे, तसेच बाजी पासलकर वगैरे सर्वच लोक केवळ धुंद झाले होते.

खानाच्या लोकांचा तर पार धीरच गळाला! एवढा अवघड डोंगर चढतां चढतां त्यांचीं छाताडें फुटायची वेळ आली होती. आणि शिवाय वरून दगडांचा अन् आगीचा पाऊस पडत होता. सबंध डोंगरावर जिकडे तिकडे रक्तबंबाळ झालेलीं प्रेतें पडत होतीं. पळसाचीं तांबडीं फुलेंच जणू सर्वत्र उधळलीं होतीं.

आपल्या फौजेची केवळ दगडाधोंड्यांखाली ही मौत चाललेली पाहून मुसेखान म्हणाला,[८]

" यह गजब है, पत्थरोंकी बौछार नहीं। इन पत्थरोंसे हमारे कितने बहादूरो मारे गये है। यह कोहस्तानी लडका शिवाजी हम जैसे सूरमा बहादुरोंकों हराता है। हम बहादूर हैं। हमारी शमसीर की ताकद दुनियाको मालूम है। लानत है कि हम भाग कर लौट जाये। किलेपर नजर रखो। वो जरूर कामयाब होंगे, जो डटकर खडे रहेंगे।"

आणि ईर्षेने मुसेखान, शेख मिनाद, रतन बजाजी नाईक व मताजी घाडगे हे नेट धरून वर चढूं लागले. त्यामुळे फत्तेखानाचें लष्करहि चढूं लागलें. तेव्हा राजांनी गडाचा दरवाजा उघडून आपली फौज फत्तेखानी फौजेवर सोडली! अन् मग गडाच्या डोंगरावरच लढाई कडाडूं लागली. भैरोजी चोराची मिनादशेख व रतनशेख या दोघांशीं झुंज जुंपली. गोदाजी जगतापाने खुद्द मुसेखानालाच गाठलें. असेच एकेकाशीं एकेक दोघे लढूं लागले. गडावरून रक्त वाहूं लागलें. लाल लाल फुलें वाऱ्याने हलताहेत असा भास होऊं लागला. लढतां लढतां गोदाजी जगतापाने मुसेखानाच्या छाताडांत खचकन् भाला खुपसला! पण तो बहाद्दर मुसेखानहि असा जबर वीर्याचा मर्द होता की, त्याने दोन्ही हातांनी आपल्या छातींत घुसलेला तो भाला उपसला! आणि संतापाने त्याने दात ओठ खाऊन त्या भाल्याचे दोन तुकडे करून टाकले[९]! त्याने तलवारीने गोदाजीशीं भयंकर युद्ध मांडलें. कुऱ्हाडीच्या

घावासारखे दणादण घाव एकमेकांच्या ढालीवर आदळत होते. राजांचे सर्वच सौंगडी पराक्रमाची शर्थ करीत होते. एवढ्यांत गोदाजी जगतापाने मुसेखानाच्या खांद्यावर इतका भयंकर घाव घातला की, खांद्यापासून पोटापर्यंत खानाची फाकळी उडाली! मुसेखान पडला! मुसेखानाने शौर्याची मात्र कमाल केली.[९]

आणि फत्तेखानाच्या फौजेचा धीर सुटला. सरदारच पळत सुटले! खुद्द फत्तेखानहि पळत सुटला![१०] त्याच्यामागोमाग त्याची फौज पळत निघाली आणि मग त्याच्या पाठलागावर भीमाजी वाघ, कावजी, बाजी, बाळाजी वगैरे शेकडो मावळे ओरडत निघाले. मधमाशांचें मोहोळ फुटलें जसें! आणि खानाच्या फौजेवर त्यांनी झडप घातली!

मराठे हर्षभराने तरवारी ढाली उंचावरून ओरडताहेत, महाराज प्रसन्न आणि साभिमान मुद्रेने आपल्या अतुल पराक्रमी सौंगड्यांकडे पाहात आहेत, आणि पळपुटा खान धूळ उडवीत पळतोय, असें दृश्य पुरंदरगडाखाली दिसत होतें. आता धावपळ आणि धावतां धावतां चकमकी झडूं लागल्या. महाराजांच्या लोकांनी अत्यंत चिवटपणाने, आत्मविश्वासाने आणि कमालीच्या दिलावरीने आपल्या अनेकपट मोठ्या फौजेला साफ लोळवलें! खानाचे मूठभर लोक फक्त जिवंत गेले. फत्तेखान आपलें धुळीनें माखलेलें तें तोंड खाली घालून विजापूरकडे पळत सुटला.

लढाईचें सेनापतित्व राजांकडेच होतें. फत्तेखानाचा जंगी पराभव झाला ( दि. ८ ऑगस्ट १६४८ नंतर ).

आणि तरीहि पळत्या शत्रूचा पाठलाग मराठे करीतच होते. पुरंदरापासून मोकळ्या मैदानावर पाठलाग पांगत गेला आणि बाजी पासलकर व कावजी मल्हार खासनीस धावल्या शत्रूच्या मागे लागले होते. सासवडपर्यंत झटापट गेली आणि बाजी पासलकरांची सासवडाजवळच

गनिमाशीं हातघाई जुंपली. कावजी मल्हारहि त्यांत होताच. आणि....

घात झाला ! बाजी पासलकर ठार झाले ![११]

खानाविरुद्ध एवढी मोठी विजयश्री मिळाली पण अगदी शेवटच्या घटकेस हें काजळाचें गालबोट लागलें ! दृष्ट लागूं नये म्हणूनच का ? बाजी पासलकर पडले !


शिवाजीराजांना अतिशय दुःख झालें. पाठीशीं उभा असलेला त्यांचा बळीरामच गेला ! राजांवर अगदी आरंभापासून सावली धरणारा हा विशाल वटवृक्ष आकस्मिकपणें कोसळला !

* * *

---

**आधारः**—(१) ऐफासा २।२०. (२) जेधे करीणा. (३) शिभा १४।१. (४) शिभा १४।१०. (५) शिभा १४।१२ ते १४. (६) शिभा १४।१७. (७) शिभा १४।१९ ते २४, ३० ते ३२, ३६ व ३७. (८) शिभा १४।३६ ते ३९. (९) शिभा १४।५६ व ५७. (१०) शिभा १४।१०५. (११) शिचसा ५।७७३, किल्ले पुरंदर–कृ. वा. पुरंदरे पृ. ९४; H. G.—Dr. G. S. S.

शिवाय पुढील साधनें पाहा : शिचसा ४।७४४, राजखंड १७।९.



# १३ : वटपौर्णिमा

फत्तेखानाचा सणसणीत पराभव झाला. तो विजापुरास पळून गेला. शिवाजीराजे विजयश्री घेऊन राजगडावर आले. शहाजीराजांबद्दलच्या काळजीने आईसाहेब बेचैन होत्या. फत्तेखानाचा एवढा पराभव मुलांनी केला, ही केवढी आनंदाची गोष्ट होती. पण तो आनंद त्यांच्या निम्म्या काळजांतच मावला. निम्म्या काळजांत शहाजीराजांविषयीची काळजी काजळ खलीत बसली होती. या पराभवाने चिडून बादशाह महाराज राजांना कांही दगाफटका तर करणार नाही ना, अशी चिंता त्यांना लागली.

आणि राजांनाहि वडिलांबद्दल तीच चिंता वाटत होती. एवढ्यांत एक मोठी महत्त्वाची खबर आली. बंगळुरास संभाजीराजांवर चालून गेलेल्या फर्राद‌खानाचा संभाजीराजांनी सणसणीत पराभव केला ! [१] या बातमीने तर आनंदीआनंद उडाला.

आता बादशाह काय करील ही काळजीहि दाटली. राजे चिंताक्रांत झाले. पण लगेच त्यांची टाळी वाजली. सुचली युक्ति ! राजांनी महाराज शहाजीराजांच्या सुटकेसाठी अजब अन् अचूक युक्ति काढली. राजांनी दिल्लीच्या मोंगल सुलतान शाहजहानला एक पत्र पाठवावयाचें ठरविलें. त्या पत्राचा आशय असा, [२]—

'....मी आणि माझे तीर्थरूप महाराज शहाजीराजे भोसले आपल्या चरणापाशी, आपण सांगाल ती चाकरी करण्याची इच्छा करीत

आहोंत. आपण मेहेरनजर करून चाकरीचा फर्मान पाठवावा असा अर्ज आहे. आपण फर्मावाल ती चाकरी आम्ही पार पाडूं. परंतु एकच पायगोवा पडला आहे की, आमचे वडिलांस विजापूरच्या शाहाने दगा करून आदबखान्यांत ठेविलें आहे. जर आदिलशाहाचे कैदेंतून तीर्थरूप महाराजसाहेब सुटतील तर आम्ही आपल्या खिदमतीस हाजीर असूं.'

शहाजीराजांच्या सुटकेसाठी विजापूरच्या शाहाला दिल्लीचा शह देण्याची ही राजांची मुत्सद्देगिरी खरोखरच अजब आणि अचाट होती. दिल्लीच्या शाहजहान बादशाहाचा एक शाहजादा गुजराथेंत अहमदाबादेस सुभेदार होता. या शाहजाद्याचें नांव मुरादबक्ष. औरंगजेबाचा हा भाऊ. राजांनी वरील आशयाचें पत्र त्वरेने मुरादकडे रवाना केलें. या वेळीं राजांचें वय फक्त अठरा वर्षांचें होतें.

राजांनी बादशाही चाकरी पत्करण्याची कबूलायत मोंगल शाहजाद्याकडे लिहून पाठविली. हें असें कसें? कोणाहि सुलतानाची नोकरी करणार नाही, स्वराज्यच स्थापीन, म्हणून बंडाचा झेंडा घेऊन उठलेले शिवाजीराजे एकदम नोकरीला कसे तयार झाले? मग अशी नोकरी विजापुरच्या दरबारांत मिळत होतीच की! काय, आता राजे मोंगलांचे गुलाम होणार?

मुळीच नाही! वडिलांच्या सुटकेकरिता राजे दिल्लीच्या बादशाहाला मधाचें बोट लावीत होते. शाहजहान शहाजीराजांचें कर्तृत्व चांगलेंच ओळखीत होता. आणि शिवाजीराजांचाहि प्रखर प्रत्यय फत्तेखानाच्या लढाईंत आलेला होता. अशी ही पितापुत्रांची पराक्रमी जोडी आपल्या पदरीं आल्यास दख्खनची दौलत मोंगलांना काबीज करायला मोठेंच बळ मिळेल असें शाहजहानला व मुरादबक्षाला वाटलें. त्यांना आनंदच झाला.

या वेळीं अफजलखान शहाजीराजांना घेऊन विजापुराकडे निघाला होता. सरसेनापति खान-इ-खानान खान महंमद याने शहाजीराजांना

अफजलखानाच्या स्वाधीन केलें. जिंजी जिंकून मिळालेली अपार लूट एकूण शहाऐंशी हत्तींवर लादून तीहि अफजलबरोबर विजापुरास रवाना करण्यांत आली. त्या सर्व हत्तींवर लूट होती, व एका हत्तीवर राजांना वसविण्यांत आलें होतें.

अफजलखान विजापुरांत प्रवेशला ( दि. १० मार्च १६४९ ). हत्तींची ती लांबच लांब रांग घंटांच्या घण घण तालावर झुलत चालली होती. शहाऐंशी हत्तींवर लूट लादली होती व शहाऐंशी हत्तींवरच्या लुटीहूनहि मौल्यवान् लूट एका हत्तीवर साखळदंडांनी बांधून चालविलेली होती. राजे शहाजी भोसले! हातापायांत बेड्या ठोकलेले राजे पश्चात्तापाने मान खाली घालून बसले होते. नागव्या तलवारी व भाले घेतलेली घोडेस्वारांची फौज मग्रूर दिमाखांत टापा आपटीत चालली होती. अफजलखानाला अस्मान खुजें झालें होतें. विजापूरच्या रस्त्यावरून, घरांतून, खिडक्यांतून, दुकानांतून हजारो नागरिकांनी तें दृश्य पाहिलें. आदिलशाही सामर्थ्याची प्रत्यक्ष जरब रस्त्यावरून चालली होती. कांही वर्षांपूर्वी लोकांनी याच विजापुरांतून मुरार जगदेवांची धिंड निघालेली पाहिली होती. नंतर मुरारपंतांची उडालेली गर्दन व देहाचे झालेले तुकडे तुकडे पाहिले होते. आज पाळी आली होती शहाजी-राजांवर. घंटा, टापा, घोड्यांचें फुरफुरणें आणि हत्तींचे चित्कार यांनी रस्ते दुमदुमले होते. दरारा! सुलतान महंमद आदिलशाहाचा दरारा टापा आपटीत चालला होता. बादशाहीविरुद्ध 'ब्र' काढणाऱ्यांची ही अशी स्थिति व्हायचीच! नशीब की राजांना हत्तीवर बसवलें होतें. नाही तर बंडखोरांची धिंडच निघावयाची....अफजलखानाने राजांना हत्तीवर घालून मुद्दामच आणलें होतें. जिंदाने इभ्रत!

राजांची रवानगी आदबखान्यांत झाली. लोकांना खात्री होती की, राजांची रवानगी लौकरच 'नर्का'त होणार! तोफेच्या तोंडीं देऊन!

कारण नुकतेच दोन सरदार बेदम मारा खाऊन रडत विजापुरांत आले होते. बंगळुराहून फर्रादखान आला होता व पुरंदराहून फत्तेखान आला होता. शहाजी भोसल्याच्या पोरांनी या दोघां सरदारांचा असा आडवातिडवा पराभव केल्यामुळे बादशाह व दरबार चिडून गेला होता. याचा नतिजा आता स्पष्ट दिसणार होता. शहाजीराजांचें मरण !

राजांची रवानगी आदबखान्यांत झाली.

आणि शहाजी भोसल्याच्या शिवाजीने दिल्लीशीं भयंकर पाताळयंत्री कारस्थान बांधून बापाच्या सुटकेसाठी विजापूरच्या दरबारावरच मोठी मोंगली आफत आणण्याचा घाट घातला आहे, ही कुणकूण दरबारला लागली ! झालें ! भोसल्यांच्या तळपटाचीं कारस्थानें रचणाऱ्यांचे बुरूज जागच्या जागींच धडाधडा कोसळूं लागले. आता शहाजीचें निमित्त करून दिल्लीचा शाहजहान आपल्याला सतावणार हें दरबारास उघड दिसूं लागलें. कदाचित् एखादें दिल्लीचें फर्मानहि येऊन धडकेल की, तुम्ही गैरवाका बर्ताव करून 'आमचे सरदार' शहाजीराजे यांना गिरफ्तार करून ठेवलें आहे. राजे शहाजी भोसले यांचे फर्जंद शिवाजीराजे हे आमच्या खिदमतीचे उमेदवार असतांना तुम्हीं त्यांच्या वडिलांना असें चोरदरवडेखोरासारखे कैदेंत राखावें याचा अंजाम ठीक होणार नाही. जर तुम्ही जल्द अन् जल्द राजे शहाजी भोसले यांस आदबखान्यांतून मोकळें केलें नाही, तर तुमचा लिहाज ठेवला जाणार नाही ! असें एखादें दिल्लीचें कडक फर्मान येऊन दणकलें तर ? आदिलशाहीची अब्रूच इरेला पडायची. अन् जर शिवाजी आणि त्याचा भाऊ संभाजी मोंगलांना सामील होऊन बंड माजवूं लागले तर त्यांना आवरणें अतिशय कठीण होईल. शिवाजीने तर उघड उघड तसा अर्जच केला आहे दिल्लीला.

बादशाह आदिलशाह शिवाजीराजांच्या या राजकारणाने भांबावला.

आता या पेचांतून अब्रूनिशीं कसें सुटायचें? जर शहाजीला सजा फर्मावावी तर मोंगलांचें भय शिवाजीनें उभें केलें आहे. जर शहाजीला तुरुंगांतून सोडावें, तर दरबारची इभ्रत जाते आहे. आता करायचें काय? शिवाजीवर पुन्हा फौज पाठवायची सोयच नाही. तो कसा आहे तें फत्तेखानाला समजलें आहे! अन् आता तर मोंगलहि धावतील त्याच्या मदतीला. बादशाहाचे सर्व सल्लागार मुत्सद्दी जास्तींत जास्त गंभीर चेहरे करून विचार करूं लागले.

आणि उपाय सापडला! एकमेव उपाय बादशाहास सापडला! कोणता? शहाजीराजांना सन्मानपूर्वक सोडणें!![३]

*शक्ति युक्ति एकवटुनि कार्य साधिती....*



अन् बादशाहाने शहाजीराजांच्या बेड्या तोडून त्यांना रीहा करण्याचा हुकूम मुकाट्याने सोडला! (दि. १६ मे १६४९ ज्येष्ठ पौर्णिमा.)

तो महिना ज्येष्ठाचा होता. दिवस पौर्णिमेचा होता. फार फार वर्षांपूर्वी एक पतिव्रता याच ज्येष्ठी पौर्णिमेच्या दिवशीं यमदेवापाशी हट्ट धरून बसली होती, माझ्या पतीचे प्राण परत दे म्हणून. व्रतवैकल्यें करून कृश झालेली ती सती यमराजामागे काट्याकुट्यांतून दंडवत घालीत पतीच्या प्राणांची भिक्षा मागत गेली होती.

तोच हा ज्येष्ठ पौर्णिमेचा दिवस होता. शहाजीराजांच्या सुटकेकरिता आईसाहेबांच्या जिवाची उलघाल होत होती. शहाजीराजे सुटले![५] आईसाहेबांचें सौभाग्य परत मिळालें. या सौभाग्यांत स्वराज्यहि अंतर्भूत होतें. सावित्रीइतका आनंद आईसाहेबांस झाला. स्वराज्य बचावलें. सौभाग्य सुखरूप परत मिळालें. जगदंबेने पुरंदरावर, बंगळुरावर, बेलसरावर आणि सुभान मंगळवर यश दिलें. जगदंबेनेच सौभाग्य राखलें.

बादशाह आपल्या जिवाचें काय करील याची शाश्वती शहाजीराजांना नव्हती. ते चिंतेंतच होते. केवळ आपल्याच बेसावधपणाने आपण अडकलों या जाणिवेने ते पश्चात्तप्त झाले होते. आता सुटका नाही. आता नाही तर मग, आपल्याला ठार मारण्याकरिता बादशाहाचा हुकूम होणार हीच खात्री होती.

आणिं बादशाहाचा हुकूम झाला, राजांना दरबारांत हाजिर करा म्हणून. लगेच राजांना सन्मानपूर्वक कैदेंतून मुक्त करण्यांत आलें. त्यांना वस्त्रें व अलंकार सादर झाले. बादशाहाचा हुकूम सांगितला गेला की, आपण ही खिलत व शिरपाव पेहरून दरबारांत हुजूर मुलाखतीस यावें, अशी हजरत जिल्हे इलाही तश्रीफ फर्मावतात. या अनपेक्षित गौरवाने व सुटकेने राजे चकितच झाले.

हमामखान्यांत स्नान करून आणि खिलत शिरपाव पेहेरून राज दरबारांत प्रवेशले.[४] कल्याण महालांत आदिलशाहाने त्यांची भेट घेतली. बादशाहाचें तोंड असें अवचित उघडलेलें पाहून राजांना आश्चर्य वाटत होतें. पण त्यांच्या लौकरच निदर्शनास आलें की, शिवबाने बादशाहाचें मिजासखोर नाक जेव्हा चिमट्यांत कडकडून पकडलें तेव्हाच त्याने असा 'आ' केला ! शिवबा बिनशर्त शरण यावा म्हणून बादशाह जी करामत करायला गेला, तीच अंगाशीं आली. राजांच्या हृदयांत पुत्रप्रेमाच्या ऊर्मि उठल्या. कौतुकाच्या, आनंदाच्या, अभिमानाच्या आणि धन्यतेच्या ऊर्मि उठल्या. पण झालेल्या विश्वासघाताची व अपमानाची चीड मात्र विझली नाही. त्यांना कैद करणारा बाजी घोरपडे आणि अपमानास्पद रीतीने विजापुरास घेऊन येणारा अफजलखान हे जोंपर्यंत जिवंत होते, तोंपर्यंत ती चीड विझणें अशक्यच होतें. तो दगाबाज मुस्तफाखान मात्र आधीच मरून गेला होता ! निरुपाय !

दरबारांतल्या माने, घाटगे, निंबाळकर, पवार, घोरपडे वगैरे राजनिष्ठ सरदारांपेक्षा शहाजीराजांच्या बंडखोरीचाच आज दरबारांत मोठा दिमाख होता !

बादशाहाने गोड हसून राजांस म्हटलें,[६]

" हमें सख्त अफसोस है के माब्दौलत की गलत फहमी के बाअस आपको जिंदाने शाही की जहमत गवारा करनी पडी ! इसका माब्दौलत को पूरा पूरा एहसास है ! आपकी शुजाअत और दिलेरी का दुनिया लोहामान चुकी है ! आपहीकी कुव्वते बीजूपर आदिलशाही सल्तनतका सर फखसे बुलंद है ! लेकिन आपके फरजंद शिवाजीने जालसाजीसे तसखीर किया हुआ कोंढाना किला आप लौटा दे। और हमारे साथ वफादारी बरतें तो माब्दौलत उसकी तमाम खताएं देंगे। हमें आप जैसा जाननिसार, मर्दे मैदान और सूरमा मिल गया है, ये उस पाक

परवरदिगार की इनायत है। बेहतर होगा के आपकी जागीर का बिंगळूर शहर, कंदरपी का किला और शिवाजीने कब्जा किया हुआ कोंढाना किला आप वापस कर दे!"

शहाजीराजांपाशी बादशहाने शिवाजीराजांचा प्यारा कोंढाणा मागितला! कोंढाण्याची अमोल दौलत शाहाला देणें भाग होतें.पण ज्याच्या समशेरींत बळ आहे तो कोंढाण्यासारखे हजार किल्ले जिंकील आणि त्यांत कोंढाणाहि जिंकील हा विचार करून शहाजीराजांनी संमतिदर्शक स्मित केलें. बंगळूर शहर, कोंढाणा आणि कंदर्पी हे किल्ले बादशहाला देऊन टाकण्यास राजांनी निरुपायाने कबुली दिली. शिवबाने साधलेलें राजकारण थोड्याकरिता बिघडूं न देतां तडीला जावें हाहि राजांचा हेतु होता.

बादशहाने शहाजीराजांची सर्फराजी केली. त्यांना हत्ती दिले. घोडे दिले. वस्त्रालंकार दिले. हा सन्मान पाहून बाजी घोरपड्याच्या आणि अफजलखानाच्या घशांत द्वेषाने जळजळ उठली. शहाजी भोसल्याची गर्दन उडण्याऐवजी त्याची मोठ्या थाटामाटांत बादशहाने सर्फराजी केलेली पाहून मत्सरी लोक जळफळले. इतरांनाहि आश्चर्य वाटलें.

राजगडावर शिवाजीराजे अत्यंत आनंदांत होते. सर्व संकटें साफ उडालीं. पहिल्यावहिल्या लढायांत शौर्याची चमक दाखवून आपल्या लोकांनी यश मिळविलें. वडील सुटले. आईसाहेब आनंदल्या. स्वराज्य सुखरूप राहिलें. सगळा आनंदच. राजांनी आपल्या तलवारबहाद्दरांचा थाटाचा मान केला. बाजी जेध्याने झेंडा राखण्यासाठी प्राण धोक्यांत घालून पराक्रम केला होता. बाजी पासलकरांनी रणांत देह ठेवला. शिवाय अनेकांना जखमा झाल्या. अनेकजण मेलेहि. राजांनी बाजी जेधेला ' सर्जेराव ' असा किताब दिला. शिवाय दोन सुंदर तेजी तुर्की घोडे बक्षीस दिले. सर्वांनाच गौरविलें. पाठी थोपटल्या. जे जे मरण

अनुक्र. २४४७८ वि. १४७ नों. दि. १२-२-९१

पावले त्यांच्या बायकापोरांची चांगली काळजी केली. त्यांना आडेशेरी दिली. बाजी पासलकरांच्या कृष्णाजी नांवाच्या मुलाला राजांनी 'सवाईबाजी' असा किताब दिला. राजांच्या केवळ शाबासकीच्या शब्दांनीच त्या इमानी मावळ्यांच्या जखमा बुजल्या. मोती उधळल्याचा आनंद होता त्या शाबासकीच्या शब्दांत.

फत्तेखान पराभूत होऊन पळाला, त्या बेलसरच्या छावणीपासून जवळच असलेल्या मोरगावच्या मोरेश्वराला पूजेसाठी फुलझाडें लावावयास राजांनी सहा बिघे जमीन अर्पण केली. विजयानंतर राजांनी वाहिलेल्या या पुष्पदूर्वा[७] ( दि. २ जुलै १६४९ ).

—पण राजांचा सगळा आनंद मावळून गेला एकदम! शहाजी-राजांचें पत्र आलें की, कोंढाणा किल्ला पुन्हा बादशाहाच्या कबजांत देऊन टाका! सुटकेनंतर शाहापुढे मुलाखतींत आम्हीं कबूल केलें आहे की, कोंढाणा परत देऊं म्हणून. तरी शाही अंमलदार येईल त्याच्या स्वाधीन गड करावा.[८] शहाजीराजांनी शिवबास हें कळविलें.

शहाजीराजांचें हें पत्र पाहून शिवाजीराजांना फार फार वाईट वाटलें. राजे उदास झाले. त्यांना वडिलांचा रागच आला. कोंढाण्याचा विरह त्यांना जीवीं सोसवेना. मन अगदी अजूर्दा झालें. उदासवाणे होऊन कोंढाण्याकडे पाहात एकांतीं बसले. सगळा गड विजयाच्या आनंदांत डोलत असतांना राजे मात्र दुःखी बसले. राजांचे वृद्ध कारभारी सोनोपंत डबीर मुजऱ्यास राजांकडे गेले. कारण राजांनी त्यांना बोलावूं पाठविलें होतें.[९] पंत येतांच त्यांनी राजांना पुसलें की, महाराजांनी चित्तीं चिंता कशाची धरली आहे? राजे म्हणाले,[१०]

"पंत, आमच्या वडिलांनी आम्हाला अजून ओळखलेंच नाही! एखाद्या अडाण्याने आम्हाला नाही ओळखलें तरी पर्वा नाही. न ओळखो बापडा! पण लोक ज्यांची शहाण्यांतले शहाणे म्हणून शिफारस

गातात त्या आमच्या वडिलांनी मला ओळखूं नये याचें मनाला फार दुःख होतें !"

पंतांना प्रथम हें कांही उमजेचना. ते राजांकडे आश्चर्याने पाहात राहिले. राजे पुढे म्हणाले,[१०]

" जर आमच्या वडिलांनी आम्हाला ओळखलें असतें तर हा कोंढाणा त्यांनी बादशाहाच्या हातांत टाकलाच नसता. कोणाची छाती आहे एरवी कोंढाणा आपल्या हातून जिंकून घेण्याची ? पण आमचे वडील एवढे शहाणेसुरते असूनहि माझा कोंढाणा शत्रूला त्यांनी वेड्यासारखा देऊन टाकला ! काय म्हणावें या माणसाला ?"

पंत पाहातच राहिले ! राजे रागाच्या भरांत वडिलांचा 'उद्धार' करीत होते !

" पंत, गनीम क्षुल्लक असला तरीहि त्याच्या बाबतींत कधीहि गाफील राहूं नये ना ? आमचे वडील गाफील राहिले ! गनिमावर भरवसा टाकून राहिले ! आणि त्यामुळे त्यांच्या कपाळीं कैद आली ! ही जबाबदारीची वागणूक झाली काय ?"

अत्यंत पितृभक्त असलेले राजे कोंढाण्याच्या दुःखाने भडकून वडिलांवर आग ओकीत होते ! पंत विस्मितच झाले. पंतांना तें बरें वाटलें नाही. वडिलांची निंदा ? आपल्या गुणी शिवराजाच्या पवित्र मुखांतून ? माझा राजा पायरी चुकतोय ! माझा राजा पाप करतोय ! पंतांना तें सोसवेना. पंत धारदार शब्दांत राजांना चटकन् म्हणाले[११] :

" महाराज ! पाप आहे हें ! ! पूजनीय पुरुषांची आणि वडिलांची निंदा करणें योग्य नव्हे ! दगाबाज दुष्मनावर विश्वास टाकून थोरले महाराज बेसावध राहिले, यांत थोरल्या महाराजांचें चुकलें हें खरें. पण वडिलांच्या सुटकेकरिता जर आपणास एक कोंढाणा परत द्यावा लागला तर तो कोंढाणाहि यःकश्चितच मानावा ! वडिलांची कदापिहि निंदा

घडूं नये! गड किल्ल्याची किंमत ती काय? वडिलांपेक्षा जास्त? वडिलांची थोरवी फार मोठी आहे! केवळ एका कोंढाण्यावर थोरले महाराज कैदेंतून मुक्त झालेले असले तर कोंढाणा देऊनहि न दिल्या-सारखाच आहे! एवढयाशा कोंढाण्याचा एवढासा डोंगर घेऊन थोरल्या महाराजांसारखा मेरुपर्वत शत्रूने मुक्त केला आहे! कोंढाण्याचें दुःख टाका! तुम्ही आता विजयास प्रारंभ केला आहे. पराक्रमाकरिता सारी पृथ्वी तुम्हास मोकळी आहे! जिंका! पराक्रमी राजालाच पृथ्वी वश होते! एका कोंढाण्याची काय मिजास? अवघी पृथ्वीच जिंका!"

आणि पितृतुल्य सोनोपंतांच्या या शब्दांनी राजे एकदम भानावर आले. पंतांनी जणू पाण्याचा शिपका राजांच्या मुखावर मारला. राजे चमकले. पंतांचे स्वामीनिष्ठ, निःस्पृह, पण तितकेच वत्सल डोळे आज त्यांच्यावर रोखले गेले होते. राजांच्याच कल्याणाकरिता ती तीक्ष्ण नजर राजांना म्हणत होती की, 'राजा! तुझा जन्म प्रभु रामचंद्राच्या वंशांत झाला आहे! रामचंद्राने वडिलांच्या शब्दाकरिता सारें राज्य सोडलें! वनवास पत्करला! तुला एक कोंढाणा सोडावा लागला तर इतका दुःखी होतोस? सांगू नकोस येथून पुढे तूं प्रभु रामचंद्राचा वारसा!'

"नाही, नाही! पंत, तुम्ही म्हणतां तेंच बरोबर![१२] वडील थोर आहेत, थोर आहेत! पंत, दगाबाज दुष्मनांनी माझ्या वडिलांना पकडून कैदखान्यांत फार दिवस हालांत ठेवलें. त्यांचा सूड मीच घेईन! आजपासून जगाने मला ओळखावें, तें दुष्ट यवनांचा नाश करणारा पुरुष म्हणूनच ओळखावें!! मी आता त्यांचा फडशाच उडवीन! आता माझें मन उत्सुक झालें आहे, तें विजापूर काबीज करण्याकरिताच!"[१३]

पंतांना मोठी धन्यता वाटली की, आमचा राजा आहे तसाच निष्कलंक आहे. विवेकी आहे. किंबहुना जास्तच तेजस्वी!

राजांनी महाराज शहाजीराजांच्या आज्ञेप्रमाणे कोंढाणा देऊन टाकला.[१४] राजांचें कोमेजलेलें मन पुन्हा फुललें. राजांनी कोंढाणा दिला, पण संधी सापडतांच पुन्हा जिंकून घेण्याच्या निश्चयानेच !

अनुक्र. २४४७८ वि. चरित्र
क्रमांक ८६५ नों. दि. १२-२-५९

## लेखनालंकार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ९८७५
शाखा (स्थळ प्रत)

---

**आधारः**—(१) शिभा १५।१५ व १६. (२) राजखंड ८।३ व ४. (३) शिभा १५।२० व २५. (४) शिभा १५।२६ व २७. (५) जेधेशका. (६) शिभा १५।२८ ते ४४. (७) राजखंड २०।२४१. (८) पुरंदरे द. ३।१५१. (९) शिभा १५।२. (१०) शिभा १६।३ ते १६. (११) शिभा १६।१७ ते १९ व ४२ ते ४५. (१२) शिभा १६।६४. (१३) शिभा १६।१२ ते १६. (१४) पुरंदरे द. ३।१५१, जेधेशका.

शिवाय पाहाः—शिचत्रसं २।२८ व २९, जेधे करीणा.

# आधार–ग्रंथ

*शिवचरित्राच्या दुसऱ्या भागांत वापरलेले आधार-ग्रंथ व त्यांचे संक्षेप खाली दिले आहेत. पहिल्या भागांत दिलेल्या आधार–ग्रंथांच्या यादींतील अनेक ग्रंथांचा उपयोग याहि भागांत केलेला आहे. त्यांच्या संक्षेपांसाठी पहिल्या भागांतील यादी पाहावी. त्यांतील ग्रंथांचा व संक्षेपांचा पुन्हा येथे समावेश केलेला नाही.*


( १ ) पुणें-नगर-संशोधन-वृत्त खंड १ ते ४—भा. इ. सं. मंडळ प्रकाशन ( पुणें नसंवृ )

( २ ) ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १ ते ८—भा. इ. सं. मंडळ प्रकाशन ( ऐसंसा )

( ३ ) राधामाधव विलास चंपू—सं. वि. का. राजवाडे;–मूळ कर्ता–जयराम पिंडे ( रामाचंपू )

( ४ ) शिवादिग्विजय बखर—( शिवादिग्विजय )

( ५ ) चिटणीस बखर—मल्हार रामराव चिटणीस ( चिटणीस ब. )

( ६ ) विजयनगर गौरवग्रंथ--सं. प्रा. रा. वि. ओतुरकर ( विनगौरव )

( ७ ) ऐतिहासिक पोवाडे--सं. य. न. केळकर ( पोवाडे )

( ८ ) शिवाजी निबंधावली खंड १ व २--सं. द. वि. आपटे (शिवनि)

( ९ ) शिवचरित्र–संशोधन–वृत्त भा. १ व २ ले. प्रा. ग. ह. खरे ( शिचसंवृ )

(१०) Foreign Biographies of Shivaji—Dr. S. N. Sen ( F. B. Shivaji )

(११) History of Aurangzeb–Sir Jadunath Sarkar (S. Aurang)

(१२) सह्याद्रि—ले. स. आ. जोगळेकर ( सह्याद्रि )

(१३) ब्राह्मणी राज्याचा इतिहास—अनुवादक–बा. प्र. मोडक (बराइ.)

(१४) मुधोळ घोरपडे घराण्याची बखर—ही बखर घोरपडे घराण्याच्या इतिहास ग्रंथांतच छापली आहे—सं. द. वि. आपटे ( मुघोघब )

(१५) भोर-संस्थान-ऐतिहासिक स्थलवर्णन—ले. प्रा. ग. ह. खरे ( भोसंऐस्थव )

(१६) Historical Geniologies—Dr. G. S. Sardesai ( H. G.—Dr. G. S. S. )

(१७) पेशवे दफ्तर (खंड १७)–सं. गो. स. सरदेसाई (पेशवे द. १७)

(१८) किल्ले पुरंदर—ले. कृ. वा. पुरंदरे ( किल्ले पुरंदर )


(१९) History of India—Sir Elliot and Dowson; Vol. VII. ( E. D. )

शिवाय, समर्थांचें समग्र वाङ्मय; श्री. अळतेकर लिखित समर्थांचें चरित्र; कै. पु. मं. लाड संपादित तुकाराम गाथा व तुकाराम चरित्र भा. १ ला.

* * *

प्रत.
अनुक्रमांक २४४७८ दि. ...
क्रमांक ... ८६५ नों: दि: १२-२-५८

REFBK-0009815


मध्य महाराष्ट्र
स्वराज्य-प्रयत्नांचा प्रदेश
कल्याण
मुंबई
मिरा डोंगर
अहमदनगर
पेण
लोहगड
चाकण
अलिबाग
विसापूर
पुणे
उंबरखिंड
खेड शिवापूर
सिंहगड
भीमा नदी
सीना नदी
माणकेश्वर
जंजिरा
रायगड
राजगड
सासवड
तोरणा
पुरंधर
नीरा न.
तुळजापूर
महाड
बिरवाडी
जावळी
वाई
फलटण
करकंब
महाबळेश्वर
शंभुमहादेव
माहुली
भोसे
प्रतापगड
वेण्णा नदी
मलवडी
शिंगणापूर
पंढरपूर
सुवर्णदुर्ग
परळी
सातारा
रहिमतपूर
चिपळूण परशराम
कृष्णा न.
भीमा नदी
शृंगारपूर
पाटण
कोयना न.
कराड
संगमेश्वर
विजापूर
राजापूर
गजापूर खिंड
पन्हाळा
कोल्हापूर
कृष्णा नदी
विजयदुर्ग
नेसरी